# माझी संघर्ष गाथा

## (पं. नरेंद्र-आत्मचरित्र)

राष्ट्रीय व सामाजिक कार्यासाठी
तरुणांना प्रेरित करणारा एक
क्रांतिकारी जीवनप्रवास !

- अनुवादक -

**नारायण कुलकर्णी**

- प्रकाशक-

**पं. नरेंद्र वैदिक संशोधन केन्द्र**

श्रद्धानंद गुरुकुल आश्रम परळी वै. जि. बीड (महाराष्ट्र)

प्रकाशक – पं नरेंद्र वैदिक संशोधन केंद्र श्रद्धानंद गुरुकुल आश्रम आर्यसमाज, परळी वैजनाथ ४३१५१५

© सर्वाधिकार – सौ. सुशीला कुलकर्णी

संस्करण – १७ डिसेंबर २०१६ (भाई शामलाल बलिदान दिन)

प्रती – १०००

किंमत – रु. १००/-

प्राप्तिस्थान –

१. महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा,
संपर्क कार्यालय आर्यसमाज परळी वैजनाथ,
जि. बीड पिन – ४३१५१५

२. आर्यसमाज, सरस्वती कॉलनी,
संभाजीनगर (औरंगाबाद), पिन– ४३१००१,
दूरध्वनी –०२४० – २३३१६३९, ०९४२२२१२०४५

३. आर्यसमाज, रामनगर, औसा रोड,
लातूर (महाराष्ट्र) पिन – ४३१५३१

४. आर्यसमाज, स्टेशनरोड, पिंपरी, पुणे
(महाराष्ट्र),पिन– ४११०१७ दूरभाष – ०२०–२७४१२०१६

५. आर्यसमाज, सांताक्रुज(पश्चिम)मुंबई पिन – ४०००४९

६. आर्यसमाज,काकड़वाड़ी,मुंबई–४००००४

७. आर्यसमाज, मंगलवारी सदर बाजार, नागपूर

८. आर्यसमाज, बसस्टँड जवळ, अकोला

९. आर्यसमाज, कस्तुरबा मार्केट, सोलापूर

१०. विजयकुमार कानडे, विजय वस्त्र भांडार, बसस्टँड
जवळ, निलंगा, जि.–लातूर
दूरध्वनी – ०२३८४–२४२२१०, ०९४२३३४९४०९

११.आर्यसमाज, नवापूल, जुना मोंढा नांदेड ४३१६०४

१२.ओंकार प्रकाशन, ओमकुमार कुरुडे, २८ ब सरपंच नगर
तरोडा खु. मालेगाव रोड, नांदेड – ४३१६०५
दूरध्वनी – ०७८८७४११७९४

१३. नारायण कुलकर्णी आर्य कुटी, माहेश्वरी भवन जवळ,
नविन कौठा, नांदेड पिन – ४३१६०३
मो. नं. ८८८८३३११०४

१४. श्रीकृपा इंटरप्राइजेस, दारव्हा रोड, ग्रामीण
पोलीसस्टेशनसमोर यवतमाळ–४४५००१

लेजर टाईपसेटींग – श्री. परीक्षीत यादवराव भांगे
संदेश मल्टी सर्व्हिसेस,विशालनगर नांदेड– ४३१६०२
भ्रमणध्वनी–०९९६०३०२९१४

मुद्रक – शार्प कॉम्पूटर अॅन्ड प्रिंटर्स, नांदेड
दूरध्वनी – ९५२७१०६८९२

# भावपूर्ण समर्पण !



युगप्रवर्तक महर्षी दयानंदांच्या जीवन व
कार्यासंदर्भात ऐतिहासिक संशोधन करणारे
तपस्वी लेखक, हिंदी भाषा तज्ज्ञ व आर्यसमाजाचे
अभ्यासक स्व. डॉ. कुशलदेवजी शास्त्री यांना हे
ग्रंथपुष्प
सादर समर्पित !

# प्रकाशकीय आशीर्वचन

हैद्राबादचा क्रान्तिकारी संग्राम ऐतिहासिक असून नव्या पीढीसाठी प्रेरक असा आहे. दुर्दैवाने प्रस्थापित पुढाऱ्यांनी आर्यसमाजाने दिलेल्या महानतम योगदानाची दखल घेतली नाही. म्हणूनच आर्यक्रांतीकारकांचा गौरव करण्याचे औदार्य ते दाखवू शकत नाहीत, ही खेदाची गोष्ट आहे. हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यातील नक्षत्राप्रमाणे रणझुंजार व्यक्तिमत्व म्हणजे पं. नरेन्द्रजी होत ! निजामाच्या जुलमी राजवटीत सामान्य जनतेवर फार मोठे अत्याचार झाले. रजाकारी अत्याचाराने हिंदू समाज भयभीत झाला होता. जबरदस्तीने धर्मांतरण करण्याचे षड्यंत्र व वाढणारा अनन्वित छळ यामुळे कंटाळलेल्या जनतेने उठाव केला. यात आर्यवीरांनी मोठ्या शौर्याने उडी घेतली. या क्रांतीलढ्यात आघाडीवर असणाऱ्या आर्यनेत्यांपैकी पं. नरेन्द्रजी हे एक धीरोत्तम युगपुरुष! समाजातील वाढत जाणाऱ्या अन्याय व अज्ञान या दोन्ही विरुद्ध त्यांनी मोठा संघर्ष केला. सामान्य लोकांना निजामी राजवटीविरुद्ध पेटून उठण्यासाठी प्रेरणा दिली. तसेच आर्य सिद्धांताच्या प्रचार व प्रसाराचेही अतुलनीय असे कार्य केले. या कार्यात त्यांनी आपले सर्वस्व वाहिले. काळ्या पाण्याची शिक्षा भोगून, अनेकदा तुरूंगात जावे लागले. आर्यसत्याग्रह करतांना अनेक हाल अपेष्ठा सहन केल्या. पण धीर खचू दिला नाही. आर्यसमाजाचे नेतृत्व करून तरुणांना प्रेरणा दिली. म्हणूनच ते खऱ्या अर्थाने दक्षिणकेसरी व तत्कालीन युवकांचे हृदयसम्राट बनले.

अशा थोर क्रांतीवीराच्या जीवन व कार्यापासून मात्र आजची पिढी पूर्णपणे अनभिज्ञ आहे. पं. नरेंद्रजींची हृदयस्पर्शी जीवनगाथा मराठी वाचकांसमोर आणण्याचे कार्य नांदेडचे आमचे तळमळीचे आर्यबंधू श्री. नारायणराव कुलकर्णी यांनी केले आहे. पं. नरेंद्रजींच्या 'जीवन की धूप छांव' या हिंदीतील आत्मचरित्राचा मराठीत सुगम अनुवाद करून त्यांनी एक प्रकारे क्रांतीपर्वाचा जाज्वल्य इतिहास जगासमोर आणला आहे. श्री. नारायण कुलकर्णी हे एका परोपकारी, सुसंस्कृत वेदनिष्ठ आर्य परिवारात जन्मलेले सात्विक असे मृदू स्वभावी व्यक्तिमत्व.

दिवंगत डॉ. कुशलदेव शास्त्री व प्रा. ओमप्रकाशजी होळीकर यांनी नारायणरावाना लिहिते करण्याची प्रेरणा दिली. त्यांचे वडील श्री. नागोराव व आई शारदाबाई हे एक कृतिशील आर्यसमाजी दांपत्य ! त्यांनी आयुष्यभर सामाजिक कार्यात योगदान दिले. उपेक्षित समाजातील गरीब व होतकरू मुलांना आपलेसे करून शिक्षण, संस्कार व सद्विचार दिले. त्यांच्या संस्कार छायेखाली वाढलेले अनेक विद्यार्थी आज उच्च पदावर कार्यरत आहेत.

आपल्या माता-पित्याचा ज्ञानदानाचा, समाजसेवेचा व परोपकाराचा वसा श्री. नारायणराव व सौ. सुशीलाबाई हे दोघे चालवीत आहेत. त्यांची अभ्यासुवृत्ती त्यांना शांत बसू देत नाही. आयुष्यभर व्रतस्थ भावनेने शिक्षकी पेशा सांभाळला. अनेक विद्यार्थी घडविले. आर्यसमाज नांदेडच्या मंत्रीपदाची धुरा सांभाळत राज्यात ठिकठिकाणी वेद धर्मप्रचारही करतात. लेखनीच्या माध्यमाने थोरांचा इतिहास प्रकाशात आणतात. त्यांची सततची ज्ञानसाधना, सत्यनिष्ठ-जिज्ञासा, समाजाप्रती तळमळ, सत्कर्माची ओढ या बाबी त्यांना शांत बसू देत नाहीत.

नव्या पिढीला क्रांतिकारी देशभक्तांचे जीवन कळावे, यासाठी वाणी व लेखनीद्वारे प्रयत्नशील आहेत. महापुरुषांचे बलीदान त्याग समर्पण, परिश्रम, जिद्द, सत्यनिष्ठा, राष्ट्रप्रेम आदी बाबी तरूणांपर्यंत पोहोचविण्याची त्यांची धडपड स्तुत्य आहे. यापूर्वीही त्यांनी 'मी ऋषी दयानंदांना पाहिले, गोकरुणानिधी, रामप्रसाद बिस्मिल आत्मचरित्र, भागवतखंडन, असे ग्रंथ मराठीत आणले व ते आता 'माझी संघर्षगाथा या अनुवादित आत्मचरित्राद्वारे' मराठी वाचकांसमोर आणत आहेत. ही एक प्रकारे मराठी वाचकांची निष्काम ज्ञानसेवाच ! कारण ग्रंथाच्या प्रकाशनाचा सारा खर्च ते व त्यांचे कुटुंबीय स्वत:च वहन करीत आहेत. नव्या तरुण पीढीमध्ये पं. नरेंद्रासारखे राष्ट्रप्रेम, प्रखर धैर्य, सत्यनिष्ठा, निर्भीडपणा, आत्मविश्वास, सामाजिक कर्तव्य जागृत व्हावे, हाच या ग्रंथानुवादामागचा उद्देश !

या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे पं. नरेंद्रजींचे यशस्वी शिष्य ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ, माजी खासदार डॉ. जे. एम. वाघमारे सरांची या ग्रंथास प्रस्तावना लाभली आहे. योगायोग म्हणजे श्री. वाघमारे यांच्या खासदारकीच्या कार्यकाळात त्यांच्या खासदार फंडातून त्यांचे प्रेरणा गुरु पं. नरेंद्रजींच्या नावे परळी येथे श्रद्धानंद गुरुकुल आश्रमात 'वैदिक अनुसंधान केंद्र' उभारले आहे. या संशोधन केंद्रातर्फे प्रकाशित होणारे 'माझी संघर्षगाथा' हे आत्मचरित्रपर पुस्तक द्वितीय ग्रंथपुष्प आहे. दिवंगत आर्यलेखक डॉ. कुशलदेवजी शास्त्री व प्रसिद्ध भाषातज्ज्ञ प्रा. ओमप्रकाशजी होळीकर यांच्या प्रयत्नांमुळे माजी खा. डॉ. वाघमारे सरांनी १५ लाख रुपयांचा खासदार निधी प्रदान करून पं. नरेंद्र वैदिक संशोधन केंद्राची इमारत बांधण्यात आली आहे. या केंद्रातर्फे वेदज्ञान आणि आर्य महापुरुषांच्या जीवन व कार्यावर मोठ्या प्रमाणावर संशोधन कार्य व प्रकाशन होत आहे. पं. नरेंद्रजींच्या या मराठी अनुवादित ग्रंथास डॉ. जे. एम. वाघमारे सरांची प्रस्तावना आणि पं. नरेंद्र वैदिक अनुसंधान केंद्राचे हे दुसरे पुष्प हा एक दुर्मिळ योग आहे. अशा या उत्साही वातावरणात संशोधन केंद्राचे अध्वर्यू डॉ. वाघमारे सरांच्या सहधर्मचारिणी हाथरथ येथील कन्या गुरुकुलाच्या स्नातिका श्रीमती सुलोचनादेवी आमच्यात नाहीत. तसेच सिद्धहस्त आर्य लेखक

डॉ. कुशलदेवजी शास्त्री देखील आमच्यातून अकाली निघून गेले. या दोन्ही दिवंगत आर्यांना भावपूर्ण स्मरणांजली !

विशेष गोष्ट म्हणजे सदरील ग्रंथाचे अनुवादक श्री. नारायणरावजी कुलकर्णी हे या ग्रंथप्रकाशनाचा खर्च स्वत: वहन करीत आहेत. मोठ्या उदार भावनेने ते व त्यांच्या धर्मपत्नी सौ. सुशीलावहिनी हे दांपत्य, आर्य समाज परळीद्वारे संचलित श्रद्धानंद गुरुकुल आश्रमातील 'पं. नरेंद्र अनुसंधान केंद्रास' सदरील ग्रंथाच्या प्रकाशकाचा गौरव प्रदान करीत आहेत. खरोखरच कुलकर्णी कुटुंबाचे कौतुक करावे तितके कमीच आहे. त्यांना आमच्या मनोमन हार्दिक

शुभेच्छा !

ईश्वर अनुवादक श्री. नारायणराव व त्यांच्या परिवारातील सर्व सदस्यांना उदंड आयुष्य व वेदपथावरून निष्ठेने चालण्याची प्रेरणा सतत देत राहो, अशी कामना ! अनुवादित 'माझी संघर्ष गाथा' हा ग्रंथ अतिशय वाचनीय आहे. यातील प्रसंग वाचकांना रोमांचित करणारे तर क्रांतीकार्यासाठी युवकांना नवी दिशा व प्रेरणा देणारे आहेत. ग्रंथाचे चरित्रनायक पं. नरेंद्रजींना शतश: विनम्र अभिवादन व अनुवाद व प्रकाशन या स्तुत्य कार्याबद्दल श्री. कुलकर्णी यांचे पुनश्च अभिनंदन !

धन्यवाद !

दिनांक – ११ आक्टोबर २०१६
विजया दशमी

**डॉ. ब्रह्ममुनी वानप्रस्थी**
मार्गदर्शक
पं.नरेंद्र वैदिक संशोधन केंद्र, परळी
व
प्रधान, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा

# प्रस्तावना

पंडित नरेंद्रजी हे एक थोर देशभक्त होते. त्यांची देशभक्ती अत्यंत प्रखर होती. त्यांच्या देशभक्तीची तुलना मॅझिनी आणि गॅरिबाल्डी यांच्या देशभक्तीशीच होऊ शकेल. तळहातावर प्राण घेऊनच ते जगले. हैद्राबाद संस्थानच्या मुक्तिलढ्यातील त्यांचे कार्य सुवर्णअक्षरात लिहिले गेले आहे. हैद्राबाद संस्थानच्या मुक्तिलढ्यातील आर्यसमाजाचे कार्य अनन्यसाधारण होते. पंडित नरेंद्रजी या लढ्याचे सेनानी होते.

स्वामी रामानंद तीर्थ हे हैद्राबाद मुक्तिलढ्याचे सरसेनानी होते. स्वामीजींनी देशसेवेसाठी संन्यासदीक्षा घेतली. ते कर्मयोगी संन्यासी होते. पं. नरेंद्रजींनी देखील समाज आणि देशाची सेवा करण्यासाठी अविवाहित राहण्याचा प्रण केला. तेही संन्याशाचेच त्यागी जीवन जगले.

आर्यसमाज ही एक हिंदू धर्मसुधारक संस्था आहे. हिंदू धर्म व हिंदू समाजाच्या सुधारणेचे कार्य तिने सातत्याने केले आहे. हैद्राबाद संस्थानात हिंदूंवर अत्याचार होत होते. हिंदूंचा अनन्वित छळ होत होता. निजाम हा हैद्राबाद संस्थानला इस्लामिक राज्य बनवू इच्छित होता. मुस्लिमांच्या उन्मत्तपणाला तोंड देण्यास आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी आर्यसमाजाने सत्याग्रहाची चळवळ सुरु केली. अनेक जण त्यात शहीद झाले. या लढ्याचे पं. नरेंद्रजी हे अग्रणी होते. सर्वस्वाचा त्याग करून ते ह्या लढ्यात उतरले होते. त्यांना अनन्वित छळ सोसावे लागले. या संदर्भात खुद्द स्वामी रामानंद तीर्थ यांनी त्यांच्या विषयी गौरवोद्‌गार काढले आहेत. ते म्हणतात, ''त्या वेळी आर्यसमाजी पुढाऱ्यांपैकी पंडित नरेंद्रजींचा माझ्यावर सर्वात अधिक प्रभाव पडला. त्यापूर्वी त्यांच्याशी व्यक्तिश: माझा संबंध आला नव्हता. ते जातिवंत बंडखोर असल्यामुळे आपल्या भावना निर्भिडपणे व्यक्त करीत असत. त्यांच्या धीरगंभीर वाणीने सहस्त्रावधी लोकांची अंत:करणे हेलावून जात. ते अत्यंत प्रभावी वक्ते होते. जनसेवेसाठीच त्यांनी आपले जीवन समर्पित केले होते. त्यावेळी सरकार त्यांच्याकडे पहिल्या क्रमांकाचा प्रतिस्पर्धी या दृष्टिनेच पाहात होते. त्या बिकट परिस्थितीत हैद्राबादच्या जनतेला स्वाभिमानाची जाणीव करुन देऊन त्या स्वाभिमानाने रक्षण करण्याची जिद्द जनतेत निर्माण करण्याचे कार्य पंडित नरेंद्रजींनी पार पाडले; असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. यामुळे सरकारची वक्रदृष्टी प्रथम पंडित नरेंद्रजींकडे वळली असल्यास नवल नाही. एके दिवशी संध्याकाळी त्यांना मनानूर येथे नेण्यात आले. तेथे जवळजवळ वर्षभर त्यांना डांबून ठेवण्यात आले.'' (हैद्राबाद स्वातंत्र्यच्या आठवणी, पृ. ९०-९१)

पंडित नरेंद्रजींना अतिशय हालअपेष्टेचे जीवन जगावे लागले. त्यांची कथा व व्यथा 'जीवन की धूप-छाँव' या त्यांच्या छोटेखानी आत्मकथेत व्यक्त झाली आहे. त्यांच्या मृत्यूच्या काही दिवस आधी ती प्रकाशित झाली होती. २००८ मध्ये स्व. प्रा. डॉ.

कुशलदेव शास्त्री यांनी संपादित केलेली दुसरी आवृती प्रकाशित करण्यात आली, १९७६ साली त्यांनी संन्यास दीक्षा घेतली. स्वामी सोमानंद हे नाव त्यांनी धारण केले होते. संन्यास घेतल्यानंतर थोड्याच दिवसांनी त्यांचे निधन झाले. अनेकांच्या आग्रहामुळेच त्यांनी आपली ही त्रोटक आत्मकथा लिहिली. 'गागर में सागर' असे तिचे स्वरूप आहे.

'जीवन की धूप–छाँव' या आत्मकथेचे 'माझी संघर्ष गाथा' या नावाने आमचे मित्र श्री. नारायण कुलकर्णी यांनी मराठी वाचकांसाठी तिचा मराठीत अनुवाद केला आहे. या छोट्याशा आत्मकथेत पंडित नरेंद्रजींच्या जीवनाच्या छटा प्रतिबिंबित झालेल्या आहेत. ती वाचीत असताना त्यांच्या जीवनाची धग जाणवल्या शिवाय राहात नाही. खरे तर त्यांचे आयुष्य हा एक निखाराच होता.

पंडित नरेंद्रजी हे सिद्धहस्त लेखकही होते. त्यांची पत्रकारिता देशभक्तीने ओसंडलेली होती. त्यांचे वक्तृत्वही अमोध होते. त्यांना हा वारसा आपल्या वडिलांकडून व आजोबांकडून लाभला होता. त्यांचे आजोबा राय कृष्ण चंद्रजी हे हिंदी, उर्दू आणि फारसीचे विद्वान होते. त्यांचे वडील राय केशव प्रसादजी उर्दू आणि फारसी या भाषा व साहित्याचे मर्मज्ञ होते. त्यांचे मामा राय ठाकूर प्रसादजी हे हिदी, उर्दू व फारसी या भाषांमध्ये काव्यरचना करीत. 'नज्म' या टोपण नावाने ते शायरी करीत. असा हा समृद्ध सांस्कृतिक वारसा त्यांना लाभला होता. उर्दू आणि हिंदीवर त्यांचे असामान्य प्रभूत्व होते.

पंडित नरेंद्रजींचे घराणे निजाम सरकारशी एकनिष्ठ राहिले होते. म्हणून निजामाने त्यांच्या पूर्वजांना वतनदारी बहाल केली होती. ही वतनदारी त्यांचे वडील हयात असे पर्यंत चालू होती. पण नरेंद्रजी हे हैद्राबाद संस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीत पडले. म्हणून त्यांना या वतनदारीला मुकावे लागले.

पंडित नरेंद्रजी लहानपणापासूनच विरक्त होते. आपल्या जीवनाचा खरा उद्देश काय याचा शोध ते अगदी लहान वयातच घेऊ लागले. विवाहाच्या बंधनात पडायचे नाही असा त्यांनी निश्चय केला. वस्तुत: हा त्यांचा ध्रुवसंकल्प होता. त्यापासून ते आयुष्यभर ढळले नाहीत. दु:ख, यातना व कष्ट त्यांना सोसावे लागले. पण त्यांनी आपला मार्ग सोडला नाही. निजामाचे प्रधानमंत्री सर अकबर हैदरी यांना पत्र लिहून त्यांनी आपल्या वतनदारीच्या हक्कावर पाणी सोडीत असल्याचे कळवले. ना घराचा मोह ना मालमत्तेचे आकर्षण. ते अपरिग्रही होते.

सत्य व मुक्तीच्या शोधात लहानपणीच घर सोडले. आत्मज्ञान मिळवण्यासाठी ते वणवण करीत फिरले. अंगावरच्या कपड्यानिशी, कडाक्याच्या थंडीत, अनवाणी पायांनी चालत ते अनेक ठिकाणी गेले. मार्गात येणाऱ्या गावचे मंदिर हेच त्यांचे आश्रय स्थान. रस्त्यात अवलीया व महाराजांच्या भेटी घेतल्या. पण समाधान मिळाले नाही. भिक्षा मागून पोटाची आग ते विझवीत असत. उपासनी बाबांच्या पायाजवळ त्यांनी काही

दिवस आश्रय घेतला. पण त्याचा उपयोग झाला नाही. मग साईबाबांच्या शिर्डीला ते गेले. तिथून नारायण महाराजांचे दर्शन घ्यायला कीटगावला गेले. तिथे त्यांना अमंगल असा जातिभेद आढळला. शेवटी त्यांनी पंढरपूर गाठले. तिथेही त्यांना अंधश्रद्धाच आढळली. तिथे निराशेशिवाय त्यांच्या पदरात काहीच पडले नाही. कुठे जायचे आता ?

पंढरपूरात असताना त्यांची आई आपल्या बरोबर एक-दोन पाहुण्यांना घेऊन आपल्या मुलाच्या शोधात पंढरपूरला पोंहोचली. आपल्या मुलाला पाहून तिने अक्षरश: हंबरडा फोडला. ही घटना आहे १९२८ सालची. त्यावेळेस पं. नरेंद्रजींचे वय होते अठरा वर्षांचे.

वडील आजारी होते. आपल्या मुलाला पाहण्याची त्यांची इच्छा होती. आई म्हणली, 'बाळा, येथेही ईश्वर भक्ती होऊ शकते.' आईच्या बोलण्याचा मनावर प्रभाव पडला. आई बरोबर ते हैद्राबादला आले. वडीलांच्या पायाजवळ बसले. घरात आनंद पसरला. आई वडिलांच्या सहवासातच ईश्वर आहे असा त्यांना प्रत्यय आला.

हैद्राबाद संस्थान अतिशय अस्वस्थ होते. निजाम सरकारचा जुलूम दिवसेंदिवस वाढत होता. जबरदस्तीने हिंदूंना मुसलमान केले जात होते. आर्यसमाज त्यांचा प्रतिकार करीत होता. हा तरूण मुलगा आर्यसमाजी नेत्यांच्या सहवासात आला. श्री. चंदुलाल हे सुलतान बाजार आर्यसमाजचे मंत्री होते. आर्यसमाजाचे धुरंधर नेते निजाम सरकारच्या अत्याचारांचा प्रतिकार करीत होते. हे पाहून नरेंद्रजींच्या मनातला क्रांतिकारक जागा झाला. अशात त्यांनी पंडित रामचंद्र देहलवीजींचे आर्यसमाज मंदिरात भाषण ऐकले. ते बोलले 'आत्मा-परमात्मा' या विषयावर. मूर्तीपूजेचे त्यांनी खंडण केले. जातिव्यवस्थेच्या विरोधात ते बोलले. या भाषणाने नरेंद्रजींना पुढचा मार्ग दिसला. त्यांचे अंधरात चाचपडणे थांबले. रामचंद्र देहलवीजींच्या भाषणाने त्यांच्यावर जादू केली. आर्य समाजाला जीवन अर्पण करण्याचा पंडित नरेंद्रजींनी निर्णय घेतला. त्यांनी स्वामी दयानंद सरस्वती लिखित 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ वाचला. तो वाचल्यानंतर तर त्यांच्या आयुष्याची दिशाच बदलली. अंधारातून ते प्रकाशात आले.

मध्यंतरी त्यांचे शिक्षण थांबले होते. नोकरी करणे त्यांना भाग होते. एक छोटीशी नोकरी मिळाली. आर्यसमाजाचे ते रीतसर सदस्य बनले. चंदूलालजींचा सहवास त्यांना लाभला. त्यामुळे त्यांचे जीवन पूर्णत: बदलले. पायाखाली नवीन वाट आली. 'वो हम नहीं रहे, वह तबीयत नहीं रही !' वाचन, मनन व चिंतनात वेळ जाऊ लागला. अविवाहित राहून समाजसेवा करण्याचे व्रत पक्के केले. 'निश्चयाचे बळ, तुका म्हणे तेचि फळ' याचा प्रत्यय येऊ लागला. आर्यसमाजात अनेक पंडितांची भाषणे ऐकण्याची संधी मिळाली. निसर्गाने त्यांना वक्तृत्वाची देणगी दिली होती. वैदिक धर्म प्रचारक बनण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. एका पंडिताने लाहोरला दयानंद उपदेशक विद्यालयात जाऊन शिक्षण घेण्याचा सल्ला दिला. शिफारस पत्रही दिले. त्यानुसार त्यांनी लाहोर

गाठले. दयानंद उपदेशक विद्यालयाचे प्रधानाचार्य स्वामी स्वतंत्रतानंद यांनी त्यांना प्रवेश दिला. जीवनाचा दुसरा टप्पा येथून सुरु झाला. ही घटना आहे १९३० सालची.

आईवडिलांचे आशीर्वाद घेऊन ते लाहोरला गेले. १९३० ते १९३३ पर्यंत ते दयानंद उपदेशक विद्यालयात शिकले. त्यांनी वैदिक धर्माचा तसेच इस्लाम धर्म व तत्वांचा अभ्यास केला. अनेक ख्यातनाम आचार्यांनी त्यांना शिकवले. स्वामी स्वतंत्रतानंदजींचा सहवास त्यांना लाभला. लेखन व वक्तृत्व कलेत ते पारंगत झाले. आत्मविश्वास वाढला. एका दानशूर व्यक्तीने त्यांच्या राहण्याचा व खाण्याचा प्रश्न सोडवला. वडील प्लेगने आजारी असल्याचे पत्र आले. ते परत हैद्राबादला आले. परत लाहोरला येईपर्यंत परीक्षेची तारीख निघून गेली होती. पण स्वामीजींनी योग्यतेचे प्रमाणपत्र दिले. त्याचा निश्चितच उपयोग झाला. स्वामी स्वतंत्रतानंदजींचे आशीर्वाद घेऊन ते हैद्राबादला परतले होते. आर्यसमाजाचे काम ते करू लागले.

रणांगणावरचा झुंझार लढवय्या म्हणून त्यांच्या कामाला सुरूवात झाली. खरे तर लाहोर येथे असतानाच खडतर प्रसंग त्यांनी अनुभवले होते. १९३२ साली काश्मिरमध्ये हिंदूंवर अत्याचार झाले. दंगापीडित हिंदूंच्या सेवेत स्वामी स्वतंत्रतानंदजी हे आपले काही विद्यार्थी घेऊन काश्मिरला गेले होते. त्यात नरेंद्र हा विद्यार्थी देखील होता. आर्यसमाजी लोकांनी शेख अबदुल्लांच्या कटकारस्थानला तोंड दिले. राजौरी सहायता कँपचा नेता म्हणून तीन महिने नरेंद्रजींनी काम केले. हैद्राबाद संस्थानातील पुढील कामाची जणू ही नांदीच होती. लाहोर येथे गुरुकुल भवनमध्ये येऊन काही मुस्लिम विद्यार्थी हिंदू विद्यार्थ्यांना त्रास देत असत. नरेंद्रजी त्यांचा मुकाबला करीत असत.

हैद्राबादला परतल्यानंतर आर्यसमाजाच्या कार्याशी त्यांनी स्वत:ला जुंपून घेतले. आर्यसमाजमधले त्यांचे पहिलेच भाषण ‘कुराणात वेदांचे तेज’ या विषयावर झाले. त्यांच्या भाषणातला आवेश काही औरच होता. आपल्या भाषणतून त्यांनी संदेश दिला. ‘पापसे डरो, पापियों से नही.’ भाई बंसीलाल आर्य व भाई श्यामलाल आर्य वकील हे दोघे बंधू आर्य समाजाच्या प्रचारकार्यात बुद्धिवैभवाने तळपत होते. प. नरेंद्रजी त्यांच्या सहवासात आले. पंडित विनायकराव विद्यालंकार यांचे कार्य आकाशातील ताऱ्याप्रमाणे तेव्हा चमकत होते. त्यांचाही सहवास त्यांना लाभला. निजामी अत्याचारांविरुद्ध ही मंडळी प्राणपणाने झुंझत होती. भाई श्यामलाजीना जेलमध्ये विष देऊन मारण्यात आले.

आर्यसमाजाने आम जनतेला वैदिकधर्माची ओळख करून देण्यासाठी ‘वैदिक आदर्श’ या नावाने साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाच्या प्रकाशनाची जबाबदारी पं. नरेंद्रजी यांच्यावर सोपविण्यात आली होती. संपादकाची जबाबदारीही त्यांना सांभाळावी लागली. हे साप्ताहिक मुसलमानांच्या अत्याचारांविरुद्ध आग ओकीत

होते. त्याने निजाम सरकारचा रोष ओढवून घेतला. दि. १८ एप्रिल १९३५ रोजी नरेंद्रजीवर सरकारने नोटीस बजावली की, 'तुम्हाला 'मनानूर' जेलला का पाठऊ नये ?' या ठिकाणची जेल म्हणजे काळ्यापाण्याची सजा होती.

निजाम सरकारने या साप्ताहिकाचे प्रकाशन बंद पाडले. या साप्ताहिकात पंडित नरेंद्रजी लिहू लागले होते. लिहिणे कसले, तो तर अग्निवर्षावच होता. त्यांच्या हातातले ते ब्रह्मास्त्र ठरले. निजाम सरकारने त्यांच्या लेखन व भाषण स्वातंत्र्यावर बंदी घातली. कारण त्यांनी निजामाविरुद्ध जंग छेडली होती. इतकेच नव्हे तर त्यांना नजरबंदीची कैद सुनावण्यात आली. कारण त्यांनी सरकारचा आज्ञाभंग केला होता. या क्रांतिकारकाला सिंहाची छाती व हत्तीचे बळ लाभले होते.

पं. नरेंद्रजींनी संघर्षांचा खडतर मार्ग स्वीकारला. ते आर्यसमाजाचे मंत्री बनले. त्यामुळे देशपातळीवरील ज्येष्ठ आर्यसमाजी नेत्यांशी व विद्वानांशी त्यांचा जवळून संबंध आला. त्यांना त्यांनी हैद्राबादला व्याख्यानांसाठी बोलावले. पं. रामचंद्रजी देहलवी, पं. बुद्धदेवजी विद्यालंकार, पं. धर्मभिक्षूजी, पं. सत्यदेवजी, पं. प्रकाशवीरजी शास्त्री, महात्मा नारायण स्वामी, पं. स्वतंत्रतानंदजी, आचार्य रामदेवजी, अशा किती तरी विद्वान व्यक्ती हैद्राबादला येऊन गेल्या. आर्यसमाजाच्या कार्यावर निजामाचा रोष होताच. त्याचे अत्याचार वाढत गेले. एका सम्मेलनात पं. नरेंद्रजी म्हणाले, 'हैद्राबाद ८२ हजार चौरस मैलांचा मोठा जेलखाना आहे, सरकार विरुद्ध पाऊल उचलणे आम्हाला भाग पडेल.' या वाक्याला राजद्रोह समजून सरकारने त्यांच्यावर खटला भरला व सहा महिन्यांची कैद झाली.

भाई श्यामलालजींना बिदर येथे जेलमध्येच विष देऊन मारण्यात आले होते. आर्यसमाजावर हा फारच मोठा आघात होता. त्यानंतर आर्यसमाजाची चळवळ अधिक आक्रमक बनली. धरपकडी सुरु झाल्या. पंडित नरेंद्रजींनाही 'मनानूर' ला तीन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. मनानूर हे हैद्राबाद संस्थानातील 'काळे पाणी' मानले जात होते. ही घटना आहे. १९३८ मधली. ते मनानूर जेलमध्ये सव्वा वर्ष होते.

हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनाने उग्र रूप धारण केले. आर्य सत्याग्रहात पंधरा हजार आर्यसमाजी भारताच्या सर्व भागांतून हैद्राबाद येथे आले. या संग्रामात एकवीस आर्यवीर शहीद झाले. निजामाचा दात पंडित नरेंद्रजींवर होता. त्यांची सुटका करण्यासाठी निजाम तयार नव्हता. पण शेवटी त्यांची सुटका करावीच लागली. 'देर आयद दुरुस्त आयद !'

स्वातंत्र्य चळवळ सबंध संस्थानात वणव्यासारखी पसरली. मुसलमांनानी अनेक ठिकाणी हिंदूंची घरे व दुकाने जाळली. गुंजोटीत वेद प्रकाश, कल्याणीत धर्मप्रकाश, निजामाबादेत राधाकिशन, हुमनबादेत शिवचंद्र व त्यांचे तीन मित्र आणि उमरीत दत्तात्रय हे तरुण शहीद झाले.

१९३८ मध्ये स्टेट कॉँग्रेसची स्थापना झाली व लगेचच निजामाने तिच्यावर बंदी घातली. पण राजकीय जागृतीचे काम थांबले नाही. आंध्र परिषद, महाराष्ट्र परिषद आणि कर्नाटक परिषद या परिषदांनी हे काम चालूच ठेवले. भूमिगत राहून अनेकांनी लढा चालवला.

निजामाला धनाजी व संताजीप्रमाणे पं. नरेंद्रजी पाण्यात दिसू लागले. 'इत्तेहादूल मुसलमिन' या जात्यंध मुस्लिम संघटनेने तर संस्थानात अक्षरश: धुमाकुळ घातला. त्याने 'जिहाद' चा नारा पुकारला. क्रौर्याला सीमाच राहिली नाही. आर्यसमाजी तरुणांनी त्यांच्या विरुद्ध निकराने लढण्याचे प्रचंड धाडस केले.

जाळपोळ व लुटालुटीला पारावारच उरला नाही. स्त्रियांची आब्रु लुटली गेली. मंदिरे पाडण्यात आली. प्राणघातक हल्ले तर रोजच होत होते. अत्याचाराला कसलीच सीमा राहिली नव्हती. सहन करण्याची सीमाच संपली. लढण्याशिवाय गत्यन्तरच राहिले नाही. हैद्राबाद संस्थानातील प्रत्येक गाव हे गड बनले.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. निजाम स्वतंत्र राहू इच्छित होता. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली कॉँग्रेसने सत्याग्रहाची मालिका सुरु केली. रजाकारांनी संस्थानात प्रचंड धुमाकूळ घातला. या सत्याग्रहात देखील पं. नरेंद्रजी सामील झाले.

काही आर्यसमाजी तरुणांनी निजामच्या गाडीवर बॉँब टाकला. नारायण पवार या तरुणाला फाशीची शिक्षा झाली. पण त्याला फाशी देण्याआधीच हैद्राबाद संस्थान मुक्त झाले. विनायकरावजी विद्यालंकार, पं. नरेंद्रजी आणि अन्य सर्व आर्यसमाजी नेते हे कॉँग्रेसमध्येही सक्रीय होते. सरदार वल्लभभाई पटेल यांनी पोलीस कारवाई केली. हैद्राबाद संस्थान हे १७ सप्टेंबर १९४८ रोजी स्वतंत्र झाले. एका प्रदीर्घ दु:खस्वप्नचा अंत झाला.

'मजलिस–ए–इत्तेहादुल मुसलमिन' या जात्यन्ध कडव्या संघटनेचा अध्यक्ष नवाब बहादुर यार जंग हा होता. त्याने राज्यातील हरिजनांना मुसलमान बनविण्याचा चंगच बांधला होता. दहा हजार हरिजनांचे त्याने धर्मांतर केले होते. त्या सर्वांना पुन्हा हिंदू धर्मात आणण्याची ऐतिहासिक कामगिरी पं. नरेंद्रजींनी केली. नरेंद्रजींना संपविण्याचे त्याने अनेक प्रयत्न केले. पण हा क्रांतिकारक मृत्युंजयीं ठरला. तो आर्यसमाजाच्या गळ्यातला ताईत होता. हैद्राबादच्या मुक्तिलढ्याचे वर्णन करताना सरदार वल्लभभाई पटेल म्हणाले होते, 'जर आर्यसमाजाने हैद्राबादमध्ये सत्याग्रह केला नसता तर आम्हाला (भारत सरकारला) तीन दिवसात यश मिळणे शक्य नव्हते.'

स्वातंत्र्याच्या आधी व नंतर पं. नरेंद्रजींनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली काम केले. हैद्राबाद स्वतंत्र झाल्यानंतर कॉँग्रेसच्या तिकिटावर ते हैद्राबाद राज्याचे आमदार झाले होते. पण राजकारणाने अनिष्ट वळण घ्यायला सुरूवात केली. म्हणून त्यांनी राजकारण सोडले. स्वामीजींनी देखील याच कारणासाठी राजकारण सोडले. नंतर या दोघांनीही विधायक कामांना वाहून घेतले. नरेंद्रजी हे नवयुवक हृदयसम्राट

म्हणून ओळखले जात होते. सुल्तान बाजार आर्यसमाज हेच त्यांचे निवासस्थान होते. त्यांनी १९७६ साली संन्यास दीक्षा घेतली. स्वामी सोमानंद हे नाव धारण केले. त्याचवर्षी अर्थात २४ सप्टेंबर १९७६ रोजी त्यांचे महाप्रयाण झाले.

एखाद्याचे आत्मचिरत्र असो अथवा जीवनचरित्र, ते त्या व्यक्तिचा समकालीन इतिहास कथन करते. त्या काळातल्या घटना व घडामोडी आणि व्यक्ती यांच्या विषयीची माहिती आपल्याला मिळते. तो काळच घटना आणि घडामोडींसहित तीत प्रतिबिंबित झालेला असतो. त्यात महत्त्वाच्या असतात त्या समकालीन व्यक्ती. या आत्मकथेत आपल्याला अनेक व्यक्ती भेटतात. भाई बंसीलाल आणि भाई शामलाल यांचा त्याग आपल्या लक्षात येतो. रामचंद्र देहलवी, बुद्धदेव विद्यालंकार, न्या. केशवराव कोरटकर, चंदुलाल, विनायकराव विद्यालंकार, स्वामी स्वतंत्रतानंदजी इ. व्यक्तींची बुद्धिमत्ता व ध्येयवाद आपल्याला कळतो. ज्या देशभक्तांनी हौतात्म्य पत्कारले त्यांच्या नुसत्या उल्लेखाने देखील आपल्या मनात त्यांच्याविषयी आदर निर्माण होतो.

पंडित नरेंद्रजींच्या या आत्मकथेत त्यांचे अफाट कार्य समाऊ शकलेले नाही. 'जीवनाची ऊन-सावली' मध्ये सावली कमी व ऊन जास्त आहे. ते ग्रीष्मातले ऊन आहे. नरेंद्रजी हे अनेक तरुणांचे मित्र, तत्वज्ञ व मार्गदर्शक होते. माझ्या लग्नसमारंभात सहभागी होऊन त्यांनी आम्हा उभयतांना आशीर्वाद दिले होते. चीनी आक्रमणानंतर १९६३ साली लातूर आर्यसमाजाच्या वार्षिकोत्सवात त्यांच्या बरोबर मीही भाषणासाठी निमंत्रित होतो. हा एक प्रकारचा माझा सन्मानच होता. हैद्राबाद आर्यसमाजचा इतिहास लिहिण्याची त्यांनी मला सूचना केली होती. पण माझ्या संशोधन कार्यामुळे मला हे काम करता आले नाही. अशा महान व्यक्तीच्या सहवासात येण्याचे भाग्य मला लाभले होते. पं. नरेंद्रजी यांचा अनुग्रह मला लाभला.

क्रांतिकारी तरुणांचा प्रेरणास्त्रोत म्हणून आम्ही पंडित नरेंद्रजी यांच्याकडे पाहात होतो. निजामाच्या गाडीवर बॉंब टाकण्याचे धाडस करणाऱ्या नारायण पवारांचा उल्लेख ते सतत आपल्या भाषणात करीत असत. नारायण पवार हे माझ्या नात्यात येत होते. ते आज हयात नाहीत.

श्री. नारायण कुलकर्णी यांच्या या अनुवादित पुस्तकाचे मराठी वाचक स्वागत करतील याचा मला विश्वास आहे.

**– डॉ. जनार्दन वाघमारे**
माजी खासदार राज्यसभा,
संस्थापक कुलगुरु
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड

लातूर
दि. २४ सप्टेंबर २०१६
पं. नरेंद्रजी यांची ४० वी पुण्यतिथी

## अनुवादकाचे मनोगत

प. नरेंद्रजींची मूळ हिंदीतील 'जीवन की धूप–छांव' ही आत्मकथा माझी संघर्षगाथा (पं. नरेंद्र–आत्मचरित्र) या नावाने मराठीत अनुवादित करून वाचकांना सादर करतांना मला आनंद होत आहे. महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेचे अध्यक्ष डॉ. ब्रह्ममुनीजी व 'वैदिक गर्जना' मासिकाचे संपादक प्रा. डॉ. नयनकुमारजी आचार्य हे मला वाणी व लेखनी चालू ठेवण्याची प्रेरणा देतात.

वेद, महर्षी दयानंद व हुतात्म्यांचे उपासक स्व. प्रा. डॉ. कुशलदेवजी शास्त्री, हिंदी विभाग प्रमुख, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली मी हे पुस्तक अनुवादाचे काम आठ वर्षापूर्वी केले.

जेव्हा समाजात व देशात अज्ञान, अंधकार व अविद्येचे स्तोम माजते, तेंव्हा थोर क्रांतीकारी महापुरुष आपल्या अलौकिक जीवन कार्याद्वारे समाज जीवनाला नवी दिशा देतात. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास फारच क्रांतिकारक आहे. या क्रांति–लढ्यात अनेक युगपुरुषांनी त्याग व समर्पणाचा इतिहास रचून युगानुयुगे तरुणांसाठी दीपस्तंभाचे कार्य केले आहे. क्रांतिवीरांच्या मौक्तिक माळेतील तेजस्वी मोती म्हणजे स्वनामधन्य पंडित नरेंद्रजी होय. त्यांचा जीवनप्रवास प्रखर तेजोमय असाच आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक क्रांतिकारकांचे जीवन व कार्य प्रकाश झोतात आले, पण पंडित नरेंद्रजी सारख्या दिव्यतम क्रांतिवीराचा ज्वलंत इतिहास मात्र मराठी वाचकांपर्यंत पोचलाच नाही. सध्याच्या सामाजिक अस्ताव्यस्त वातावरणात पंडित नरेंद्रजींचे जीवन, कार्य व विचार सामान्य लोकांपर्यंत, विशेषत: तरुणापर्यंत पोचावेत हा पवित्र उद्देश डोळ्यांसमोर ठेवून या सत्पुरुषाची आदर्श जीवनगाथा अंधकारमय युगात वाहत जाणाऱ्या तरुण पिढीला प्रकाशाचा मार्ग दाखविणारा पंडित नरेंद्रजी सारखा अचाट सामर्थ्य लाभलेला युगपुरुष कळावा, अशी उत्कट इच्छा मनोमन होती. म्हणूनच राष्ट्राच्या नव निर्मितीसाठी अनुवादाच्या रुपाने केलेला हा प्रयत्न.

डॉ. जनार्दन वाघमारे विद्यार्थी अवस्थेत असतांना पं. नरेंद्रजींच्या संपर्कात आले. ते त्यांना गुरुस्थानी मानतात. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन ते यशाच्या उत्तुंग शिखरापर्यंत पोचले. ते खासदार व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू झाले.

लातूर निवासी प्रा. ओमप्रकाशजी विद्यालंकार होळीकर सरांच्या मध्यस्थीने डॉ. जनार्दनराव वाघमारे साहेब, (माजी खासदार राज्यसभा, माजी कुलगुरु स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,) यांच्याकडून समर्पक प्रस्तावना मिळाली.

खरेतर त्यांना अनेक कामे असतांना ती सर्व बाजूला ठेवून या पुस्तकातील

कथा नायकाचा गौरव वाढविला, या करीता मी त्यांचा कृतज्ञ आहे. तसेच मा. श्री. प्राचार्य देवदत्त तुंगार सरांची 'भूमिका' मिळाली, या बद्दल त्यांचे आभार.

थोर स्वातंत्र्य सैनिक श्री. रंगनाथराव भिंगे यांचे सुपुत्र, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक, माझे मित्र श्री. नरसिंगराव भिंगे यांनी हृदयाच्या व मेंदूच्या शस्त्रक्रियेनंतर क्षीण झालेल्या अवस्थेत या पुस्तकातील लेखन दोष अत्यंत कष्ट घेऊन दूर केले. मी त्यांचा ऋणी आहे. तसेच प्रा. फकीर पाशा शहाजिंदे सरांनी या पुस्तकावर भाषिक संस्कार केले, या बद्दल मी त्यांचे आभार मानतो.

मूळ पुस्तक 'जीवन की धूप-छांव' या पुस्तकातील उर्दू काव्य पंक्तीचा अनुवाद मराठी भाषेत करण्यासाठी, उर्दू व मराठीचे जाणकार माजी शिक्षाणधिकारी, गोसेवक, माझे स्नेही श्री. सय्यद इकबाल अहमद यांनी मला मार्गदर्शन केले, त्यांचे आभार.

प्राचार्य श्री. देवदत्त तुंगार सर यांच्याकडून मला सतत मार्गदर्शन मिळते. तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. शारदा तुंगार (अध्यक्षा आर्यसमाज नांदेड), व श्री. सत्यव्रत शिवराम जिंदम (संचालक, वैदिक सेवाश्रम नांदेड) यांनी मला या पुस्तकाच्या लिखानात व प्रकाशनात मदतीसह मार्गदर्शन केले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो.

प्रा. ओमप्रकाश विद्यालंकार होळीकर सरांच्या प्रयत्नाने, मार्गदर्शनाने व सहकार्याने या पुस्तकाला मूर्त स्वरूप आले आहे. या करिता त्यांचे विशेष आभार व्यक्त करतो. प्रा. नरदेवजी गुडे यांच्या प्रेमळ उत्साह वर्धक मधुर वाणीने मला कार्यरत ठेवले.

लेजर टाईप सेटिंग चे काम श्री. परीक्षित यादवराव भांगे यांनी मोफत केले. त्यांना धन्यवाद !

हे पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी श्री. पं. नरेंद्र वैदिक संशोधन केंद्राचे मार्गदर्शक श्रद्धेय डॉ. ब्रह्ममुनीजी यांनी स्वीकारल्याबद्दल शतश: आभार ! महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेचे सदस्य श्री. यादवराव भांगे, आर्यसमाज नांदेडचे उपप्रधान श्रीमती गंगाबाई मारंपल्ले, मंत्री श्री. सत्येंद्र आर्य चिंचोलीकर, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. तांदळे सर, व्यवस्थापक श्री. संभाजी किरकन यांचेही योगदान या पुस्तक प्रकाशनात आहे. अशाच आणखी काही ज्ञात-अज्ञात व्यक्तींनी मदत केली आहे. माझी पत्नी सौ. सुशीला, पुत्र अभय, कन्या सौ. अर्चना अजय भलेराव यांनी ह्या पुस्तक प्रकाशनात तन, मन, धनाने सहकार्य केले. वितरकांनी पुस्तक विकून पाठविलेले पैसे पुन्हा अशाच कार्याकरिता परत वापरण्याची हमी देतो. धन्यवाद !

शेवटी प्रा. डॉ. नयकुमार आचार्य यांनी घेतलेल्या कष्टाबद्दल विशेष आभार !

-नारायण नागोराव कुलकर्णी

दिनांक - ३० आक्टोबर२०१६

**(म. दयानंद निर्वाण दिन)**

## एक परिसंवाद

(हैदराबाद आर्य सत्याग्रहापूर्वी दक्षिण भारतातील गॅरिबाल्डी हैदराबाचे जननायक पं. नरेंद्रजींना क्रूर निजाम उस्मान ने हद्दपार करून राज्याचे काळे पाणी मनानूरच्या जंगलात एका पिंजऱ्यात बंद केले. त्या निर्जन वनामध्ये मनुष्याचा वास आल्याने जंगलातील एक सिंह पिंजऱ्यापर्यंत येऊन पोहोचला आणि पिंजऱ्याआड गाढ झोपलेल्या नरेंद्रजीचे पाय चाटू लागला. तेव्हा दोघांतील गर्जनेचे वर्णन, श्रद्धेय प्रा. राजेंद्र जिज्ञासुजींनी परिसंवादाच्या रूपात केलेले आहे. ते पुढील प्रमाणे आहे.)

### पिंजरे वाला शेर दहाड़ा

आओ प्यारे तुम्हें सुनावें, प्रेरक सुन्दर एक कहानी ।
सुना कभी तो होगा तुमने, मनानूर का काला पानी ।।
बीहड़ वन में विचरण करते बाध शेर से हिंसक प्राणी ।
कौन रोकने वाला उनको, सब करते अपनी मनमानी ।।
वहाँ मीर उस्मान अली ने, पिंजरा एक नया बनवाया ।
एक केसरी पकड़ जकड़ कर, उस पिंजरे में जा फंसाया ।।
एक दिवस जंगल के राजा को, उसका कुछ भान हुआ ।
कौन केसरी नूतन आया, पूरा उसको ज्ञान हुआ ।।
लोहे के फाटक से झांका, ''अरे कौन तू सोया है ।
आँख मिला तू मुझसे, कैसे मस्त नींद में खोया है ।।
लगा चाटने पैर द्वार से, जाग उठा भीतर का शेर ।
आँख खोलकर लगा देखने, ज़ोर ज़ोर से वह हुँकारा ।
गर्जन तर्जन सुनकर उसकी, पिंजरे वाला शेर दहाड़ा ।।
क्या मेरा तू कर सकता है ? ऐ जंगल के राजा बोल ।
बाहर भीतर रहूँ कहीं भी, खोलूँ हर ज़ालिम की पोल ।।
भाग यहाँ से देर न कर तू– व्यर्थ यहाँ चिंघाड़ नहीं ।
जंगल में रहना जो चाहे, मेरे साथ बिगाड़ नहीं ।।
बोला झक्की वन का राजा, यह कैसा नर नाहर है ।
नहीं जानता डरना दबना, भीतर है या बाहर है ।
वन राजा को आँख दिखाता, जन राजा को यह ललकारे ।
पिंजरे में डारा है जिसको, बाहर भीतर यह हुँकारे ।।
रचयिता :– प्रा. राजेंद्र 'जिज्ञासु' वेद सदन, नई सुरज नगरी,
अबोहर – (पंजाब) १५२११६

# भूमिका

## पंडित नरेंद्रजींची आत्मकथा - प्रा. देवदत्त तुंगार

हैदराबाद मुक्ती लढ्याचे धडाडीचे सेनापती आणि प्रखर समाज सुधारक, दक्षिण केसरी, आर्ययुवक ह्रदयसम्राट पंडित नरेन्द्रजी आर्यजगतातील एक अविस्मरणीय व्यक्तिमत्व आहे. स्वातंत्र्य पूर्व आणि स्वातंत्र्योत्तर आर्यसमाजाने जे क्रांतीकारक व भरीव कार्य केले, जी अनेक आंदोलने केली त्यांत पंडितजींचा लक्षणीय सहभाग होता.

पंडितजींनी आपल्या अविरत आत्मशोधाची जी कथा हिंदी भाषेत लिहिली त्याचा मराठी अनुवाद नांदेड येथील एक आर्य समाजी कार्यकर्ते श्री नारायणराव कुलकर्णी यांनी केला असून वाचकांच्या तो पसंतीस पडेल अशी अपेक्षा आहे. श्री. नारायणराव कुलकर्णी यांचे या स्तुत्य कार्याबद्दल मी अभिनंदन करतो.

पंडित नरेंद्रजींना तारुण्यावस्थेतच सामाजिक आणि आध्यात्मिक भान आले होते. जीवनाचा ध्येय-मार्ग त्यांनी निश्चित केला होता. चार चौघा सारखा सामान्य माणसाचा संसार न करता सर्वस्व अर्पण करून देशसेवा व समाजसेवा करावी या भव्योदात्त विचाराने पंडितजी झपाटले होते. 'आत्म-शोध' घेण्यासाठी नगर जिल्ह्यातील उपासनी बाबा, शिर्डीचे साईबाबा यांचे देवस्थान व ख्यातकीर्त 'पंढरपूर' आदी ठिकाणी त्यांनी भटकंती केली. स्वामी दयानंद, समर्थ रामदास आदी प्रमाणे त्यांनी गृहत्याग करून 'आत्म-शोध' घेतला. त्यांच्या आईने पंढरपूरला नरेंद्र असल्याचे कळल्याने तेथे जाऊन शोध घेतला व ते आईकडून 'पकडले' गेले. मातृ प्रेमाने न्हावून निघाल्याने आई बरोबर ते पुनश्च हैदराबादला पोचले. देवस्थानातील एकूण सर्व व्यवहार खऱ्या धर्म प्रेमी पंडितजींना उबग आणणाराच होता. मूर्तिपूजेवरील श्रद्धा उडेल अशीच सर्व परिस्थिती होती. सुदैवाने दिल्लीचे महान तर्क वाचस्पती पं. रामचंद्रजी देहलवी तसेच पंडित बुद्धदेवजी विद्यालंकार (स्वामी समर्पणानंद) यांचे दर्शन पंडित नरेंदजींना झाले. त्यांचे विचार ऐकण्यास व समजून घेण्यास मिळाले व नरेंद्रजी आर्यसमाजी झाले !

हैदराबाद मुक्ति लढा, पंजाबचे हिंदी रक्षा आंदोलन, गोरक्षा आंदोलन, शुद्धि आंदोलन व इतर आंदोलने यांत पंडितजींनी हिरिरीने भाग घेतला. हैदराबादच्या मध्य-दक्षिण आर्य प्रतिनिधी सभेचे ते दीर्घकाळ 'सर्वेसर्वा' होते. पंडित विनायकराव विद्यालंकार (रावसाहेब) आदींचे त्यांना मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यामुळेच ते दक्षिण भारताचे मान्यवर आर्य नेते झाले. हैदराबादच्या विधानसभेत ते काँग्रसचे आमदारही होते. माझ्या आठवणी प्रमाणे सुमारे ३०० रु. त्यांना आमदारकीचे

मानधनही मिळत असे. माझ्या सारखे होतकरू गरीब विद्यार्थ्यांना ते ह्यातून पाच दहा रुपये मदत देत असत. दिगंबरराव होळीकर, जनार्दन वाघमारे, गर्जे आदींनाही त्यांचा स्नेह व आशीर्वाद होता. माझ्यावर १९५४ ते ६० मी हैदराबादला कॉलेजचा विद्यार्थी असतांना त्यांची विशेष कृपा होती.

माझ्या हिंदी मिलाप, आर्य सेवक, आर्य मित्र आदी मधील लिखाणाचे ते खूप कौतुक करीत

'देवदत्त मेरा मानस-पुत्र है' असे मला गौरवित असत. १९६० नंतर मी नांदेडला आलो. व पंडितजींना आर्यसमाजाच्या कार्यक्रमासाठी बोलवीत असे तेव्हा ते अनेकदा आले 'हैदराबाद के आर्यो की साधना और संघर्ष' या ग्रंथात पंडितजींनी माझा आवर्जून उल्लेख केला आहे.

पंडित नारायणराव कुलकर्णी हे माझे दिवंगत घनिष्ट स्नेही डॉ. कुशलदेव शस्त्री यांच्या सहवासात आले. व त्यांच्याकडून लेखन व प्रवासाची प्रेरणा घेऊन आर्य समाजाची सेवा करीत आहेत. प्रस्तुत त्यांनी केलेला अनुवाद मराठी वाचकांना आवडेल असे वाटते. श्री. कुलकर्णी यांच्याकडून भावी काळात भरीव साहित्य-सेवा घडो, हीच शुभकमना !

दिनांक - १७ सप्टेंबर २०१६
हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिन

**- प्रा. देवदत्त तुंगार -**
पत्रकार
माजी विभाग प्रमुख
पत्रकारिता व जनसंवाद विभाग (माध्यम संकुल)
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड - ४३१६०१
भ्रमणध्वनी - ९३७२५४१७७७

## ऊन सावली

माझे आजोबा राय कृष्ण चंद्रजी हिंदी व उर्दू-फारसीचे विद्वान होते. वडील राय केशव प्रसादजींना उर्दू-फारसी मधे आवड व विद्वत्ता होती. माझे मामा राय ठाकुर प्रसादजी हिंदी, उर्दू व फारसीचे उत्तम साहित्यिक होते. त्यांचा शायरीत बराच दबदबा होता, त्यांनी नज्म या टोपण नावाने शायरी केली.

## वतनदारी गेली.

माझे वडील व त्यापूर्वीचे वंशज निजाम सरकारशी एकनिष्ठ होते, म्हणून निजामाने त्यांना वतनदारी अधिकार प्रदान केले होते. ही वतनदारी माझ्या वडिलांच्या मृत्यू पर्यंत आमच्या घराण्यात चालू होती. त्यानंतर एवढा बदल करण्यात आला की, आमच्या घराण्यातील वतनदारीचा अर्धा हिस्सा माझे वडील बंधू राय राजेंद्र प्रसादना मंजूर करण्यात आला. राहिलेला अर्धा हिस्सा नियमानुसार मी दुसरा मुलगा असल्याने माझ्या नावाने मंजूर करण्यात यायला पाहिजे होता पण तो निजाम मीर उस्मान अली खाँ ने आदेश देऊन वतनदारी बंद करण्याची आज्ञा दिली. त्या आदेश पत्रात लिहीले होते की, तुम्हाला वारंवार सुचना देऊनही तुम्ही सरकार व सरकारी धोरणाच्या विरूद्ध सतत अप्रामाणिकपणे व एकनिष्ठ न राहता वागत राहीलात, म्हणून तुमच्या वतनदारी हक्काला जप्त केल्या जाते. या आदेशाचा माझ्यावर काहीच परीणाम झाला नाही. कारण मी पहिलेच दोन गोष्टींचा निश्चय केला होता.

(१) जीवनाच्या खऱ्या उद्देशाचा शोध घ्यायचा

(२) विवाहित जीवनात अडकायचे नाही.

या दोन गोष्टीच्या बाबतीत विचार केला होता. पुढे होणाऱ्या सर्व दुष्परिणामाची पूर्वीच जाणीव होती. मी तसा निर्णय घेतलाच होता, मग मला दुख, कष्ट, विपरीत परिस्थितीची काही आडकाठीच नव्हती. जीवनात पुढे येणाऱ्या अनेक दुर्घटना जितक्या जास्त वाढतील, तितका अनुभव

वाढेल, या वास्तविकतेची मला ओळख पटली होती. प्रत्येक चांगला उद्‌देश पूर्ण करण्यासाठी अनेक संकटांना सामोरे जावे लागते. अत्युच्च्य दुर्गम शिखर पादाक्रांत करावे लागतील. दु:खाच्या जाणीवेला घाबरून ध्येय सोडून जाता येणार नाही. अंधाऱ्या काळरात्री नंतर रम्य पहाट असते तसे, प्रयत्नांची पराकाष्टा केल्या नंतर आनंद मिळेल, या आशेवर, विश्वासावर मी मन शांत ठेवत असे. मनातील येणाऱ्या विकल्पावर मी नियंत्रण ठेवले. पुन्हा एकदा निश्चय केला की, मृत्यू जरी समोर आला तरी हातात घेतलेल्या कामापासून दूर जाणार नाही. एकदा केलेला संकल्प सोडून द्यायला, मी काही असा तसा नव्हतो. मी पूर्ण विचार केला, धैर्य सोडले नाही. मी माझ्या निर्णयावर ठाम राहून सर अकबर हैदरी (नवाब हैदर नवाज जंग) यांना पत्र लिहून कळविले की, मी माझ्या वतनदारी हक्कावर पाणी सोडत आहे. या पूर्वी सदरूल मुहाम नवाब फखयार जंग बहादुर यांनी मला बोलावून समजावत म्हणाले की, ''तुम्ही निजाम सरकारला विरोध करणे सोडून द्या, झालेल्या गोष्टीबद्दल माफीनामा लिहून द्या, तर तुमच्या हिश्याची वतनदारी चालू करून देता येईल.'' पण मी या गोष्टीला कधीही तयार झालो नाही. मी नकार दिला. वतनदारी हक्काचा त्याग केल्याची माहिती माझ्या वडील बंधूना दिली. निजामाच्या या भिकेवर जीवन जगण्यापेक्षा देश, धर्म व मानव सेवा करतांना, वेळ पडल्यास उपाशी मरेन, परंतु निजाम सरकारला माफीनामा लिहून देणार नाही. हे शब्द ऐकून माझ्या भावाचा चेहरा कोमेजून गेला, त्यांनी एक सुस्कारा टाकला. ''ते म्हणाले, जशी तुझी इच्छा, देव तुझे भले करो.'' भावाचे असे आशीर्वादाचे शब्द ऐकून माझा चेहरा प्रुफुल्लित झाला. मनातील दुर्दम्य आशा पल्लवित झाल्या व डोळे आनंदाने चमकले.

## सत्संगांच्या शोधात.

माझ्या समोर माझ्या ध्येयाच्या प्राप्तीचा मार्ग शोधण्याचा महत्त्वाचा प्रश्न होता, की ज्या साधनांचा अवलंब केल्याने माझी इच्छा पूर्ण होईल. त्याच वेळेस पुण्याच्या मेहेर बाबांनी लिहीलेले, 'गरीबों का आसरा'

नावाचे पुस्तक मला वाचायला मिळाले. या ग्रंथात शिरडीचे साईबाबा, साकोरीचे उपासनी बाबा, कीटगावचे नारायण महाराज, नागपूरचे ताजोददीन अवलीया आणि पुण्याच्या श्री बाबा जान चे चरित्र अशा ढंगाने लिहीले होते की, त्याचा मनावर जादू केल्यासारखा प्रभाव पडला. माझ्या मनात अनेक प्रकारचे विचार येत होते. बाबा लोकांच्या चमत्काराने मला आकर्षित केले.

ही घटना त्यावेळेसची आहे. जेंव्हा माझे वडील प्लेगच्या जीवघेण्या आजाराने तडफडत होते. मी त्यांच्या बीमारीची काळजी न करता, भगवान श्री उपासणी बाबा कडून आत्मिक ज्ञान मिळविण्यासाठी हैद्राबादहून अत्यंत श्रद्धेने पायी चालत साकोरीला जाऊन पोंहचलो. हा खडतर प्रवास मी बावीस दिवसात पूर्ण केला. मार्गात येणाऱ्या गावातील, प्रत्येक मंदिर माझे घर होते. ‘दाण्या दाण्यावर खाणाऱ्याचे नाव लिहीलेले असते‘ या म्हणीनुसार तेथील मंदिराच्या पुजाऱ्याच्या अन्नात माझा हिस्सा होता. चालून चालून पाय सुजले. कडाक्याची थंडी होती. अंगावर पुरेसे कपडे नव्हते, अनवानी पायाने चालतांना मनात फक्त परमेश्वराचे चिंतन चालू होते. शरीरावर सर्दीचा प्रभाव झाला. पायात ताकत नव्हती, परंतु मनातील दर्शनाच्या अभिलाषेने, पाय पुढे चालत होतो. शेवटी तो दिवस आला, जेव्हा मी उपासनी बाबाच्या गावात जाऊन पोंहचलो. तेव्हा मला जाणवले की मी नरकातून निघून स्वर्गात आलो आहे. सूर्यास्त होत होता. संध्याकाळची वेळ होती. माझा नवा चेहरा पाहून धर्मशाळेत थांबण्याची परवानगी मिळाली नाही. रात्रभर बेचैन होतो.

## भवबंधनाच्या बाहेर

सूर्योदयापूर्वी साडेचार वाजता उपासनी बाबाच्या आरतीला प्रत्येक व्यक्तीला, जे तेथे राहतात त्याना जावे लागत होते. मी ही दर्शनाला गेलो. आरती झाली. बाबा एका लाकडाच्या बनविलेल्या पिंजऱ्यात राहात होते. सर्व लोकां बरोबर मी ही बाबांच्या चरणांना स्पर्श करून वंदन केले. असाच हा क्रम महिनाभर चालला. एके दिवशी बाबांनी मला विचारले की तू कुठे राहणारा आहेस ? मग काय ‘बुडत्याला काडीचा आधार‘ या म्हणी

प्रमाणे झाले. मी माझ्या मनातील इच्छा आकांक्षा सांगितल्या. त्यांना विनवणीच्या स्वरात, या दरबारात उपस्थित होण्याचे कारण विचारले की, ‘मनुष्य जीवनातील त्या मुख्य उद्‌देशाच्या रहस्याला माहीत करून घेणे व ते कसे प्राप्त करून घेता येते ?‘ उत्तर मिळाले की, ‘मंदिरात भजन कर. बाहेरून भिक्षा मागून आणून त्यावर उदर निर्वाह कर‘ बाबा पुढे म्हणाले, ‘दररोज माझ्या प्रवचनाला येत जा. गुरूचे दर्शन व दत्तात्रय महाराजांच्या कृपेने तुझे जीवन सफल होईल.‘ या आशीर्वादाने तन, मन उत्साहित झाले. जीवनात आशेचा किरण दिसू लागला. आता भवबंधनातून पार होता येईल. गुरू हाच सर्व काही आहे, जसे की म्हंटल्या जाते, गुरूर्ब्रह्मा, गुरूर्विष्णु, गुरूर्देवो महेश्‍वरा! या श्रद्‌धेने रात्रंदिवस ईश्वरचिंतनात काही महिने गेले. बाबा जवळ काही कल्याण होऊ शकले नाही. प्रभू मार्गातील हा दास, आकांक्षेचे ओझे तसेच डोक्यावर घेऊन, साईबाबाच्या शिरडीला जाऊन पोंहचलो.

## दैवी चमत्कार

साईबाबाच्या समाधीचे दर्शन घेतले. तेथे चार दिवस थांबून नारायण महाराजांचे दर्शन घ्यायला कीटगांवला गेलो. तेथला थाट माट, ब्राह्मणांचा ब्राह्मणेतरांच्या सोबतचा भेदभाव, इतका मोठा होता की तेथे थांबण्याची इच्छा राहिली नाही. ईश्‍वर भक्तांच्या दरबारात हा भेदभाव आणि माणसातील घृणेचे, तिरस्काराचे वातावरण पाहून मनाला धक्का बसला. धर्म शाळेत एक भक्त राहात होते, ते म्हणाले, ‘‘हे सर्व संत ज्यांची भक्ती करून इतक्या मोठ्या पदाला जाऊन पोंहचले, ‘‘मग तुम्ही तेथेच का नाही जात?‘‘ मी विचारले,‘‘ ते ठिकाण कोणते आहे ? भक्त म्हणाले, ‘‘ते पंढरपूर आहे,‘‘ भक्तजींनी दाखविलेल्या गोष्टींच्या आधारे, मी कीटगावहून पंढपूरकडे निघालो. बारा दिवसाच्या पायी प्रवासानंतर पंढरपूराला येऊन पोंहचलो. तेव्हा असा अनुभव आला की, रणरणत्या उन्हातून निघून शीतल छायेत आलो. तेथे काही महिने घालविले. तेथील वातावरणाचा अभ्यास केल्यावर फार कटू अनुभव आले. त्यामुळे माझे डोळे उघडले. पंढरपूरातील कहानी माझ्या जीवनाला वेगळे वळण देणारी ठरली.

मी या घटनेला दैवी चमत्कार समजतो. माझ्या भटकलेल्या आत्म्याला शुभ मार्ग दिसला. आता मी अंधविश्वासाच्या अंधाराच्या अंतिम सीमेपर्यंत जाऊन पोंहोचलो होतो, मनाला हादरवून सोडणारी घटना आठवली की, काळीज थरथर कापते. जो पर्यंत माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहतील, तो पर्यंत ही दुर्घटना कायम मनात राहील. एकादशीच्या दिवशी, विशेषत: महाराष्ट्रात, प्रत्येक लहान मोठी व्यक्ति, उपवास करत चंद्रभागेच्या काठावर भजनी मंडळी, भक्तजण सकाळ पासून दुसऱ्या सकाळ पर्यंत नाचत, भजने म्हणत राहतात. मी ही रात्रभर भजन करीत होतो. डोळ्यातील झोप हरवली होती. 'विठ्ठल, विठ्ठल' म्हणत रात्र केव्हाच संपून गेली. पहाटे चारला मी चंद्रभागेत स्नान केले. संत नामदेव महाराजांच्या मंदिरात पहारा (तीन तास गळ्यात वीणा घालून वाजवत भजन म्हणावे लागते) देण्यासाठी जात होतो. एकाएकी माझ्या पायाला एका रेतीच्या ढीगाचा धक्का लागला. खालून रडण्याचा मंद आवाज येत होता. माझा असा समज झाला की, कोणते तरी जनावर असावे. मी विचार करत तसाच तेथे पुतळ्यासारखा उभा राहीलो. एका माणसाने विचारले, ''काय झाले ? का चिंता करता? पुतळ्या सारखे का उभे आहात?'' मी म्हणालो, 'तुम्ही तुमच्या रस्त्याने जा. तुम्हाला काय वाटते की, मी तमाशा दाखवायला येथे उभा आहे? मी वेडा नाही. तुम्हाला ऐकू येत नाही का ? या वाळूतून रडण्याचा आवाज येत आहे. कान असून बहीरे आहात का ?'' त्या माणसांने मला मराठी भाषेत सांगितले की,ही रोजचीच दु:खद कहानी आहे. भारतातील सर्वात जास्त विधवा पंढरपुरात आहेत. आता अनाथाश्रमातील लोक येतील. या वाळूच्या ढीगावरून या नवजात बाळाला घेऊन जातील.'' मी तसाच उभा राहिलो. विचारांच्या वादळांनी थरथरत होतो. भावनेच्या भरात मी मनात म्हणत होतो की, या पवित्र ठिकाणी असे कुकर्म ! 'काय ते हेच ठिकाण आहे,' जेथे विठोबाने पुंडलिकाला आशीर्वाद दिला होता ? जेथे संत तुकाराम महाराजांनी झोपी गेलेल्या मनुष्य जातीला उठविले होते. ज्ञानेश्वर, नामदेव, सोपान, मुक्ताबाई सारख्या प्रभू भक्तांनी भक्ती अन् मुक्तिचा मार्ग प्राप्त केला होता.

आपल्या गीतांनी जनतेत क्रांती उत्पन्न केली होती. ते गीत आजही चंद्रभागेच्या धारेत व वातावरणात प्रतिध्वनीच्या रूपात ऐकू येतात. काय हा तोच महाराष्ट्र आहे जेथे समर्थ रामदासांनी त्यांच्या गीतांच्या माध्यमातून वैराग्याचे सूर फुंकले होते.

पंढरपुरात ईश्वर कृपेने एका धार्मिक श्रीमंत हिंदुने अनाथालय स्थापन केले होते, जेथे अनाथ बाळांचे संगोपन केले जाते. अनाथालयाची व्यवस्था अति उत्तम व प्रशंसनीय होती. आश्रमाचा सेवक आला आणि त्याने वरची वाळू काढली. आत कपड्यात गुंडाळलेल्या लेकराला उचलून तत्परतेने अनाथालयात नेऊन पोंहोचविले. मीही त्या आश्रमाच्या सेवकासोबत चालत गेलो. आश्रम पाहिला, तेथे अनेक बाळ होते. उमललेल्या फुलाप्रमाणे त्यांचे चेहरे खुलले होते. ओठांवर हसू, तर कुणी पाय आपटत होते, कुणी बंद मुठीचा अंगठा तोंडात धरून चोखत होते, तर कुणी रडत रडत आपले नशीब, विवशता व मानव जातीच्या कलंकावर अश्रू गाळत होते.

## पकडला गेलो.

मी काही मिनिटे मुलांच्या प्रेमळ जगात स्वत:ला विसरलो होतो. विमनस्क अवस्थेत चंद्रभागा नदीच्या किनाऱ्यावर हळू हळू पावले टाकतांना, विचार आला की, हिंदू धर्माच्या पतनाचे हेही एक कारण आहे. पंढरपूरात विधवांची संख्या खूप मोठी होती. कारण नऊ, दहा वर्षांच्या मुलींचे विवाह केल्या जात होते. मुले मोठी झाल्यावर, शिक्षण घेतल्यावर अशिक्षित मुलीला सोडून देतात आणि वयस्कर पुरुषांशी त्यांचा विवाह झाल्याने मुली विधवा होतात. बाला – जरठ विवाह अशा प्रकारच्या घटनांनी करोडो वर्षाची जुनी व विशाल हिंदू जात अध:पतित होत आहे.

पंढरपूरचे देव यांना मार्गदर्शन करू शकत नाहीत, तर माझी जीवन नौका कशी किनाऱ्याला लागेल ? गुन्हेगारांच्या या वस्तीत माझे जीवन कसे जाईल ? या विचारांने मन उचाट खाल्ले. माझ्या आशा, आकांक्षा धुळीला मिळाल्या. डोक्यात वीज चमकली. हृदयात उगवत असलेला सूर्य तेथील काळ्या ढगांनी झाकला गेला, काय विचार केला

होता, काय झाले? निराश अवस्थेत, जीवनातील अपयशावर रडत, नशीबावर नाराज होत, नामदेव महाराजांच्या मंदिराकडे जात होतो. इतक्यांत माझी पूज्य आई व एक पाहूणे साहबरॉयजी समोरून येतांना दिसले. आम्ही दोघांनी एकमेकांना पाहीले. मला पाहून आईचे मन भरून आले. प्रेमाने तिने मला आपल्या बाहू पाशांत घट्ट पकडले. तिने माझ्या डोक्यावर हात ठेवून म्हंटले, ''माझ्या बाळा ! तू घरचा राजा असूनही जंगलात फकीर होऊन फिरत आहेस, पाहा हो साहबरॉयजी ! माझ्या मुलाकडे. चल बाळा, तू बोलत का नाहीस ?'' मी शांत उभा होतो. माझ्या मनात अनेक प्रश्न उठत होते. मी येथे असल्याचा यांना पत्ता कसा लागला ? मला कोण धोका दिला असेल ? आता मी काय करू ? या सर्व प्रश्नाने माझे डोके सुन्न झाले होते. शेवटी आईच्या डोळ्यातून निघालेल्या आसवांनी त्यांचे काम केले. मी, आई व साहेबरॉयजी मंदिराकडे गेलो.

मनात हे जाणून घेण्याची उत्कंठा वाढत होती की, यांना माझा पत्ता कसा लागला. ? तेंव्हा साहबरायजींनी सांगितले की, हैद्राबादच्या सुप्रसिद्ध संत भटजी बापूचा एक भक्त श्री शेषगिरीरावांनी मला येथे पाहिले. ते मला ओळखत होते. त्यांनी आईला मी येथे असल्याचे व त्वरीत येथे येण्याच्या तारेने कळविले. ही घटना सन १९२८ ची आहे. त्यावेळेस माझे वय अठरा वर्षाचे असेल.

## मातृदेवो भव

आई 'घरी चल' म्हणून आग्रहाने सांगत होती. मी रात्रभर विचार करत होतो. डोळा लागला नाही. सकाळच्या थंड हवेत मला गाढ झोप लागली. सकाळी आठला उठलो. पुन्हा प्रश्न पडला की, आईला काय उत्तर द्यावे ? एकीकडे पंढरपूरची पापमय गाथा, तर दुसरीकडे आईची ममता, या दोन्ही पैकी कुणीकडे जावे ? याचा निर्णय झाला नव्हता. आई म्हणाली, ''बाळा! तुझे बाबा मरता मरता वाचलेत. तुला पाहायला तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसले आहेत. तू माझ्यावर दया कर, हैद्राबादला चल. तेथेही ईश्वर भक्ती होऊ शकते.'' आईच्या बोलण्याचा माझ्या मनावर प्रभाव पडला. मी दोन दिवस पंढरपूरात थांबून आई सोबत हैद्राबादकडे निघालो.

घराच्या दरवाजा बाहेर, बहिणी, भाऊ, शेजारी माझी अशी वाट पहात उभे होते की, जसे काय नवरदेवाचे लगेच स्वागत होणार होते. घरात प्रवेश करताच मला आतल्या घरातून बाबांचा क्षीण आवाज आला, ''मुला! इकडे ये !'' माझे लक्ष्य तिकडे गेले, बाबा अंथरूणावर झोपून होते. आजाराच्या कमजोरीने त्यांचे हिंडणे फिरणे बंद झाले होते. मी त्यांच्या पायांना स्पर्श करून त्यांच्या जवळ बसलो. घरचे सारे वातावरण आनंदाने बहरून गेले होते. सगळे माझे स्वागत करीत होते. असेच दिवस जात होते. दोन महिने एकांत व शांत वातावरणात गेले.

## वादळाची सुरूवात

त्या दिवसांची गोष्ट आहे. हैद्राबाद राज्यात सिद्दीक दीनदार चन्न बसवेश्वर नावाच्या व्यक्तीने, स्वत:ला लिंगायत मताचा अवतार आहे, असे दाखवून हुबळी, धारवाड, म्हैसूर, गुलबर्गा आणि रायचूर इत्यादी भागातील भोळ्या भाबड्या ग्रामीन लिंगायत बंधुंना तसेच इतर हिंदूना मुसलमान बनविण्याचे काम करीत होता. त्याला गुप्तपणे निजाम सरकारचा पाठींबा होता. निजाम सरकारचा धार्मिक विभाग, धर्म परिवर्तनासाठी भरपूर पैसा देत असे. हिंदू व लिंगायत लोकात या घटनेने खळबळ माजली. त्यांनी या विषयावर विचार करण्यास प्रारंभ केला. सिद्दीक दिनदारच्या कपटी, चलाखी, धोकेबाज कारस्थाना पासून जनतेला सावध करावे, निजाम सरकार-हैद्राबादने येथील मुसलमानांमध्ये ''जरी तुम्ही अल्पसंख्य असला तरी तुम्ही शासक आहात, कारण तुमचा शासक मुसलमान आहे,'' असे म्हणून त्यांच्यात श्रेष्ठत्वाची भावना निर्माण केली होती. आपल्या विचाराच्या समर्थनार्थ निजामाने त्याच्या एका गजलेच्या अंतिम ओळी अशा लिहिल्या होत्या.

सलातीन सलफ सब हो गये नज्रे अजल उस्मान !
मुसलमानों का तेरी सल्तनत से है, निशा बाकी !!

आता पर्यंत किती तरी मोठमोठे राजेमहाराजे होऊन गेले. त्यांनाही मृत्यूने सोडले नाही. पण मुसलमानासाठी एकच गोष्ट भाग्याची आहे की,

तुमचा राजा मुसलमान आहे.

हैद्राबाद राज्याचा शासक नवाब मीर अस्मान अली खाँ च्या इस्लामी धर्मांधतेचे एक उदाहरण काव्याच्या या दोन पंक्तीतही दिसते

बंद नाकूस हुआ सुनके नदा–ए–तकबीर!
जलजला आ ही गया रिश्त–ए–जुनार पे भी !!

मशीदीतील आजान सुरू होताच, मंदिरातील शंखाचा आवाज बंद झाला. पुजारी घाबरले व त्यांचे जाणवे भूकंप आल्यासारखे थरथरू लागले.

सिद्दीक दीनदार ने मोठ्या प्रमाणावर तबलीग (धर्म परिवर्तना) चे काम हैद्राबाद व म्हैसूर राज्यात पसरविले होते. त्याने 'सरावर आलम' नावाचे पुस्तक प्रकाशित केले होते, ज्यात योगेश्वर श्रीकृष्ण व हिंदू देवतांची निंदा केली होती. या पुस्तकाच्या विरूद्ध आर्यसमाज सुलतान बाजारचे मंत्री श्री चंदुलाल, जे की त्या वेळेस आर्यसमाजाचे धुरंधर नेते होते, त्यांनी या कामाला सामोरे जाऊन, हिंदूत जागृती निर्माण केली. चंदुलालजींच्या सोबत असलेल्या सर्वश्री बंसीलाल व्यास, मुन्नालाल मिश्र, मोहनलाल बलदवा आणि मोहनाचार्य यांना हैद्राबादची जनता केव्हाही विसरू शकत नाही. त्यांनी आपले तन, मन, धन हे आर्यसमाजाच्या सेवा व प्रचार कार्याला समर्पित केले होते. या चार धर्मात्म्यांनी हैद्राबादेतील हिंदुवर होणाऱ्या अत्याचार, त्रास व अनाचाराच्या विरूद्ध आवाज उठविला, म्हणून त्यांना निजाम सरकार कडून छळ सहन करावा लागला. दिल्या गेलेल्या कष्टांना बळी पडावे लागले.

## नवा रस्ता

काही दिवसानंतर, सिद्दीक दीनदारचे कपट उघडकरण्यासाठी व इस्लाम धर्माची खरी माहिती लोकांना देण्यासाठी, १९२९ या वर्षी श्री. चंदुलालजीनी, दिल्लीचे सुप्रसिद्ध कुराण पंडित रामचंद्रजीं देहलवींना भाषण देण्यासाठी बोलाविले. हैद्राबादेतील सर्व सामान्य लोकात चर्चा सुरू झाली की, अरबीचे एक आर्यसमाजी विद्वान वक्ते आलेले आहेत. त्यांचे भाषण ऐकायला पाहीजे. सुलतान बाजारातील देवीदीन बागेत पंडित रामचंद्रजी देहलवींचे विभिन्न विषयावर पाच दिवस भाषण झाले. एक दिवस झाल्यावर श्री. बंसीधरजींनी मला पंडित रामचंद्र देहलवीजींचे भाषण ऐकण्यासाठी

मजबूर केले. त्यांनी मला आपल्या सोबत नेले. देवीदीन बागचे मैदान श्रोत्यांनी गच्च भरले होते. समुद्रात जसे किती दूर पाहिले तर पाणी दिसते, तसे तेथे जिकडे तिकडे स्त्रीपुरूष दिसत होते. श्रोत्यांच्या नजरा पंडितजींच्या वाटेकडे वळलेल्या होत्या. एका कोपऱ्यातून जयनाद झाला, ''जो बोले सो अभय, वैदिक धर्म की जय !'' सर्व सभा घोषणा देत होती.

थोड्याच वेळात त्या जनसमूहातून एक भक्कम बांध्याचे महापुरूष ज्यांच्या डोक्यावर पागोटे बांधले होते, शेरवानी घातलेले, त्यांच्या मिशा लांब होत्या, ते हात जोडून जनतेला 'नमस्ते' म्हणत होते. त्यांना त्यांच्यासाठी बनविलेल्या उंच व्यासपीठावर घेऊन जाण्यात आले. तेथून उभे राहून त्यांनी सर्व दिशांना हात जोडून अभिवादन केले. घड्याळात सहा वाजत असतांना मध्यम उंचीच्या एका खादीधारी वृद्ध सज्ञनांनी उंच आवाजात म्हंटले, ''बंधुनो ! आता दृष्टांत सम्राट, मधुरभाषी व कुरानाचा अभ्यास असणारे वक्ते पंडित रामचंद्रजी देहलवी भाषण करतील.'' ते वृद्ध सज्ञन आर्यसमाजचें प्रसिद्ध नेते व मंत्री श्री. चंदुलालजी होते. पंडित रामचंद्रजी देहलवींजी श्रोत्यांना संबोधित करतांना म्हणाले,'' आजच्या माझ्या भाषणाचा विषय आहे,

**''परमात्मा–आत्मा आणि भौतिक पदार्थांची प्राचीनता.''**

मी आर्यसमाजी लोकांसंबंधी थोडीफार साधारण माहिती ऐकली होती. हे लोक मूर्तिपूजेचे कट्टर विरोधी आहेत. हे हिंदूधर्माच्या मूलभूत सिद्धांताना मानीत नाहीत. हिंदूधर्मातील वर्णव्यवस्था समाप्त करून अस्पृशांचे ब्राह्मणांशी रोटीबेटी संबंध स्थापन करण्याचे प्रयत्न करतात, जे हिंदुधर्माच्या नियमाच्या विरूद्ध आहे. मला या सिद्धांतात कोणतीच रूची अथवा आवड नव्हती, पण घृणा या गोष्टीची होती की, हे लोक देवाचे अवतार मानत नाहीत. मी पंडित रामचंद्रजी देहलवींचे भाषण एका तासापेक्षा जास्त वेळ ऐकत होतो.

## अंधारातून प्रकाशाकडे.

पंडित रामचंद्रजी देहलवींनी एक ईश्वर आणि आत्मा, तसेच भौतिक पदार्थाच्या प्राचीनतेवर भाषण देतांना वेद व कुराणाचा संदर्भ व

प्रमाण देऊन मोठ्या तर्काने असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की या तिन्ही वस्तू आदिकाळापासून आहेत. या भाषणाचा माझ्यावर जादूसारखा परिणाम झाला. पंडितजींनी दिलेल्या प्रमाणांनी बुद्धीला विचार करायला भाग पाडले व मनाला नवी दिशा मिळाली. मी सभेतून परत आल्यावर रात्रभर तेच विचार करीत राहिलो की, खरेच ईश्वराला अवतार घेण्याची काय आवश्यकता आहे ? मूर्तीत देव नाही का ? विचार करता करता बरीच रात्र झाली. मला झोप केव्हा लागली ते कळले नाही. सकाळ झाली. नित्य नियमानुसार स्नान करून पूजा करायला गेलो. मूर्तीच्या समोर बसलो. काल ऐकलेले तर्क, प्रमाण आठवू लागलो. माझ्या डोक्यात शंका आली की 'खरेच मी ज्याची पूजा करीत आहे, त्यात देव आहे का ?' खूप वेळ मी कोणताही निर्णय घेत नव्हतो. सजीव आत्म्याने कोणत्यातरी निर्जीव वस्तु पुढे डोके झुकवावे का ? ज्या मुर्तीला मनुष्याने घडविले तो देव माझा भाग्य विधाता कसा होऊ शकतो ? दत्तात्रय महाराजांची मूर्ती गुपचूपणें माझ्या खोलीतून उचलून आईच्या देवघरातील देवांच्या संख्येत आणखी एकाची वाढ केली. पंडित रामचंद्रजी देहलवींचे सकाळचे भाषण ऐकायला सुलतान बाजारातील देवीदीन बागेत गेलो, मंडप खचाखच भरला होता. एक गोरे, धष्ट पुष्ट, डोक्यावर केस विंचरलेले, शरीरावर शर्ट आणि तहमद बांधलेले पंडितजी, ज्यांचे नाव बुद्धदेव विद्यालंकार होते, ते 'ईश्वराचे सर्व व्यापकत्व' या विषयावर वेद मंत्राचे पुरावे देत सिद्ध करत होते की, 'ईश्वर एक देशी नसून सर्व व्यापक आहे, सर्व ठिकाणी आहे, सर्व वस्तूत आहे, पण सर्व वस्तू देव नाहीत, जसे उदाहरण म्हणून जल, अग्नी, आकाशात तो आहे, पण या वस्तू देव नाहीत. भगवंताच्या गुण कर्माची व्याख्या पंडितजींनी सोप्या, साध्या, सरळशब्दात जनतेसमोर मांडली. सरस्वती त्यांच्यावर प्रसन्न होती. त्यांच्या व्याख्यानाने माझे हृदय तृप्त झाले. दुसऱ्या दिवशी सुलतान बाजारातील गोपाळ बागेत राजा नारायण लाल पित्तीजींच्या बंगल्यावर मी गेलो. तेथे विद्वानांची राहण्याची व्यवस्था केली होती. गादीवर पांढरीशुभ्र चादर, पाठीमागे गोल तकिया वर गोऱ्या रंगाचे, भारदस्त, उंचीला कमी, पोट मोठे अशी व्यक्ती विराजमान झालेली पाहिली.

त्यांच्या पुढे मारवाडी पद्धतीची खाते वही होती. ''मी त्या व्यक्तींला विचारले, मी या वेळेस पंडितजींना भेटू शकतो का?'' ते म्हणाले, ''या वेळेस ते जलपान करीत आहेत. बाहेर आल्या नंतर त्यांना भेटता येईल.'' माझ्या मनात राहून राहून विचार येत होता की यांचा परिचय करून घ्यावा. ते सज्जन, शांत, दयाळू दिसत होते. मी हिम्मत करून त्यांचे नाव जाणून घेण्यासाठी विचारले, कृपा करून, आपण आपले नाव सांगाल का ? ते म्हणाले, माझे नाव गजानंद गुप्त आहे. हे बोलणे संपलेही नव्हते की, पंडित बुद्धदेवजी विद्यालंकार बाहेर आले. मी उठून त्यांच्या चरणांना स्पर्श केला आणि अधिक माहिती मिळविण्यासाठी, मी माझ्या शंका त्यांच्या समोर मांडल्या.

माझ्या प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळत होते. मन शांत झाले. आता माझे विश्व बदलले होते. मनातील नविन चेतना आणि सत्य जाणून घेण्याची जिज्ञासा पूर्णत्वाकडे जाऊन पोंहोचली होती. घरी आलो व वडिलांच्या खिशातील एक रूपया काढून घेऊन सभेच्या ठिकाणाकडे निघालो. तेथे जाऊन मी पहिले काम काय केले असेल तर ते पन्नास पैसे देऊन उर्दू 'सत्यार्थ प्रकाश' विकत घेतला आणि वाचायला सुरूवात केली. सत्यार्थ प्रकाशचा जादूसारखा प्रभाव माझ्यावर वाढत चालला. त्याच दिवसात हैद्राबाद मधील दोन प्रसिद्ध आर्यसमाजी नेत्यांशी माझी भेट झाली. त्यांचे नाव पंडित केशवराव कोरटकर हाईकोर्टाचे जज आणि चंदुलाल आर्य होते. जे कोणी भेटतील त्यांना विचारले तर सर्वांनी या दोघांचे नाव सांगितले. हैद्राबादेत या दोघांच्या नावाची जोरदार चर्चा चालू होती. केशवरावजींना लोकप्रियता मिळाली होती. लोक त्यांना 'नेते' मानत ते एक निडर, धैर्यशाली व नि:स्वार्थ व्यक्तिमत्व होते. हैद्राबादेत त्यांची सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील मोठेपणा व विद्वत्ता अत्युच्च शिखराप्रमाणे होती. या दोन्ही व्यक्तीच्या त्याग, सेवा व सचोटीची, सर्व लोकात चर्चा होती. चंदुलालजी आर्यसमाजाचे प्राण होते. त्यांनी एक दिवस मला जवळ बोलावून घेऊन सांगितले की, ''तुम्ही आर्य समाजात अवश्य येत जा. समाज तुमच्या स्वागतासाठी तयार आहे.''

## दिशा बदलली

आता विचारांची दिशा बदलली होती. मी शिक्षण सोडले होते. 'आता न कमवता घरची बिनकष्टाची भाकरी खायची नाही,' असे मन म्हणत होते. नौकरीच्या निमित्ताने अनेकाकडे जावे लागले. शेवटी नवाब रसूलयार जंग बहादुरच्या जहागिरी कार्यालयात पंचवीस रूपये मासिक पगारावर नौकरी मिळाली, पण ही नौकरी जास्त दिवस टिकली नाही. माझे भावजी राय हरिकिशनजीचे लहान बंधू भाई चंद्रकिशनजींनी 'सर्फे खास' (निजामाचा स्वत:चा विभाग) मध्ये व्यवस्थे-संबंधीच्या कार्यालयात पन्नास रूपयांच्या नौकरीवर माझी नेमणूक केली. मग काय ? माझ्या आनंदाला उधान आले. पहिला पगार मिळाल्यानंतर आर्य समाजात जाऊन, मी चार आण्याचा सदस्य झालो. माझ्या जीवनातील हा पहिला दिवस होता, जेव्हा मी आर्यसमाजाचा स्वीकार केला. असे वाटू लागले की जणू काही आता मी आपल्या पतंगाची दोरी देऊन उंच भरारी मारत आहे. अशा प्रकारे मी आर्यसमाजी झाल्याची ही थोडक्यात, जुनी आठवण ! माझ्या जीवनाची दिशा काहीशी अशा प्रकारे बदलली.

अगलासा वह मिजाज वो आदत न रही !
वो हम नही रहे, वह तबीयत नही रही !!

मी काल पर्यंत परमेश्वरांच्या प्राप्तीसाठी दारोदार हिंडत होतो पण कांहीही मिळाले नव्हते, पण 'सत्यार्थ प्रकाश' या ग्रंथाने परमेश्वराचे दर्शन व मनुष्य जीवनाचा खरा मार्ग दाखविला. मनन व चिंतनाने डोळे उघडले. पाखंडाचे जाळे तुटून गेले. सत्याशी नाते जुळले. जीवनरूपी घड्याळाचे काटे जे की उलटचा दिशेने फिरत होते, ते आता वाईट रूढींना सोडून खऱ्या दिशेने फिरू लागले.

वैदिक धर्माच्या मार्गावर चालतांना मध्येच एक मनोरंजक घटना झाली. माझ्या एका पाहुण्याने माझ्या मनात विवाह करण्याची इच्छा निर्माण केली. दृढ निश्चयाला डावलून मी लग्न करण्याचे ठरविले.माझ्या एका मित्राच्या सल्ल्याने मुलगी पाहण्याचा कार्यक्रम बनविला. मी व माझा एक मित्र

करीमनगरला जाऊन पोंहोचलो. वाटेत अपशकून झाले. आम्ही बसमधून उतरलो होतो की समोरून मांजर आडवे गेले. मित्र म्हणाला, हे ठीक झाले नाही मुलीच्या घरीही जाऊन आम्ही पोहोचलो नाही की इतक्यात वाटेतच आम्हाला समजले की त्यांच्या घरी कुणाचा तरी मृत्यू झाला आहे. कसा तरी मी लग्नाला तयार झालो होतो, पण त्यावर पाणी पडले. शुक्रवारी संध्याकाळी ५ वा. आर्यसमाजाच्या सत्संगाला उपस्थित राहिलो. त्यावेळी स्वामी व्रतानंदजी महाराजांचे प्रवचन चालू होते. सत्संगातून मी घरी आलो. मी ठरविले की कौटुंबिक जीवनाला कायमचे दूर करून साधेपणाने जीवन जगायचे ! पूर्व निर्णयाच्या विरूद्ध कोणतेही काम न करता, संकल्पाला दररोज दृढ करीत राहायचे. अशा प्रकारे माझा निश्चय पूर्णत्वाकडे जात होता. माझ्या मनातील हेतू साध्य झाला, माझे मन नियंत्रित झाले. माझ्या बदलत्या जीवनातील कामाला पाहून माझ्या घरी व शेजारील लोकांना आश्चर्य वाटू लागले. आता ढोंग पाखंड, अंधश्रद्धेच्या अंधारातून निघून सत्यार्थ प्रकाशात जीवनाचा प्रवास सुरू झाला. झंझावाताचा सामना करण्याचा निश्चय केला. कर्मभूमीत मजबूत पाय रोवून उभे राहतांना आनंद व स्वाभिमानाचा अनुभव घेत होतो. मनातील गुंता सुटत होता. माझा थकवा दूर झाला. जीवनयात्रेचा दुसरा टप्पा येथून सुरू झाला. येथून मी प्रत्येक कामात यश मिळवत पुढे गेलो.

## जीवन यात्रेचा दुसरा टप्पा.

आर्य समाजात नियमानुसार कसा प्रवेश घ्यावा ? याची माहिती मिळवून मी आर्यसमाजचा सदस्य झालो. साप्ताहिक सत्संगात जायला सुरूवात केली. विद्वानांची व्याख्याने ऐकून त्यावर चिंतन मनन करणे सुरू झाले. माझी इच्छा होती की, त्या सिद्धांताना आत्मसात करून मी प्रचारक व्हावे. त्याच वेळेस पंडित चंद्रभानुजी सिद्धांतभूषण यांना हैद्राबादेत प्रचारक म्हणून बोलविले होते. ते येथे एक वर्षा पेक्षा जास्त दिवस प्रचार कार्य करीत होते. ते वेदांचे प्रकांड पंडित होते. ते उत्तम वक्ते होते. त्यांनी विवेकवर्धिनी विद्यालयात पौराणिक लोकांशी विधवा विवाहावर शास्त्रार्थही केला होता. मीही कधीकधी त्यांच्या सोबत प्रचारासाठी जात होतो. पंडितजींच्या

सत्यप्रियतेला सरकार जास्त काळपर्यंत सहन करू शकले नाही. निजाम सरकारच्या गृहखात्याने पंडितजींना परका आणि उपद्रवी व्यक्ती घोषित करून राज्याच्या बाहेर हाकालले, पण पंडितजींच्या सहवासाने माझी लालसा पूर्ण झाली. मला रस्ता मिळाला. पंडितजींनी मला उपदेशक विदयालय लाहोरला जाऊन शिक्षण प्राप्त करण्याचा सल्ला दिला. एवढेच नाहीतर विद्यालयाचे आचार्य पूज्य स्वामी स्वतंत्रानंदजींच्या नावाने पत्र लिहून सादर कळविले होते की मला या विद्यालयात प्रवेश देण्याची कृपा करावी.

मी पंडितजींनी लिहिलेल्या पत्राच्या उत्तराची प्रतीक्षा करीत बसलो होतो. जेव्हा पोस्टमन दार खट खट वाजवी, तेव्हा मी मोठ्या आशेने पळत असे की कदाचित मला अपेक्षित अशा पत्राचे उत्तर आले असेल, कारण मी या पत्राला वडील अथवा भावाच्या हातात पडण्यापासून वाचवू इच्छित होतो. वाट पाहाण्यात कितीतरी दिवस गेले. मी माझ्या नशीबाला दोष देत होतो की, मी विद्यालयात प्रवेश घेण्यास पात्र ठरलो नसेन. मी सारखी पत्रे लिहीत होतो. धैर्य गळून जात होते. किती तरी प्रश्न मनात येत असत एके दिवशी मी निराश झालो. पोस्टमन येऊन एक लिफाफा देऊन गेला. घरी आई शिवाय दुसरे कुणी नव्हते. आईने पत्र घेऊन येऊन मला उठविले व मला ते पत्र दिले ! हे पत्र माझ्या महत्त्वाकांक्षेचा आधार बनून आले होते. त्यात लिहिले होते की, 'एका महिन्यानंतर उपदेशक विद्यालयाचे नविन सत्र सुरू होईल. त्यात मला प्रवेश मिळेल.' मग काय पाहायचे, माझी तयारी सुरू झाली. आई वडिलांना समजावले, पण ते ऐकले नाहीत. माझ्या संकल्पाला आईची ममता व पित्याचे प्रेम रोखू शकले नाही. आमच्या विचारांना विरोध होत होता. शेवटी तो दिवसही आला, मी हैद्राबादहून लाहोरकडे निघालो. ही घटना सन १९३० ची आहे.

मी लाहोरकडे निघणार होतो, त्या दिवशी घराला निरोप समारंभाचे स्वरूप आले होते. जो कुणी येई तो हे म्हणे की, ''वृद्ध आई वडिलांना सोडून जात आहेस, आई वडिलांची सेवा कर ! काय ही आजकालची पोरे ! आई वडिलांना रडवित दु:खात सोडून जात आहेस ! याच दिवसासाठी त्यांनी तुझे पालन–पोषण केले होते काय? व हृदयात दया येत नाही का ?

आजकालच्या तरूणांची मने दगडाची बनलेली आहेत. मोहमायेचा यांना थोडाही संबंध नाही.'' सगळ्यांचे हे म्हणणे मी ऐकत होतो. स्टेशनला जायची वेळ जवळ येत होती. मी स्टेशनला निघण्याची तयारी करीत होतो. घरात रडण्याचा धडाका चालू होता. सर्वांच्या डोळ्यात पाणी होते. सर्व नातेवाईक, मित्र शेजारी आपल्या आसवांची आशीर्वादरूपी मौक्तिके माझ्यावर उधळीत होते. माझा दृढ. निश्चय एवढा मोठा होता की मातेची ममता, पित्याचे लाड, बहीणींचे प्रेम, नातलगांचे अश्रू, हे माझ्या रस्त्यात आडवे येऊ शकले नाहीत. मी हैद्राबाद रेलवे स्टेशनवर जाऊन पोंहोचलो. आई मला घट्ट बाहू पाशात घेऊन म्हणाली, ''बाळा ज्या कामासाठी जात आहेस, ते पूर्ण कर. मन लावून अभ्यास कर. माझा आशीर्वाद सदैव तुझ्या सोबत राहील.'' आईचे हे शब्द माझ्या ठरविलेल्या मार्गातील सूचक चिन्ह झाले. माझ्या मनात राहून राहून हे विचार येत होते की, 'आता काहीतरी करून दाखवावे लागेल ! ' मी प्रण केला की 'माझे सर्व जीवन आर्यसमाजाच्या कामात घालवीन. हैद्राबादच्या इस्लामी राज्यात आर्य समाजाची पाळे मुळे पसरविण्याचा प्रयत्न करेन. हिंदूना प्रत्येक कष्टांच्या अग्नी पासून वाचविण्यासाठी मी प्राणाची बाजी लावून बलीदानासाठीही तयार राहीन.' महाभयंकर वादळे, अग्नीचे तांडव, पाण्याचा तीव्र वेग आणि सळसळणारे वारेही माझ्या या निश्चयापासून तसूभरही मला दूर करू शकले नाहीत.

## सत्संग मिळाला

मी हैद्राबादहून दिल्ली व दिल्लीहून लाहोरला पोंहोचलो. माझ्या जीवनातील पहिला प्रवास होता. मी हैद्राबादची सीमा ओलांडून बाहेरच्या मोकळ्या जगात पाऊल टाकले होते. प्रवासाचा अनुभव नसल्याने वाटेत अनेक अडचणी निर्माण झाल्या, पण निसर्गानेच प्रत्येक अडचणीवर मात करण्याचा मार्ग दाखविला. इच्छा, आकांक्षा व निश्चयाच्या फुलांनी बहरलेल्या पुष्पगुच्छांचा बक्षीस म्हणून स्वीकार करण्यासाठी मी एका सात फूट उंचीच्या, शरीराने पहेलवान, तेजस्वी चेहऱ्याच्या चमकदार डोळ्यांच्या,उघड्या अंगाच्या, फक्त एका लंगोटीवर राहणाऱ्या, एका मोठ्या पाटावर बसलेल्या संन्याश्याच्या पायावर अत्यंत श्रद्धेने मी माझे डोके

ठेवले व आशीर्वाद घेतला. स्वामीजी म्हणाले, ''याचे नाव रजिस्टर मध्ये लिहा. प्रथमेत प्रवेश द्या. प्रवास सफल झाल्याचा मला आनंद झाला, पण दूर असलेले साध्य, धैर्य व दृढतेने पुढे जाण्यासाठी खुणवत होते.''

तुम्हाला माहीत करून घ्यायचे आहे का ? ते संन्यासी कोण होते ? ते होते लोहपुरूष, महान तपस्वी, वीतरागी, आर्यसमाजचे आधारस्तंभ, निष्कपट संन्यासी, स्वामी स्वतंत्रानंदजी ! इ.स. १९३० ते १९३३ पर्यंत मी दयानंद उपदेशक विदयालयात वैदिक सिद्धांतासोबतच इस्लाम धर्मांचे तत्व, पद्धती, रीती, नियम इत्यादी सर्व परंपरेची माहिती सक्षमपणे मिळविली. संस्कृतचे विद्वान पंडित नरदेवजी सिद्धांत शिरोमणी, पंडित शिवदत्तजी सिद्धांत शिरोमणी, मौलवी आलिम फाजिल, महान तत्त्वज्ञानी ईश्वरचंद्रजी शर्मा या सारखे व तपस्वी विद्वान आर्यसमाजाचे प्राणप्रिय संन्यासी स्वामी स्वतंत्रानंदजी महाराजांच्या शिष्य परंपरेत होते. पूज्य स्वामींजींच्या पाया जवळ बसून मी जे कांही थोडेफार शिकलो, त्याला माझ्या जीवनात आत्मसात करण्याचा किती प्रमाणात प्रयत्न केला आणि किती यशस्वी झालो, हे सांगणे कठीण आहे. माझ्या चाळीस वर्षाच्या सेवेचे योग्य परीक्षण आर्य जन स्वत: करू शकतात. मला या गोष्टीचा आनंद आहे की, मी माझ्या जीवनात कोणतेही वाईट काम करून आर्यसमाजासारख्या पवित्र व जगभर पसरलेल्या संस्थेला कोणत्याही प्रकारचा डाग लागू दिला नाही. जनतेच्या परीक्षेत व अनुभवाने जर मी यशस्वी झालो तर याचे सर्व श्रेय माझ्या गुरूजनांना व त्यांच्या आदर्श प्रतापी व्यक्तिमत्त्वाला जाते. माझ्या जीवनपुष्पातील चरित्राचा सुगंध हा मला माझ्या गुरूजनांकडून मिळाला आहे. ते त्यांच्या उच्च-आदर्श-चरित्रातून व पवित्र भावनेतून प्राप्त झाले आहे. माझ्या जीवनातील जे दोष दिसतात, ते माझे आहेत ते माझ्यातील दुर्बलतेचा परिणाम आहेत. जेव्हा दुबळेपणा काट्यासारखा टोचायला लागतो, तर त्यापासून भविष्यात दूर राहण्याचे संकेत मिळतात. जशी वाहती नदी केरकचरा, दगडगोटे किनाऱ्यावर टाकत पुढे वाहात राहते, तसे माझ्या जीवनाचे झाले आहे.

दयानंद उपदेशक विदयालय, लाहोरच्या शिक्षणापर्यंतचा घटनाक्रम

जुन्या आठवणींच्या आधारावर वाचकांच्या समोर सादर करीत आहे. मी असे कधी स्वप्नातही पाहिले नव्हते की, चव्वेचाळीस वर्षांनंतर मी कांही लिहू शकेन. गेलेल्या दिवसांची कहानी सूत्रबद्धपणे आठवणीत राहणे तर कठीण आहे, पण जे विचार व आठवणी स्मृतीत सुरक्षित होत्या, त्या स्मृतींच्या आधारावर त्यातील कांही तरी सांगतांना मला आनंदानुभूती होत आहे.

आता पुढे विचारांचा हा संग्रह दीर्घ काळापासून मेंदूत सुरक्षित होता, त्यातील एका एका घटनेच्या त्या भागाला आपल्या समोर ठेवीन. त्यामुळे वाचकांना अनुमान काढता येईल की, सार्वजनिक कार्यात कोणत्या अडचणी, प्रसंग, आणि यातनांमधून जावे लागते ? यामुळेच या मार्गाने जाणारी व्यक्ती सुखरुप बाहेर पडते आणि सन्मानास पात्र ठरते.

## आशा निराशेच्या झोक्यावर

विद्यालयात एक दिवस असा आला की, आर्य प्रतिनिधी सभा पंजाब गुरूदत्त भवनने माझी शिष्यवृत्ती बंद केली. त्यावर्षी सभेच्या बजेटने चार विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद केली. त्यात मीही होतो. अन् काय झाले ? रोटी बंद होण्याची वेळ आली. मला काही सुचेनासे झाले. माझे शिक्षण बंदच होणार होते की, एक दिवस श्री. वैद्य ठाकूरदत्तजी शर्मा (अमृतधारा) हे पूज्य स्वामी स्वतंत्रानंदजी महाराजांना भेटण्यासाठी आले होते. बोलतांना माझ्यावर आलेल्या संकटाची कथा सहजपणे त्यांना सांगितली. स्वामीजींनी मला बोलावले आणि सांगितले की  शिक्षण चालू ठेव. तुझ्या शिक्षणाचा दोन वर्षा पर्यंतचा खर्च ठाकूरदत्तजींनी मान्य केला आहे. हैद्राबादहून निघतांनाही माझ्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी श्री चंद्रवालजींनी पुरेशी मदत केली होती. दोन्ही वेळेस आलेले संकट टळले. माझा अभ्यासक्रम चालू होता. आता तो दिवस दूर नव्हता, जेव्हा सहा महिन्यानंतर मी विद्यालयाचा पदवीधर होऊन बाहेर पडणार होतो, इतक्यात स्वामीजींनी माझ्या हातात तार दिली. त्यात लिहिले होते, ‘‘तुझे बाबा प्लेगने आजारी आहेत. त्यांच्या जगण्याची काही आशा नाही.‘‘ रात्रभर बेचैन होतो. बरे वाईट विचार मनात येत होते. दुसऱ्या

दिवशी परवानगी घेऊन, लाहोरहून हैद्राबादकडे जाण्यास निघालो. दोन महिने लोटले. बाबांची प्रकृती सुधारत होती. पण घरच्या नादान लोकांनी अशा काही एकानंतर एक अडचणी उभ्या केल्या की त्यातून माझी सुटका करून घेण्यासाठी चार महिने लागले. परीक्षा जवळ होती. हैद्राबादहून लाहोरला जाऊन पोंहोचलो. विद्यालयाच्या सूचना फलकावर परीक्षार्थ्यांच्या लावलेल्या यादीत माझे नाव नव्हते. काय सांगू ? या घटनेचा माझ्या हृदयावर आघात झाला की, त्याला मी येथे शब्दात मांडू शकत नाही. माझे सगळे सोबती, आनंदाने सर्व सामानांची बांधाबांध करीत होते की, घरी जाऊन लवकरच वैदिक धर्माच्या प्रचाराचे काम सांभाळतील ! माझा निराशेने कोमजलेला चेहरा महाशय कृष्णजींनी पाहिला. ते आर्यसमाजी सुप्रसिद्ध नेते होते. आर्य प्रतिनिधी सभा पंजाबचे अध्यक्ष या नात्याने ते स्वामीजींना भेटण्यासाठी आले होते. त्यांनी मला बोलावून सांगितले की, देवाने तुला उत्तम वक्तृत्वकलेचे वरदान दिले आहे. सिद्धांतांची तुला चांगल्या प्रकारे माहिती झाली आहे. या विद्यालयात असतांना दोन वेळेस वक्तृत्व स्पर्धेत पुरस्कार मिळाले आहेत. धैर्य सोडू नकोस. आणखी एक वर्ष घालविण्याची तुला काही गरज नाही. ‘‘स्वामीजींचा आशीर्वाद घे आणि रणांगणात उडी मार.‘‘ स्वामीजी म्हणाले, ‘‘महाशयजींचे सांगणे योग्यच आहे. तुझ्या योग्यतेचे प्रमाणपत्र विद्यालयातून दिले जाईल.

दुसऱ्या दिवशी, हिवाळ्यात जेव्हा सूर्य आपल्या पूर्ण शक्तीने आकाशात तळपत होता. थंडगार हवेच्या झुळकींना दूर करीत ऊन आल्हादकारक वाटत होते. स्वामीजीं लाकडी पलंगावर ऊन खात होते. मी जवळ जाऊन उभा राहिलो. स्वामींजींनी विचारले, घरला जायचा विचार आहे का ? ‘‘मी म्हणालो, होय. आपला आशीर्वाद मला माझ्या जीवनातील महत्त्वाची ठेव राहील. त्यासाठी मी आपणांस तो मागत आहे.

त्यांच्या पवित्र चरणावर मी माझे डोके ठेवले. स्वामीजींनी माझ्या पाठीवर हात ठेवून म्हणाले, ‘‘जा. ईश्वर सर्व चांगले करेल. पण एक गोष्ट लक्ष्यात ठेव, घरचे खा, काम दयानंदाचे कर आणि आर्यसमाजी लोकांच्या शिव्या ऐकत राहा.‘‘ स्वामीजींचे हे शब्द माझ्या जीवनात अनमोल ठरले. मी नेहमीच ते आठवत असतो.

विद्यालयाचे ते दिवस आजही मला आठवले की आनंदाने डोळ्यातून अश्रू येतात. स्वामी स्वतंत्रानंदजी महाराज आम्हां सर्व विद्यार्थ्यांशी पित्यासारखा व्यवहार करीत. त्यांची प्रेमाची नदी कधीच आटत नव्हती. येथे एका अत्यंत रोचक घटनेचा उल्लेख करीत आहे.

## सेवेचा पहिला धडा

सन १९३२ मध्ये काश्मीरात शेख अब्दुल्ला (अध्यक्ष मुस्लिम काँफ्रेस) यांच्या नेतृत्त्वाखाली हिंदू-मुस्लिम दंग्याचा कट रचला होता. जम्मू-काश्मीरचा सर्व भाग मुसलमानांच्या धर्मांधता व गुंडेगिरीच्या दुर्घटनांनी प्रभावित झाला होता. दररोजच्या वृत्तपत्रात हृदयद्रावक व पाशवी अत्याचाराने हिंदुंना मृत्यूच्या दाढेत ढकलल्याच्या बातम्या येत होत्या. घरे जाळली जात. स्त्रियावर बलात्कार केले जात. या दुर्घटनेतील पिडीत हिंदूंची सेवा करण्याचा निश्चय आर्य प्रतिनिधी सभा पंजाब आणि लाहोरने घेतला. त्यानुसार उपदेशक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना घेऊन स्वामीजी जम्मूला पोंहोचले. जागो जागी मदत केंद्रे स्थापन करून सेवा सुरू केली. जम्मू-काश्मीर, राजौरी, अखनूर, लद्दाख, पूंछ इत्यादी क्षेत्रात मुसलमानांनी हजारो हिंदूना मारून टाकले होते. लद्दाखमध्ये बौध्दांना मुस्लिम बनविण्याची योजना धुमधडाक्यात कार्यान्वित केली होती. काश्मीरच्या पूर्ण खोऱ्यात दंगलीनी हाहाकार उठविला होता. काश्मीर ज्याला भारताचे नंदनवन, स्वर्ग व आनंदाचे ठिकाण समजले जाते, त्याला माणुसकीच्या शत्रूंनी नरकात रूपांतरीत केले होते. शेकडो वर्षांपासून प्रेमाने राहणारे लोक बंधुभावाला मुकले होते.

काश्मीरचे महाराजे हरिसिंह यांना संस्थानातील सत्तेतून काढून टाकून शेख अब्दुल्ला हुकूमशहा बनण्याचा प्रयत्न करीत होता. बऱ्याच दिवसापासून शेख अब्दुल्ला काश्मीरात राजकीय कटकारस्थाने रचत होता. आर्यसमाजी लोकांनी शेर-ए-काश्मीरच्या कटकारस्थानांना सगळ्या षड्यंत्रांना मोठ्या साहसाने आणि योजना बद्ध रीतीने निष्फळ केले होते. पूर्ण जम्मू काश्मीर राज्यात स्वामीजींनी पंधरा केंद्रे स्थापन केली. त्यात प्रत्येक ठिकाणी पाच

विद्यार्थी व त्यांच्यावर देखरेखीसाठी एक शिक्षक नेमला होता. या कामासाठी मला राजौरीचा विभाग दिला होता. येथे अनेक हिंदुची हत्या सार्वजनिक रूपाने केली  होती. राजौरी हे पवित्र ठिकाण आहे. येथेच हिंदू धर्मरक्षक व महान पराक्रमी वीर बंदा बैरागीचे जन्मस्थान आहे.

राजौरी सहायता कँपचा नेता म्हणून मी तेथे तीन महिने काम केले. आमचे निरीक्षक पंडित नरेदवजी सिद्धांत शिरोमणी, मुन्शी फाजील होते. तीन महिन्या नंतर आम्ही पाच विद्यार्थी व पंडितजी जम्मूला पोंहोचलो. तेथेच लाहोरहून स्वामीर्जी  महाराज सुध्दा आले होते. आर्य प्रतिनिधी सभा पंजाब व प्रादेशिक आर्य प्रतिनिधी सभेचे विद्यार्थी कडाक्याच्या थंडीत तळहातावर जीव घेऊन रांत्रदिवस सेवा करीत होते. श्री. प्रेमनाथजी डोगरा हिंदू महासभा जम्मूच्या प्रसिद्ध नेत्यांनी आम्हाला निरोप देतांना पूज्य स्वामीजी आणि महात्मा हंसराजजींच्या सेवेबद्दल धन्यवाद दिले. आम्ही सर्वजण जम्मुहून निघून लाहोरला येऊन पोंहोचलो.

## पोलीस कोठडीत

सन १९३२ मध्ये घडलेली दुसरी एक घटना माझ्या जीवनातील एक आनंददायक घटना ओळखली जाऊ शकते. इंग्रजांनी 'हरिजन ॲवार्ड' हा पुरस्कार सुरू करून हिंदू व हरिजनांच्या मनात कायमची घृणा निर्माण करण्याचे मोठे षड्यंत्र रचले होते. त्याविरूद्ध महात्मा गांधीनी येरवड्याच्या कारागृहात उपोषण सुरू केले. या घटनेने संपूर्ण भारतात इंग्रजांच्या विरुद्ध संतापाची लाट उसळली होती. त्यावेळी स्वामी स्वतंत्रानंदजी हे लाहोर काँग्रेसचे प्रमुख कार्यवाहक म्हणून नियुक्त झाले होते. त्यांनी आम्हा पाच विद्यार्थ्यांना आज्ञा केली. ''आज संध्याकाळी पाच वाजता तुम्हांस अनारकली चौकात सत्याग्रह करायचा आहे !'' गुरू आज्ञा शिरोधार्य मानून सुखदेव (मॉरीशस), सोमदेव (लखनौ) धर्मदत्त (रावळपिंडी) महावीर (हरीयाना) मी असे पाच जण अनारकली चौकात पोंहोचलो व तेथे भाषण द्यायला सुरू केले. १४४ कलमाचा भंग केल्याबद्दल पोलीसांनी आम्हां पाचही जणांना अनारकली पोलीस ठाण्यात नेऊन

चार दिवस कोठडीत बंद ठेवले व पाचव्या दिवशी सोडून दिले.

पोलीस कोठडीत बंद राहण्याचा माझ्या जीवनातील हा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळे माझ्या मनातील पोलीसांची भीती नाहीशी झाली. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांत डॉ. मुंजे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमध्ये समझोता झाल्याची व महात्मा गांधींनी आपले उपोषण सोडल्याची बातमी झळकली होती.

## लढलो व घायाळ झालो.

तिसरी घटना देखील महत्त्वाची आहे. रावी रोडवरील गुरूदत्त भवनला लागूनच इस्लामिया हायस्कूलची इमारत होती. दुपारच्या सुट्टीत इस्लामिया हायस्कूलचे विद्यार्थी आमच्या शाळेच्या मैदानावर येत जेवण करून हाडे तेथेच टाकून जात. एके दिवशी ती मुले आमच्या मैदानात आली. आम्हां सहा–सात सात विद्यार्थ्यांवर हल्ला केला. त्यांच्या सोबत्यांनी दगडांचा मारा सुरू केला. आम्हीही जोरदार सामना दिला. विद्यालयातील सर्व विद्यार्थी आमच्या मदतीला आले. पंधरा मिनिटे दगडांचा वर्षाव झाला. यात आमच्या विरोधातील मुले गंभीर जखमी झाली. आमच्यापैकी मी व माझा एक सोबती देखील जखमी झाला. पोलीस तेथे येईपर्यंत दंगल संपली होती. इस्लामिया हायस्कूलचे हेडमास्तर आणि पूज्य स्वामीजींनी मध्यस्थी केल्याने ही दंगल पोलीस कारवाई पासून बचावली गेली.

## मनोकामना पूर्ण झाली.

सन १९३३ च्या शेवटी शिक्षण पूर्ण करून मी हैद्राबाला आलो. त्या काळात मी आर्यसमाजच्या क्षेत्रात एक अनोळखी माणूस होतो. सुलतान बाजार आर्यसमाजचे मंत्री चंदुलालजी आणि सामाजिक व राजकीय चळवळीचे प्राणस्वरूप श्री पं. विनायकराव विद्यालंकार यांचेशी भेट झाली. स्वामी स्वतंत्रानंदजींनी मला दिलेले प्रमाणपत्र मी विनायकरावजींना दाखविले. ते म्हणाले– 'आर्यसमाजच्या सत्संगात तुमचे भाषण ठेवले जाईल'. 'आंधळा काय मागतो एक डोळा, अन् मिळाले दोन' या म्हणी सारखी माझी अवस्था झाली. माझी इच्छा होती की माझे व्याख्यान झाल्याने माझा

पुढील मार्ग मोकळा होईल. मी आर्य समाजाच्या कार्याशी जोडला जाईन !

हैद्राबाद हे एक इस्लामी संस्थान होते. म्हणून शुक्रवारी सार्वजनिक सुट्टी असायची. याच कारणामुळे त्या दिवशीच येथील आर्यसमाजचा सत्संग व्हायचा. मी ठीक वेळेवर सत्संगात गेलो. 'कुराणात वेदांचे तेज' या विषयावर मी पस्तीस मिनिटे बोललो. हैद्राबादची परिस्थिती व वातावरण बदलल्याने हिंदू जनतेला माझे भाषण आवडले. माझ्या स्वभावातच मूळत: ओजस्वीपणा होता. लोकांनी माझा उत्साह वाढविला. माझे भाषण यशस्वी झाल्याने मला असा अनुभव आला की मी फार मोठी लढाई जिंकली आहे.

## कामाला लागलो.

आर्यसमाजाचे मंत्री चंदुलालजींनी माझ्याकडून आर्यसमाजची कामे करवून घेण्यास सुरूवात केली. त्याच दिवसात अशी बातमी समजली की, हैद्राबादपासून दूर बीदर जिल्ह्यात हाळीखेड नावाच्या एका गावात पंडित रामचंद्रजी देहलवींचे आगमन होणार आहे. मंत्रीजी म्हणाले की 'तुलाही त्यांच्या सोबत जावे लागेल ?' हैद्राबाद राज्यात पंडित विनायकरावजी विद्यालंकार यांचे नाव आकाशातील ताऱ्या प्रमाणे चमकत होते. हिंदू समाजाच्या अधिकारांचे संरक्षण याच दोन महोदयांच्या हातात होती. त्याचप्रमाणे भाई बंसीलालजी आर्य व भाई श्यामलालजी आर्य वकील या दोन्ही बंधूंनी हैद्राबाद राज्यात आर्यसमाजाच्या प्रचाराचा धडाका लावला होता. राज्यभरात यांच्या नावाची व कामाची चर्चा लोकप्रिय झाली होती. जी कोणती व्यक्ती त्यांच्या संपर्कात येई, ती या दोन्ही भावंडांच्या योग्यतेची, शौर्याची, धैर्याची व सत्यनिष्ठेची प्रशंसा करीत असे. यामुळेच त्यांना भेटण्याची व पाहण्याची इच्छा माझ्या मनात निर्माण झाली. शेवटी ही संधी जवळ येऊन ठेपलीच !

## दोन दीपस्तंभ

हैद्राबादहून पंडित रामचंद्रजी देहलवी, पंडित विनायकरावजी विद्यालंकार, श्री चंदुलालजी, श्री सूर्यप्रतापजी, श्री चंद्रपालजी, श्री गजानंदजी, पंडित दत्तात्रय प्रसाद जी ॲडवोकेट आणि मी हाळीखेडला

गेलो. हाळीखेडचा बाजार माळा फुलांनी व तोरणांनी सजविला होता. देहलवीजींच्या स्वागतासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कार्यकर्ते आले होते. गावात पोंहोचताच हजारो आर्य समाजी लोकांसोबतच आर्यसमाजाचे प्राणस्वरूप भाई बंसीलालजींनीही आम्हां सर्वांचे भव्य व हार्दिक स्वागत केले. सारे आकाश मंडळ जयजयकाराच्या गर्जनेने दुमदुमले होते. हातात तलवारी, लाठ्या आणि पिस्तूल घेऊन ध्येयाने प्रेरित झालेले चिटगोपा, उदगीर आणि बीदरचे तरूण देहलवीजींच्या पुढे-पुढे चालत होते. दोन्ही भाऊ पंडितजींच्या सोबत चालत होते. समारंभ तीन दिवसांपर्यंत आनंद व उत्साहाने चालला. देहलवीजींच्या व्याख्यानाने हिंदूत नवजीवनाचा प्राण भरला. भाई बंसीलालजींचे व्याख्यान प्रेरणा व उत्साह वाढविणारे होते. मंडपात शांतता पसरली होती. दुसऱ्या दिवशी भाषण देतांना पंडित विनायकराव विद्यालंकार यांनी एका वेदमंत्रांची व्याख्या करतांना सर्वांना आश्चर्यचकित करून सोडले. शेवटच्या दिवशी सकाळी मला भाषण देण्याची संधी दिली होती. माझ्या भाषणाचा विषय 'पापसे डरो, पापियों से नही.' (पापाला घाबरावे, पापी लोकांना नव्हे !) हा होता. या व्याख्यानाचा तरूणावर चांगला परिणाम झाला. वारंवार होणाऱ्या घोषणांमुळे जनतेत उत्साहाची भावना वाढत होती. निजामाच्या हुकूमशाही व तानाशाहीला टक्कर देण्याची तरूणात उर्मी निर्माण होत होती. यामुळे सर्व लोकांना उत्साह व प्रेरणा मिळाली. भडकलेल्या तरूणांना शांत करण्याची कला भाई बंसीलालजी वकील यांच्यात होती. ते म्हणाले की, ''मी आपणा सर्व आर्यसमाजी लोकांचा उत्साह आदराने पाहतो. आपल्या मनात असलेल्या इच्छा व प्रेरणांना मी आपल्या डोळ्यात पाहतो. निजाम सरकारच्या अत्याचार व अनाचाराला टक्कर देण्याची तुमची मनोकामना पूर्ण होईल. कोणतेही काम वेळेनुसार केल्यानेच यश प्राप्त होते. आर्य समाजाचे संगठन मजबूत करा.'' दोन्ही भावांची शौर्य, धाडस आणि बलिदानाबद्दल मनाची तयारी पाहून मला दृढ निश्चय व उत्साहाची प्रेरणा मिळाली. असे समजा की राज्यभर पसरलेल्या कष्ट व अंधारात भाई बंसीलालजी आणि भाई शामलालजी हिंदू जनतेला दीपस्तंभासारखे दिसते होते.

# वैदिक आदर्श

निजाम राज्य आर्य प्रतिनिधी सभेच्या कार्यकारीणीची बैठक तीन दिवस चालली. आर्यसमाजाची माहिती दूर पर्यंत पोंहोचविणे व जनतेला वैदिक धर्माच्या उच्च आदर्शाची ओळख करून देण्यासाठी 'वैदिक आदर्श' नावाचे साप्ताहिक पत्र काढण्याचा निर्णय झाला. उर्दू, हिंदी व इंग्रजीचे अनुभवी साहित्यिक श्री सूर्यप्रतापजी व श्री. चंद्रपालजीं यांना हा कार्यभार सोपविला. मला या दोघांच्या सूचनेनुसार काम करण्यासाठी वीस रूपये मासिक वेतनावर नियुक्त केले. तीन महिने लोटले तरी 'वैदिक आदर्श' चे प्रकाशन शक्य झाले नाही. कारणे कोणती होती ? हे येथे सांगणे आवश्यक नाही. एके दिवशी असे झाले की, भाई बंसीलालजी वकील कांही आवश्यक कामासाठी हैद्राबादला आले होते. त्यांनी हे साप्तहिक न निघाल्या बद्दल दु:ख व्यक्त केले आणि परत जाण्यापूर्वी 'वैदिक आदर्श' चा पहिला अंक प्रकाशित केला. श्री चंदुलालजींच्या सल्ल्याने श्री मनोहरसिंहजी (एम.ए.एल.एल. बी.) यांना संपादकपदी नियुक्त केले गेले. या साप्ताहिकाच्या प्रकाशनाची जबाबदारी माझ्यावर सोपविले. प्रकाशनाच्या दोन महिन्यानंतर १३ खुरदाद सन १३४४ फसली (हैद्राबाद संस्थानात तेव्हा फसली वर्षाचा वापर चालू होता.) या प्रमाणे दि.१८ एप्रिल १९३५ रोजी निजाम सरकार कडून एक नोटीस बजावण्यात आली. त्यात असा प्रश्न करण्यात आला की ''तुम्हाला मनानूर (निजाम राज्याचे काळेपाणी) जेलला का पाठवू नये ?''

मला पत्रकारितेचा काही अनुभव नव्हता. या वृत्तपत्राला लोकप्रिय बनविण्या करिता कोणती गुप्त शक्ती काम करीत होती ? हे ईश्वरालाच माहीत. या वृत्तपत्राच्या लोकप्रियतेचा अंदाज या गोष्टीवरून लावला जाऊ शकतो की, कधी काळी सामान्य परिस्थितीमुळे या वृत्तपत्राचे प्रकाशन झाले नाही, तर जनता नैराश्य व बेचैनी अनुभवत असे. हा माझ्या लेखनीचा नसून त्यावेळच्या ज्वलंत प्रश्नांचा प्रभाव होता. या कार्यात स्वर्गीय भाई ठाकूर उमरावसिंह आणि पंडित सोहनलालजी वानप्रस्थींचे मला बहुमोल सहकार्य

मिळाले. त्यांच्या मदतीने मला या क्षेत्रात यश मिळाले. एका वर्षाच्या आत ''वैदिक आदर्श'' हे हिंदू जनतेचे खरे प्रतिनिधी या रूपात पत्रकारितेच्या क्षेत्रात झळाळू लागले. या विरूद्ध 'वक्त', 'रहबरे दख्खन' 'सुबहे दख्खन' आणि 'अला आजम' अशा कांही मुस्लीम साप्ताहिकांनी जबरदस्त आंदोलन उभे केले. निजाम सरकारची पण हीच इच्छा होती. नवाब अलीयावर जंग बहादुर (तत्कालीन महाराष्ट्राचे राज्यपाल') हे त्या वेळेच्या सूचना विभागचे (पुढे चालून 'सूचना आणि जनसंपर्क' असे नाव दिले गेले) त्यांनी आदेश काढला की, वैदिक आदर्श या वृत्तपत्राचे प्रकाशन बंद करण्यात यावे. हे पत्र बंद झाल्याने मला दुःख व आनंद देखील झाला. दुःख या गोष्टीचे की, हिंदू जनतेची सेवा करण्याची संधी यामुळे नाहीशी होणार होती आणि आनंद या गोष्टीचा की, मला पत्रकारितेच्या क्षेत्रात अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळत राहिले म्हणून ! वैदिक आदर्श हे वृत्तपत्र येथील हिंदू जनतेत उच्च आदर्शांसह चांगल्या प्रकारे जीवन जगण्याचे धैर्य, बळ उत्पन्न करू शकले.

## लेखन व भाषणावर बंदी.

माझ्या विरूद्ध मुस्लिम पत्रकारिता क्षेत्राने एक अपप्रचार चालू केला होता. याचा परिणाम असा झाला की २६ खुरदाद सन १३४७ फसली त्यानुसार दि.३० एप्रिल १९३८ ला निजाम सरकारने माझ्या लेखन व भाषणावर बंदी घातली. अशाच प्रकारचा प्रतिबंध माझ्या सोबतचे नवाब बहादूर यार जंग बहादुर, (अध्यक्ष इत्तेहादुल मुसलमीन यांच्यावरही लावला. 'वैदिक आदर्श' ने हैद्राबादचे वातावरणच बदलून टाकले होते. निर्भिडता व साहसाने निजाम सरकारच्या अत्याचाराचे रहस्य सर्व लोकापुढे ठेवल्याने, ह्या वृत्तपत्राने ऐतिहासिक महत्त्वाची भूमिका बजावली होती. हे सांगणे अतिशयोक्ती अथवा आत्मप्रशंसेचे ठरणार नाही की 'वैदिक आदर्श' साप्ताहिक ज्या समारंभपूर्वक मानाने व प्रतिष्ठेने सुरू झाले होते, त्याची पूर्तता होवून ते त्याच सुप्रतिष्ठितपणे ते बंद झाले. वाचक वृंद वैदिक आदर्शला आजही विसरू शकत नाहीत.

एक वर्ष पर्यंत माझ्या भाषणावर बंदी होती, याला वरदान समजून

दररोज खाजगी स्वरूपात तरूणांशी संपर्क स्थापन करून अनाचार व अत्याचाराच्या विरूद्ध आवाज उठविण्यासाठी आणि वेळ पडल्यास सरकारच्या विरूध्द लढा देण्यासाठी तयारी ठेवण्याचा कार्यक्रम मी सुरू ठेवला होता. लोहार येथून प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रातून, 'आर्य गजट' व 'प्रकाश' साप्ताहिक लाहोरातून मी गुप्त नावाने लेखही लिहीत होतो. 'आर्य गजट' पत्राचे संपादक श्रीमान दुर्गाप्रसादजी शर्मा, जे की आताही (त्याकाळी) जिवंत आहेत, त्यांनी अत्यंत निर्भयपणे हैद्राबादच्या जनतेची सेवा केली. निजाम सरकारने लाहोरच्या 'आर्य गजट' वृत्तपत्राला हैद्राबाद संस्थानात प्रवेशास बंदी घातली. मला हैद्राबाद शहराच्या सीमेवर नजरबंद केले. मी या आदेशाचे उल्लंघन करण्याची तयारी करीत होतो. पण आर्यसमाजचे वरिष्ठ नेते, पंडित विनायकरावजी विद्यालंकार यांनी मला तसे न करण्याचा सल्ला दिला. सहा महिने गेले, मला आशा वाटत होती की, आदेश मागे घेतला जाईल, पण तसे झाले नाही. शेवटी मी आज्ञेचे उल्लंघन करायचे ठरविले. या निर्णयाची सूचना मी हैद्राबाद राज्याचे प्रधानमंत्री नवाब हैदर नवाज जंग बहादुरला दिली. त्याची एक प्रत पोलीस कमिश्नर नवाब रहमतयार जंग बहादुरला पाठविली होती.

## मुकदमा, जेल आणि सुटका

माझ्या अशा वागण्याचा परिणाम म्हणून की काय एका आठवड्यात माझ्यावरील नजर बंदीचा आदेश रद्द केला आणि दुसऱ्या आठवड्यात राज्याची सत्ता उलथविण्याचा आरोप ठेवून भारतीय दंड विधानाचे कलम १८३ नुसार मला अटक करून न्यायालयात उभे केले. मी जमानतीवर सुटलो. खटला चालू राहिला. पंडित विनायकराव, बार–एट–लॉ, ॲड. पंडित गोपाळराव बोरगावकर (हायकोर्ट) आणि ॲड. दिगंबरराव लाठकर यांनी मोठ्या तयारीने केस लढविली. पण पुन्हा 'पळसाला पाने तीन' या म्हणीप्रमाणे न्यायालयाने मला एक वर्ष कठोर कारावास व दंड ठोठावला. त्याच रात्री मला पोलिसांनी कडेकोट बंदोबस्तात सेंट्रल जेल मध्ये पाठविले. ॲड. पंडित विनायकरावजी व

ॲड. दिगंबरराव लाठकर यांनी या निर्णयाविरूद्ध हायकोर्टात अपील दाखल केले आणि शेवटी तेथून मी निर्दोष म्हणून सुटलो.

## संघर्षाच्या वाटेवर

आर्य समाज सुलतान बाजारचा वार्षिकोत्सव जवळ येत होता. धुमधडाक्यात तयारी सुरू होती. या वेळेस आर्य जगतातील सुप्रसिद्ध विद्वान उपदेशक येणार अशी चर्चा होती. ते येण्याची बातमी ऐकून शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण होत होते. पंडित रामचंद्रजी देहलवी, पंडित बुद्धदेवजी विद्यालंकार, पंडित धर्मभिक्षुजी, पंडित सत्यदेवजी (लखनौ) आले होते. पंडित धर्मभिक्षुजींच्या व्याख्यानानी हैद्राबादेतील जनतेत नवजीवनाचा संचार झाला होता. ते संस्कृत व अरबीचे विद्वान होते. अशा प्रकारे आर्य समाजचा उत्सव यशस्वी झाला.

एका महिन्यानंतर आर्यसमाजाची निवडणूक होणार होती. मीही चंदुलालजींच्या पॅनलला पाठींबा देण्याचे मान्य केले. कारण हे पॅनल आर्यसमाजात प्रभावशाली होते. निवडणूक पार पाडली. चंदुलालजी, मोहनलालजी, बलदवा, गजानंदजी गुप्त आणि पंडित विनायकराव विद्यालंकारजी हे माझ्या कामावर खुष होते. म्हणूनच त्यांनी मंत्रीपदासाठी माझे नाव सुचविले आणि मी सर्वसंमतीने मंत्री म्हणून निवडून आलो. पंडित विनायकरावजी विद्यालंकार यांच्या नेतृत्त्वाखाली काम करण्याची संधी मिळाल्याने माझा उत्साह वाढला होता. मी सतत चार वर्षे आर्य समाजाचा मंत्री होतो. मंत्री असतांना प्रियव्रतजी विद्यावाचस्पती, महात्मा नारायण स्वामीजीं, स्वामी स्वतंत्रानंदजी, आचार्य रामदेवजी, महात्मा खुशहालचंद्रजी खुरसंद (म. आनंद स्वामी) व मौलवी सत्यदेवजीं सारखे सुप्रसिद्ध विद्वान नेते येथे आले व त्यांनी जनतेला आपल्या ज्ञानाने लाभान्वित केले. हैद्राबादमध्ये आर्यसमाजाच्या उत्सवाला पन्नास हजारापेक्षा जास्त लोक जमा होत असत. हे पाहून सरकार चिंताग्रस्त झाले होते. सरकारकडून आर्यसमाजी लोकांवर जुलूम जबरदस्ती सुरू झाली. पंडित मंगलदेवजी शास्त्रींवर बंदी घातली गेली. पंडित रामचंद्रजी

देहलवी सारख्या मधुरभाषी वक्त्याला हाळीखेडच्या भाषणाचे कारण दाखवून व 'धर्माचा अपमान केला', आरोप ठेवून बीदरच्या न्यायालयात असा खटला दाखल करण्यात आला. या खटल्याने संपूर्ण भारतात दु:खाची आणि संतापाची लाट उसळली. सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान महात्मा नारायण स्वामीजींनी सरकारच्या नावाने तार पाठवून इशारा दिला आणि तीव्र दु:ख जाहीर करून पंडितजीविरूद्ध चालविल्या जाणारा खटला परत घेण्यासाठी जोर दिला. खटला मागे घेतला गेला. पण हैद्राबाद राज्यात पंडितजींच्या प्रवेशाला बंदी घालण्यात आली.

हैद्राबादेत आयोजित नवयुवा संमेलनात मी भाषण देतांना म्हणालो होतो कि, ''हैद्राबाद ८२ हजार चौरस मैलाचा मोठा जेलखाना आहे. सरकार विरूद्ध पाऊल उचलणे आम्हाला भाग पडेल !'' या वाक्याला राजद्रोहाचे स्वरूप समजून सरकारने माझ्या विरूद्ध न्यायालयात खटला भरला. खटला चालला व मला सहा महिन्याच्या कैदेची व २०० रूपये दंडाची शिक्षा सुनावली गेली आणि शेवटी कारागृहात पाठविले.

## एक दीपस्तंभ विझला.

हैद्राबाद राज्यात अनेक ठिकाणी आर्यसमाजाविरूद्ध सरकार मनमानी कारवाया करीत होते. जिल्ह्यात भाई बंसीलालजी वकील आणि भाई श्यामलालजी धुमधडाक्यात आर्यसमाजाचा प्रचार करीत होते. त्यांच्या जीवाला नेहमीच धोका होता. सरकार आणि मुसलमानांकडून त्यांना संपविण्यासाठी कट रचला गेला, परंतु मारणाऱ्यापेक्षा वाचविणारा मोठा असतो. हे बरे ! 'जाको राखे साईयां मार सके ना कोय' या उक्तीनुसार या दोन्ही भावांचे संरक्षण देव स्वत: करीत होता. या भावांचे आर्यसमाजाच्या इतिहासात तेच स्थान आहे, जे एका जिवंत हुतात्म्याला असते. हे स्थान त्यांनी आपल्या कर्तृत्वाने प्राप्त केले. एक दिवस असा आला की, आर्य समाजाचे पंडित भाई श्यामलाल यांचे बीदर येथील जेलमध्ये असतांना दि.१७ डिसेंबर १९३८ रोजी बलिदान झाले. ज्याप्रमाणे

सॉक्रेटिसने विषाचा पेला प्राशन केला. त्याचप्रमाणे श्यामलालजींनीही हौतात्म्य पत्करले. त्यांची ही कहानी दु:खाने भरलेली आहे.

१९३८ मध्ये आर्यसमाज उदगीर तर्फे होळीच्या दिवशी शोभायात्रा काढण्यात आली होती. मिरवणूक आपल्या पूर्वनियोजित मार्गावरून जात होती इतक्यात पाशा मिया वकील आणि वली मोहम्मद साहेब वकील यांच्या इशाऱ्यानुसार या मिरवणुकीवर मुसलमानांनी हल्ला केला. या मध्ये दोन्ही बाजूचे लोक जखमी झाले व एक माणूस मारला गेला. 'उलटा चोर कोतवाल को डाटे' या म्हणीनुसार भाई श्यामलालजी सोबत सोळा आर्यसमाजी लोकांना हत्येच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. खटला चालू असतांना भाई श्यामलालजी अतिशय आजारी होते. डॉक्टरने दिलेल्या औषधात बीदर जेलच्या असिस्टंट जेलरने विष मिसळून भाईजींना पिण्यासाठी दिले. त्यांनी ते औषध समजून पिले. भाई श्यामलालजींच्या बलिदानाने राज्यभरात संताप उसळला. चोही बाजूने दु:खाचे ढग जमा झाले. प्रत्येक आर्यसमाजी माणसाच्या डोळ्यात अश्रू होते. आर्यांचा लोकप्रिय नेता, सुख-दु:खातला सोबती, हिंदूंचा रक्षक, प्राणस्वरूप अग्रणी नेता जगातून निघून गेला.

भाई श्यामलालजींच्या बलिदानाच्या दोन महिने अगोदर खटल्याची बाजू मांडण्यासाठी ध्रुवपेठ (धूलपेठ) च्या जातीय दंगलीच्या संदर्भात त्यांच्या सांगण्यावरून दिल्लीहून प्रसिद्ध वकील श्री ब्रजनारायण तव्वक्ली हे आले होते. तेव्हा त्यांचेशी विचार विनियम करण्यासाठी मा. पं. विनायकराव विद्यालंकार यांच्या सांगण्यावरून त्यांच्या घरातूनच विकाजी हॉटेल (आबिद रोड) ला जात होतो. इतक्यात हैद्राबादच्या सी.आय.डी. विभागाचे अधिकारी राघवेंद्ररावजी यांनी मला रस्त्यातच अटक केली व बागेआमच्या जिल्हा पोलीस कोतवाली कार्यालयात पोंहोचविले. तेथे मिस्टर हालमेन्स या पोलीस अधिकाऱ्याने निजामाच्या आदेशाचे एक मोहोरबंद पाकीट मला दिले. त्यात लिहिले होते तुम्हाला तीन वर्षासाठी मनानूरच्या तुरूंगात नजरबंद केले जात आहे. ही घटना १० आजूर १३४८ फसली, याप्रमाणे दि.१५ आक्टोबर १९३८ रोजी ची आहे. मनानूर हे हैद्राबाद राज्याचे काळेपाणी म्हटले जाई. हैद्राबाद पासून ३० मैल दूर अंतरावर महबूबनगर जिल्ह्यातील उंच पहाडीच्या प्रदेशातील

दाट जंगलात होते. तेथे वाघ आणि चित्ते राहात होते. अशा ठिकाणच्या तुरूंगात मला ठेवण्यात आले होते. एक वर्ष, पाच महिने, एकवीस दिवसानंतर मला मनानूरच्या तुरूंगातून मुक्त करण्यात आले.

## काळे पाणी आणि मुक्तता

आर्यसमाजाच्या ऐतिहासिक सत्याग्रहासमोर निजाम सरकारने गुडघे टेकविले होते. शासनाचे धैर्य सुटले होते. सत्ता आणि संपत्ती, धन आणि शक्तीच्या आधारे मोठेपणा दाखविणाऱ्या अरबपती निजामाची शक्ती आर्यसमाजरूपी विशालकाय शिळेवर धडकल्याने नष्ट झाली होती. आर्य सत्याग्रहात पंधरा हजार आर्यसमाजी लोक भारताच्या कानाकोपऱ्या येऊन सहभगी झाले होते. एकवीस आर्यवीर शहीद झाले. आर्य सत्याग्रह समितीचे अध्यक्ष श्री. घनश्याम सिंहजी गुप्त यांनी चर्चा करण्यासाठी, त्यांनी हैद्राबादला यावे, अशी इच्छा व्यक्त केली. त्यांनी श्री देशबंधु गुप्तांना सरकारशी बोलणी करण्यासाठी हैद्राबादला पाठवून दिले. देशबंधुजी आर्यसमाजचे नामांकित नेते होते. बोलणी यशस्वी झाली. तरी पण एक अट निजाम सरकारला मान्य नव्हती. ती अट माझ्या सुटकेशी संबंधित होती. देशबंधुजींनी धनश्याम सिंहजींना विचारले ‘अशा परिस्थितीत काय करावे?’ उत्तर आले– ‘समझौता होणार नाही’. नवाब अलीयावर जंग बहादुर आणि प्रधानमंत्री सर अकबर हैदरी मध्ये संघर्ष होत होता. शेवटी ठराव असा केला गेला की, दोन महिन्यानंतर मला सोडण्यात येईल. या निर्णया नंतर तहावर स्वाक्षऱ्या झाल्या. दोन महिने लोटल्या नंतरही सरकारने मला सोडले नाही, तेव्हा घनश्यामसिंहजींनी महात्मा गांधीजींना सांगून पंडित अभयदेवजी विद्यालंकार (आचार्य, गुरूकुल कांगडी) यांना हैद्राबादला पाठविले. आचार्यजी व सर अकबर हैदरी हे दोघे योगीराज अरविंद घोष यांचे शिष्य असल्याच्या नात्याने गुरूबंधू होते. एक महिना एकवीस दिवसानंतर माझी सुटका केली गेली. सुटके अगोदर प्रधानमंत्री हैदरी साहेब हे फराहाबादला उन्हाळ्यातील थंडहवेचे ठिकाण म्हणून वसविण्याचा बेत आखत होते. या

योजनेवर विचार करण्यासाठी ते आस्ट्रेलियन विशेषज्ञांसोबत फराहबादचा दौरा करीत होते. परत येत असतांना त्यांनी मनानूरच्या तुरूंगातही आले. दहा मिनिटांपर्यंत माझ्याशी झालेल्या चर्चेत त्यांनी मला कितीतरी गोष्टी विचारल्या. मी त्यांना उत्तर देत होतो. पोलिस इन्स्पेक्टरला आदेश देऊन ते राजधानी हैद्राबादकडे निघाले. दुसऱ्या दिवशी रात्री बारा वाजता अशफाक उल्ला खाँ या पोलिस ऑफीसरच्या देखरेखीखली मला मनानूरहून हैद्राबादला पोंहोचविण्यात आले.

मनानूरला राहातांना मी जी पत्रे माझे भाऊ आणि पुतणी सरलादेवीला लिहिली होती त्यांपैकी दोन–तीन पत्रे इथे सादर करीत आहे. मी कांही पत्रे आपल्या घरी पाठविली. अथवा घरून मला आली, त्यांची कसून तपासणी (सेंसर) होत होती. पोलीसांच्या सर्वात मोठ्या अधिकाऱ्यांमार्फत तपासणी झाल्यानंतर ती पत्रे बाहेर पाठविली जात व ती मला मिळत.

पत्र–१– भावाच्या नावाने – 'तुम्ही मला भेटण्यासाठी येथे येणार आहात, पण लक्ष्यात असू द्या की, येथे येऊन सुद्धा मला न भेटू दिल्यास तुम्हांस कष्ट आणि गैरसोय सहन करावे लागतील. ते माझे हृदय व्याकूळ होईल आणि त्यामुळे माझे दु:ख अधिकच वाढेल ! माझ्यासाठी तुम्ही नको त्या असलेल्या संकटात सापडाल ! यापेक्षा तुम्ही मला भेटायला न आलेले फार चांगले.'

पत्र–२– पुतणीच्या नावाने– 'सरला बेटी ! माझे पत्र तू लक्ष्य देऊन वाच आणि समजून घेण्याचा प्रयत्न कर. हिंदीच्या शिक्षणासोबत संस्कृत अध्ययनाचा क्रम चालू ठेव. शिक्षण प्राप्त करण्याशिवाय इतर कोणत्याही गोष्टी कडे लक्ष्य देऊ नकोस. दररोज संध्या व हवन कर आणि आर्यसमाजच्या सत्संगाला जात जा.'

पत्र–३– भावाच्या नावाने– 'असे ऐकले आहे की आर्य सत्याग्रह यशस्वी झाला आहे. निजाम सरकारने आर्यसमाजच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. या गौरवशाली विजयाबद्दल आर्यसमाजाने जेवढा अभिमान बाळगावा तेवढा कमी आहे. आर्यसमाजाच्या शक्तीने पहाडासारख्या निजाम शासनाला हलविले आहे. माझ्या सुटकेची काळजी करू नका. माझ्या सुटकेसाठी

निजामाला आर्य समाजासमोर झुकावे लागेल.' देर आयद दुरूस्त आयद !''

मी जेल मधून सुटल्याच्या आनंदात देवीदीन बागेत स्वागत समारंभ आयोजित केला होता. दुसऱ्या दिवशी सकाळच्या गाडीने मी सोलापूरला जाऊन पोंहोंचलो. स्टेशनवर आर्यजगताचे सर्वमान्य नेते, सत्याग्रहाचे कर्ते करविते भाई बंसीलालजी वकील आणि भगिनी विद्यावतीजी यांच्या शिवाय अनेक आर्य बांधव स्वागतासाठी उपस्थित होते. भाई बंसीलालजी विजय आनंदाच्या भरात मला मिठीत घेऊन म्हणाले, ''श्यामलालच्या ठिकाणी माझ्यासाठी तुम्ही आहात'' त्यांच्या या शब्दात त्यांच्या हृदयाचे प्रतिबिंब दिसत होते. आर्य सत्याग्रह भव्य स्वरूपात यशस्वी झाल्याच्या निमित्ताने व विजयोत्सवाची आठवण म्हणून एक उपदेशक विद्यालय स्थापन करण्यात आले होते. आर्य समाजचे प्रकांड पंडित व साहित्यिक गंगाप्रसादजी उपाध्याय, राजगुरू पंडित धुरेंद्रजी शास्त्री (त्यागमूर्ती स्वामी ध्रुवानंदजी सरस्वती) आणि पं. गोपदेवजी दर्शनाचार्य यांच्या विद्वत्तेचा लाभ घेत तेलंगाना, मराठवाडा व कर्नाटकात वैदिकधर्माचा प्रचार व विस्तार केला गेला.

## पळसाला पाने तीन

काय मग आता ? हैद्राबाद राज्यात आर्य समाजाचा डंका वाजत होता. राज्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कांही दिवसापर्यंत आर्य समाजाच्या मार्गातील अडथळे दूर झाले, पण निजाम सरकारचे मौन हे भविष्यातील भयंकर नवे वादळ व कुचक्राच्या आगमनाची सूचना देणारे ठरले. आर्यसमाजाची वाढत जाणारी शक्ती ही निजामाच्या नजरेत येत होती. सरकारने अत्याचार व अनाचाराला सुरूवात केली. अन्यायाचा बडगा पुन्हा सुरू झाला. गावागावातील गुंड आर्य समाजाविरूद्ध आक्रमक झाले. आर्यसमाजी तरूण याचा धैर्याने सामना करीत होते. गुंडांना पोलीसांचा उघड पाठींबा होता. म्हणून हिंदुंना अत्याचाराला बळी पडावे लागत होते. या संघर्षात अनेक तरूणांना बलिदान द्यावे लागले. गुंजोटीत वेद प्रकाशजी, बसव कल्याण मध्ये धर्म प्रकाशजी, निजामाबादेत राधाकिशनजी, हुमानाबादेत शिवचंद्रजी व त्यांचे तीन मित्र आणि उमरीत

दत्तात्रयजी शहीद झाले. त्यांच्या बलिदानाने कधीही न भरून येणारी हानी झाली. हे तरूण आर्य समाजाच्या क्षेत्रातील तळपते तारे होते. या हुतात्म्यांचा आर्य समाजाला अभिमान वाटत असे. एका बाजूला बलाढ्य निजाम सरकार, तर दुसऱ्या बाजूला आर्य समाजाचे धाडसी नवयुवक होते. जसे जुन्या मोगल काळात राजपूत, मराठे आणि शिखांनी आपल्या जातीचा मोठेपणा टिकवून ठेवण्यासाठी आणि आपल्या संस्कृतीचा ध्वज पकडत ठेवण्यासाठी, स्वत:हुन स्वत:स देशहितासाठी अर्पण केले. त्याचप्रमाणे आताच्या या आर्यवीरांनी मागील बलिदानी इतिहासाच्या आठवणी ताज्या केल्या.

## प्राणघातक हल्ले

हैद्राबाद राज्यातील जनतेत जागृतीची भावना व राजकीय जागलेपण निर्माण करण्याच्या उद्देशाने हैद्राबादच्या आंध्र परिषद, महाराष्ट्र परिषद आणि कर्नाटक परिषद अशा तीन भागात विभागणी झाली होती. जनतेशी निगडीत समस्या संबंधी सरकारचे लक्ष्य वेधण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न झाले. याशिवाय हैद्राबाद एज्युकेशनल कॉन्फ्रेंस स्थापन करून मातृभाषेच्या विकासा संबंधी अनेकदा प्रयत्न झाले, पण सरकार कानावर हात ठेवून बसले होते. झाले काय की जेवढे प्रयत्न केले, तेवढे फोल ठरले. उलट नवीन सरकारी आदेश काढून जनतेंच्या प्रश्नाकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले गेले. उदाहरण दाखल आदेश क्रमांक ५३ हा आखाडे आणि स्वतंत्ररीत्या शाळा स्थापन करण्यासंबंधीचा होता. अशा परिस्थितीत शांततामय मार्गाने जनतेच्या भावना व्यक्त करण्यासाठी तेलंगान्याच्या एखाद्या ठिकाणी 'कॉन्फ्रेंस चे अधिवेशन' भरविले जाई. जडचरला (जिल्हा महबूब नगर) मध्ये श्रीमान जमलापुरम् केशवरावजींच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन होत होते. त्यात भाग घेण्यासाठी मी तेथे गेलो. एके दिवशी मी व महबूब नगरचे प्रसिद्ध आर्यसमाजी नेते श्री सिद्धलिंगप्पाजी चार वाजता चहा पिण्यासाठी पोलीस इन्स्पेक्टर श्री निजामुद्दीन (जे मनानूरला माझ्यावर लक्ष्य ठेवण्यासाठी नियुक्त होते)

यांच्या घरी गेलो. चहा घेऊन सभामंडपाकडे आम्ही परतत असतांना, जडचरलाच्या दिशेकडून एक मोटार वाहन मोठ्या वेगाने आमच्या मोटारीच्या जवळून गेले. मागील सीटवर एक तरूण बसला होता. तो त्याच्या रिव्हाल्वरने माझ्यावर गोळ्या झाडणारच होता. इतक्यात श्री सिद्धलिंगप्पाजींनी मोठ्या वेगाने गाडी पुढे नेली, म्हणून मी व माझे दोन सोबती मरणाच्या दाढेतून निसटलो.

टेकमाल (तालुका जोगीपेठ जिल्हा मेदक) येथे आर्य समाजाच्या स्थापने संदर्भात पंडित बुद्धदेवजी, पंडित गोपदेवजी, पंडित विनायकरावजी आणि मी असे चौघेजण श्री बसव मानय्याजी (अध्यक्ष, आर्यसमाज जोगीपेठ) यांच्या सोबत जाऊन तेथे पोंहोचलो. संध्याकाळी सभा होणार होती. तेव्हा तेथील मुसलमानांनी नग्न तलवारी आणि बंदुका घेऊन मिरवणूक काढली. त्यामुळे संपूर्ण गावात भितीचे वातावरण निर्माण झाले. आर्य समाजाची स्थापना होऊ शकली नाही. आम्ही सगळे हैद्राबादला परत आलो. पण माझ्या मनात सारखे वाटत होते की, कोणत्याही परिस्थितीत टेकमालला जाऊन आर्य समाजाची स्थापना केलीच पाहिजे. दिवस व तारीख ठरविली गेली. जाण्याकरीता ट्रकची व्यवस्था केली. हैद्राबादहून एस. वेंकटस्वामीजी एडवोकेट, गंगारामजी एडव्होकेट, राजा रेड्डीजी, माणिकरावजी, लक्ष्मी नारायणजी (कवाडीगुडा) आणि मी टेकमालला जाऊन पोंहोचलो. दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीमान अबुल हसन कैसर साहेब समवेत सभेचे प्रधान श्री पं. विनायकरावजी विद्यालंकार पोहोंचले. टेकमालला तेथील दर्ग्याच्या आवारात गेले. त्या ठिकाणी मुसलमान मोठ्या संख्येने शस्त्रांसह जमले होते. मेदक जिल्ह्याचे पोलीस सुपरिंटेंडेंट मिस्टर चारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. म्हणून कोणतीही दुर्घटना झाली नाही. पंडित विनायकरावजींच्या हस्ते आर्यसमाजाची स्थापना झाली. टेकमालच्या सभेनंतर सर्वांच्या इच्छेनुसार निजाम तलाव पाहण्याचा कार्यक्रम निश्चित झाला होता. परत येतांना रात्र झाली. निजाम सागर पासून दहा मैल अंतरावर एका ओढ्यात लपून बसलेल्या दोन पठाणांनी आमच्या मोटारीवर

गोळ्या झाडल्या. श्री गंगाराम एडव्होकेट च्या कमरेच्या वरच्या बाजूला गोळी लागली व रक्त वाहू लागले. दुसरी गोळी सूंसूं करीत माझ्या गांधी टोपीला स्पर्श करून गेली. याच मोटारीत पंडित विनायकरावजीही होते. परमेश्वर कृपेने आम्ही थोडक्यात बचावलो. आर्य प्रतिनिधी सभेचे उपदेशक सांबमूर्ती सिद्धांतरत्न आर्यसमाजच्या स्थापनेसाठी नागर कर्नूलला गेले. तेथून ते आर्य समाजाची स्थापना करून परतत होते. इतक्यात तहसीलच्या देखरेखीसाठी ठेवलेल्या अरबांनी त्यांच्यावर तलवारीने हल्ला केला. अत्यंत गंभीररीत्या जखमी अवस्थेत त्यांना नागर कर्नूलच्या दवाखान्यात दाखल करण्यात आले. ते जखमी झाल्याची बातमी मला मिळताच मी नागर कर्नूलला गेलो. सांबमूर्तिजींच्या शरीराची अवस्था पाहिली. जखमा खोलवर झालेल्या होत्या. मी तेथे एक दिवस थांबलो. ज्या घरात मी थांबलो होतो, तेथे रात्री अकरा वाजता अरबांनी चारी बाजूंनी घेरले. बंदूकींच्या आवाजाने भयभीत होऊन लोकांनी घरातच स्वत:ला बंदीस्त करून ठेवले होते. ही घटना घडली तेव्हा फक्त एक नवखा तरूण माझ्या सोबत होता. रात्रभर हल्ले होत होते. या हल्ल्याची बातमी सिद्धलिंगप्पाजी महबूबनगरला समजली, तेंव्हा रात्री दोन वाजता ते नागर कर्नूला येऊन पोंहचले. ते माझ्याकडे येत असलेले पाहून अरबांनी त्यांच्यावरही हल्ला केला. त्यातून ते थोडक्यात बचावले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांची भेट झाली, तेव्हा झाल्या गोष्टीची माहिती मिळाली. आम्ही दोघांनी दवाखान्यात जाऊन सांबमूर्तिवर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर कारवाई करण्याचा विचार व्यक्त केला, पण त्यांनी त्यास नका दिला. त्याचे कारण विचारले असता ते छुपे कम्युनिस्ट आहेत असे समजले. अरबांविरूद्ध कोणतीही कारवाई करणे ते मान्य करीत नाहीत. त्यांची ही गोष्ट ऐकून आम्हाला आश्चर्य वाटले. नंतर ते एका खूनाच्या प्रकरणाशी संबंधित असल्याचे कळले. म्हणून अटक होण्यापासून वाचण्यासाठी त्यांनी आर्य समाजाचा आश्रय घेतला होता. त्यावेळी ते कम्युनिस्ट पार्टीचे सक्रींय सदस्य होते.

## संमेलनात गोंधळ

आर्य सत्याग्रहानंतर सभेने प्रतिवर्षी आर्यसम्मेलन भरविण्याचे ठरविले. या संकल्पानुसार इ.स. १९४२ पासून अशा प्रकारच्या अधिवेशनाचे आयोजन होऊ लागले. दि.२२ एप्रिल १९४५ रोजी गुलबर्ग्यांत संमेलन साजरे होत होते. त्याचे अध्यक्ष राजा नाराणयणलालजी पित्ती हे होते. सम्मेलनाचे उद्घाटन आर्य समाजाचे प्रसिद्ध नेते व मध्यभारताचे स्पीकर घनश्याम सिंहजी गुप्त हे करणार होते. गुप्तजीवर सरकार कडून भाषण करण्यावर बंदी घालण्यात आली आणि मलाही हैद्राबाद सोडून कोठे बाहेर जायचे नाही. अशी नोटीस बजावण्यात आली. ही नोटीस मला गुलबर्गा येथे मिळाली. मी सरकारला या नोटीसीचे उत्तर दिले.

संमेलनाच्या शेवटच्या दिवशी जेव्हा उत्सवाची सांगता होणार होती, तेव्हा संध्याकाळी चार वाजता एक पोलीस कान्स्टेबल सभामंडपात येऊन बिडी ओढू लागला. श्री शिवकुमारजींनी त्याला बिडी ओढण्यास रोखले. पण त्याने ऐकून न ऐकल्यासारखे केले आणि लगेच त्याने पोलीस कँप मध्ये जाऊन आपल्या सहकाऱ्यांमध्ये अशी अफवा पसरविली की ‘आर्यसमाजी लोकांनी त्याला खूप मारले आहे’. मग काय पाहायचे? कांहीही विचार न करता, डी.एस.पी. श्री हरिश्चंद्रजी सभामंडपात येऊन मला म्हणाले की, तुम्हां तिघांना कलेक्टर साहेबांनी बोलाविले आहे. तेंव्हा मी, पंडित विनायकरावजी व पं. गणपतरावजी शास्त्री या तिघांनी त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तिकडे निघालो. तेथे जाऊन पाहतो तर काय? पन्नास-साठ कान्स्टेंबल बंदूका व काठ्या घेऊन तयार होते. दोन-चार मिनिटेही कांही बोलणे झाले नाही की, लगेच पोलीस जवान आमच्यावर तुटून पडले. हीरालालजींना जबरदस्त मार बसला. रावसाहेबांना खूप बडविले. शास्त्रीजींचे डोके फुटले. माझ्या पायाचे हाड मोडले व डोक्यावरही बऱ्याच मोठ्या जखमा झाल्या. गुलबर्ग्याच्या दवाखान्यात आम्हां सर्वांना दाखल केले, परंतु रावसाहेबांच्या प्रयत्नांमुळे हैद्राबादचे प्रधानमंत्री नवाब साहेब छत्तारी (सईदुलमुल्क बहादुर) यांनी खास अँबुलंस गाडी पाठवून मला उस्मानिया दवाखान्यात दाखल केले. डोक्याला सात टाके पडले आणि पायाच्या हाडाला दुसरे हाड जोडून ते

दुरूस्त करण्यात आले. एक महिना वीस दिवस उस्मानिया हॉस्पीटल मध्ये राहून घरी मी परतलो ही नव्हतो की लगेच गुलबर्ग्याची नोटीस पुन्हा दुसऱ्यांदा बजावण्यात आली. त्याप्रमाणे मी एक वर्षभर हैद्राबाद शहरात जनरकैदेत राहिलो. मला अटक आणि नजरकैद नेहमीच होत असे आणि जेल माझ्यासाठी कायम वास्तव्याचे ठिकाणच होऊन बसले होते. निजाम सरकारच्या दृष्टीने नरेंद्र 'नकोसा व नावडीचा बंडखोर' होता. घरी असो अथवा बाहेर सी. आय. डी. सावली सारखी माझ्यावर नजर ठेवून होती.

## दहशतीचे राज्य

संपूर्ण हैद्राबाद संस्थानात अत्याचार, अन्याय आणि दु:खांची शृंखला सुरू झाली होती. 'इत्तेहादुल मुसलमीनने ''जिहाद'' चा नारा दिला होता. गावागावात गुंड लोक हिंदुविरूद्ध कार्यतत्पर झाले होते. आर्यसमाजी तरूणांनी खंबीरपणे उभे राहून त्यांचा मोठ्या धैर्याने सामना केला. मुस्लिम अधिकाऱ्यांचे गुंडांना संपूर्णपणे संरक्षण, चिथावणी, समर्थन होते. त्यामुळे बरेचसे आर्यसमाजी तरूण त्यांच्या अत्याचाराला बळी पडून हुतात्मे झाले, याचे वर्णन या पूर्वी आलेच आहे.

हैद्राबादेतील आर्य समाजाच्या इतिहासाला भारतीय इतिहासातही महत्त्वपूर्ण स्थान आहे. एकीकडे निजामाची शक्ती तर दुसरीकडे शिर तळहातावर घेऊन लढणाऱ्या आर्यसमाजी तरूणांचे धाडस ! त्यांनी वैदिक संस्कृतीचा झेंडा कधीही खाली झुकू दिला नाही पण या उलट त्याच्या रक्षणासाठी त्यांनी हसत-हसत प्राण अर्पण केले.

गावागावात हल्ले होत होते. बाजारपेठा लुटल्या जात होत्या. स्त्रियांचे शील भ्रष्ट केले गेले. मंदिरे पाडली जाऊ लागली. अशा प्रकारच्या अत्याचार व जुलूमांनी पूर्व बंगाल आणि पाकिस्तानच्या सरहद्दी वरील अत्याचारांना देखील लाजविले होते.

जेव्हा डोक्यावरून पाणी वाहू लागले म्हणजेच सहन करण्याची क्षमता संपली आणि सारे राज्य एक कारागृह बनले, तेव्हा मरणाच्या आकांताने वरील समस्येच्या निवारणासाठी कोणत्या मार्गाने जावे, असा

प्रश्न पडला व यावर उपाययोजनात्मक विचार करण्यास भाग पाडले.

## स्वतंत्र हैद्राबादचे आंदोलन,

सन १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. त्याच बरोबर हैद्राबादच्या निजामाच्या डोक्यात 'स्वतंत्र हैद्राबाद'चे भूत जागे झाले व हैद्राबादच्या स्वातंत्र्याचे आंदोलन सुरू केले. अंजुमन–इत्तेहाद–उल–मुसलमीन या संघटनेने मोठ्या जोमाने राज्यात प्रचार सुरू केला होता.

या आंदोलनाच्या विरोधात काँग्रेसने स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्त्वाखाली सत्याग्रह सुरू केले. सहा–सात हजार लोकांनी सत्याग्रहात भाग घेतला. निजामाचे सगळे जेलखाने तुडुंब भरले होते. हैद्राबाद शहरात शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न हा केवळ वरकरणी होता. बाहेरच्या लोकांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासारखाच हा प्रकार होता. जिल्ह्यांत रजाकारांनी असे कांही अत्याचार केला होता की ते सांगतांना काळीज थरथरते व डोळ्यातून रक्ताच्या धाराच वाहू लागतात. निजामाने आपल्या वेगळ्या स्वतंत्र राज्याची घोषणा करून भारत सरकार समोर गूढ व चिंतेचा प्रश्न निर्माण केला होता. राज्यातील युवकांनी रजाकारांचा मोठ्या धैर्याने सामना केला. काँग्रेसच्या या आंदोलनात आर्यसमाजी लोक नेहमीच पहिल्या रांगेत होते. मला सत्याग्रहाच्या पूर्वीच अटक करून चंचलगुड्याच्या सेंट्रल जेलमध्ये नजरबंद केले होते. माझ्या अटकेच्या एका आठवड्यानंतर काँग्रेस सत्याग्रहाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ, डॉ. मेलकोटे, श्री. कृष्णाचार्य जोशी (ॲडव्होकेट) यांनी सुलतान बाजारात सत्याग्रह करून अटकेसाठी स्वत:ला झोकून दिले. त्यांना अटक करून जेलमध्ये टाकले.

भारत सरकारने जेव्हा तिरूमलगिरी आणि बोलाराम येथे असलेल्या आपल्या सेनेला परत बोलाविले, तेव्हा निजाम व त्याच्या सरकारचा उत्साह वाढला.रजाकारांचा जोर दिवसेंदिवस वाढत होता. जागो जागी खून व विध्वंसाच्या घटना घडू लागल्या. त्या वेळी आर्यसमाजी नवयुवक उगीच गुपचुप तमाशा बघत हातावर हात ठेवून बसू शकत नव्हता. युवकांनी शस्त्रे हाती उचलली व रजाकारांना बदडून काढले.

श्रीमान भाई शेषरावजी वाघमारे वकीलांनी ज्या साहसाने हौतात्म्याच्या भावनेचा परिचय दिला, तो हैद्राबादच्या स्वातंत्र्य संग्रामात सुवर्ण अक्षरांनी लिहिण्या सारखा आहे. ते कर्मठ व निष्ठावान आर्यसमाजी होते. त्यांनी आपल्या मुला-मुलींचे विवाह, जन्मत: जात-पात तोडून केले आहेत. त्यामुळे त्यांना घरी व अन्य सोयरे पाहुण्याच्या कडक विरोधाला तोंड द्यावे लागले.

## क्रांतिकारी नारायण पवार

येथे एका अशा युवकाचा उल्लेख केल्याशिवाय राहू शकत नाही. निजाम मीर उस्मान अली खाँ आणि सरकारच्या अत्याचार व दुराचाराचा बदला घेण्यासाठी व त्याला भारताशी केलेल्या गद्दारीची शिक्षा देण्यासाठी या तरूणाने स्वत:ला मृत्युच्या जबड्यात झोकून दिले. निजामाच्या मोटारीवर त्याने बाँब टाकला पण नेम चुकल्याने निजाम वाचला. श्री. नारायणराव पवार (बी.ए.एल.एल.बी.) आणि श्री गंडय्याजींना अटक करण्यात येऊन खटला भरण्यात आला. नारायणराव व गंडय्याजीं या दोघांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली, तर तिसरे आरोपी जगदीशजी यांना मात्र अटक होऊ शकली नाही. श्री. नारायणराव पवार आणि गंडय्याजी यांनी आपल्या इच्छा-आकांक्षांनी भरलेले तारूण्य स्वत:ला भारत मातेच्या चरणावर समर्पित केले होते.

हैद्राबाद राज्यात अत्याचार व दहशतींनी कळस गाठला होता. हैद्राबाद राज्याचा शासक नवाब मीर उस्मान अली खाँ याने आपल्या एका विशेष आदेशान्वये नवे इस्लामिक राज्य व भारतापासून वेगळ्या अशा स्वतंत्र राज्याच्या स्थापनेची घोषणा केली. हैद्राबाद राज्य एका स्वतंत्र राष्ट्राच्या रूपाने राहू इच्छिते. या घोषणेने बहुसंख्यक हिंदूंचे डोळे उघडले. निजामाची ही घोषणा भारतासाठी एक षडयंत्र व जबरदस्त धोका असल्याचा अनुभव हिंदूंना आला. हैद्राबादच्या जनतेने डोळ्यावरची झापड काढली. निजामाच्या या महादुष्ट निर्णयाच्या विरूद्ध हैद्राबाद राज्यातील वेगवेगळ्या विचारांच्या लोकांना या एकाच मुद्यावर एकत्र आणून हुकूमशाही शक्ती विरूद्ध लढा देण्याचा निश्चय केला.

अहिंसेवर विश्वास ठेवणाऱ्या हैद्राबाद स्टेट काँग्रेसने सत्याग्रहाची घोषणा केली, पण आम्ही तरूणांनी निजाम व कासीम रझवीचे स्वप्न साकार न होऊ देण्यासाठी वचनबद्ध होऊन क्रांतिकारक पावले उचलण्याचे व रजाकारांशी सर्वशक्ती पणाला लावून त्यांविरूद्ध लढण्याचे ठरविले. रजाकारांशी मोठ्या सामर्थ्याने लढण्याचा निश्चय केला. राज्यातील विविध गावात जीवघेण्या अत्याचाराच्या आगीने हिंदू जनता होरपळत होती, अशा या कृत्यांना निजामाचा आशीर्वाद होता.

या विचारांना मूर्त स्वरूपात आणण्याच्या उद्देशाने माझ्या मनात निरनिराळे विचार येत होते. अशा या विचारांच्या विश्वात काही महिने गेले. शेवटी मी १९४२ च्या छोडो भारत आंदोलनाच्या वेळी क्रांतीचे रणशिंग फुंकणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटलांची मदत घ्यायचे ठरविले. कारण त्यांच्यामुळे इंग्रजांचे डोके ठिकाणावर आले होते व ते इंग्रजी शासनासाठी धोक्याचे ठरले होते. म्हणून मी व श्री गोपालदेवजी कल्याणी असे दोघे नाना पाटलांकडे गेलो.

नाना पाटलांशी आम्ही हैद्राबादच्या परिस्थिती विषयी खूप वेळ चर्चा केली. घडणाऱ्या वाईट घटनांची त्यांना माहिती दिली. या बाबतीत त्यांनी आपल्या अनुभवाच्या आधारे, ''आम्ही काय करावे?'' यावर मार्गदर्शन करावे, अशी विनंती केली. नाना पाटील किर्लोस्करवाडी जवळ एका गावात राहात होते. त्यांनी 'पत्री सरकार' या नावाने एक संघटना उभी केली होती. त्यांच्याशी आमचे दोन दिवस वार्तालाप होत राहिला. नानांनी क्रांतीच्या उपाययोजनांची आम्हाला माहिती दिली. सोबतच असे बजावले की हे काम मोठ्या हिंमतीने व सावधपणे केले पाहिजे. आम्ही त्यांच्या अनुभवाने लाभान्वित होऊन शिवाजीनगर व खडकीला गेलो. तेथे हैद्राबादचे निवासी श्री राजा रेड्डीजी (मुलूख मैदान तोफ) व श्री माणिकरावजी आगापुरा हे एक दिवस आधीच पोहोचले होते. आम्ही सगळ्यांनी सैन्यातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याशी संपर्क स्थापन करून त्यांच्या कडून सहा हातबाँब मिळविले व तेथून हैदराबादला परतलो. एका फळाच्या टोपलीत ते हातबाँब लपवून आणावे लागले. आम्हाला

घेण्यासाठी श्री. देवय्याजी आर्य यांची मोटार बेगमपेठ रेल्वे स्टेशनवर पूर्वीच येऊन थांबली होती. त्यात बसून आम्ही सरळ आर्यसमाज सुलतान बाजारला पोहोचलो. पूर्वी ठरल्याप्रमाणे चार बाँब मराठवाड्यात पाठविले. दोन बाँब आर्यसमाज सुलतान बाजार येथील माझ्या राहायच्या खोलीत ठेवले. याचा प्रयोग करण्याच्या निश्चित तारखेपूर्वीच मला सी.आय.डी. इन्स्पेक्टर श्री धरणीप्रसादजी बाजपेयी यांनी अटक केली. त्यावेळी श्री तुळशीराम आर्य समाजाचे सेवक म्हणून कार्यरत होते. माझ्या खोलीत ठेवलेले ते दोन्ही बाँब त्यांनी श्री. नारायणराव पवार (बी.ए.एल.एल.बी.) यांना दिले. श्री पवारांनीच एकदा प्राण तळहाती घेऊन निजामाच्या कारवर बाँब टाकला होता. हे बाँब निजामावर फेकण्यासाठी उपयोगी पडले. हैद्राबादच्या जनतेचे दुभार्ग्य म्हणून की काय यातून निजाम थोडक्यात वाचला. श्री. नारायणरावजींना फाशीची शिक्षा तर सुनावण्यात आली खरी पण त्यांना फाशी होऊ शकली नाही. निजामाच्या काळात कोणालाही ''एखादी शिक्षा झाली तर फाशी मात्र दिली जात नसे. निजाम फाशीच्या शिक्षेला आजन्म कारावासात बदलत असत.

हैद्राबाद राज्यातील या नवयुवकांचे हे पाऊल व हा क्रांतिकारी भाव महर्षी दयानंदांच्या शिकवणुकीचाच परिणाम होता. अशीच प्रेरणा स्वामीजींनी १८५७ च्या राष्ट्रीय उठावाच्या वेळी नर्मदा नदीच्या काठावर भ्रमण करतांना क्रांतिकारकांना प्रोत्साहनपर म्हणून अप्रत्यक्षपणे दिली होती.

## स्वतंत्र हैद्राबाद आंदोलन

स्वतंत्र हैद्राबादचे आंदोलन अगदी परमोच्च बिंदुवर जाऊन पोंहोंचले होते. हैद्राबादेत मजलिस इत्तेहादुल मुसलमीन तेच काम करीत होती, जे की ''मुस्लीम लीग'' संपूर्ण भारतात करीत होती. इंग्रजी साम्राज्याने आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी फोडा व झोडा ('फूट पाडा व राज्य करा') या सिद्धांतानुसार द्विराष्ट्राची भावना देशात पसरविली होती. ती भावना देशाच्या विभाजनानंतरही नाहीशी झाली नव्हती, तीच भावना मुसलमानात पसरली होती. याच भावनेने प्रेरित होऊन इत्तेहादुल मुसलमीन

ने आम्ही बादशाह आहोत च्या गर्वोक्ती द्वारे राज्यातील बहूसंख्यक हिंदू जनतेला आतंकित व भयभीत करण्याचे भरपूर प्रयत्न केले. मुसलमानांच्या या प्रांतीय संघटनेचा असा तर्क होता की 'हैद्राबाद हे एक इस्लामीक राज्य आहे. याचा बादशहा मुसलमान आहे आणि धार्मिक संबंधामुळे मुसलमानांना सत्ता प्राप्त करण्याचा अधिकार आहे'. ही संघटना निजामाच्या व्यक्तिगत राज्यसत्तेला केवळ मुसलमानांच्या सत्तेचा प्रतिनिधी समजत असे. 'दक्षिणेतील हैद्राबाद स्टेट हे पाकिस्तानच्या उद्देशाची पूर्तता करू शकेल'. याच हेतूने हे आंदोलन चालविले जात होते. म्हणूनच या आंदोलनाला मुस्लीम लीगचे सहकार्य व समर्थन मिळाले होते. वस्तुस्थिती अशी की, हैद्राबादेत ८६ टक्के प्रजा हिंदू होती. काश्मीरात मुस्लीम लीगचा तर्क होता की तेथे मुसलमानांची संख्या जास्त आहे पण एक हिंदू राजा असल्याने त्याला 'हिंदू राज्य' म्हणता येत नाही. ब्रिटिश राजनितीच्या दृष्टीकोणातून हैद्राबादेत मुस्लीम लीग आर्य समाजाला शत्रू समजत होती. कारण याच आर्य समाजाने तिचा प्रतिकार इस्लामी तबलीग (धर्म परिवर्तन) पासून ते स्वतंत्र हैद्राबाद आंदोलना पर्यंत सक्तीने व जोरदारपणे केला. या पुढील घटनांची दुसरी मालिका म्हणजेच जुन्या आठवणींवरील दृष्टिक्षेप होता. राजकीय दृष्टीकोनातून जनतेसमोर प्रस्तुत करेन. जुन्या आठवणींच्या या शृंखलेत चार-पाच महत्त्वपूर्ण आणि ह्रदयस्पर्शी घटनांचे वर्णन केल्यानंतर माझ्या या रामकथेला थांबवितो.

## हिंदी आंदोलन

सरकार अकाली दलाच्या प्रभावाखाली होते. पंजाब सरकारचे तत्कालीन मुख्यमंत्री प्रतापसिंह कैरों होते, ते काँग्रेस पार्टीकडून निवडून आले असले तरी त्यांनी भीमसेन सच्चर अहवाल लागू करून हिंदी सोबत पंजाबी भाषेला गुरूमुखी लिपीसह सक्तिचे केले. खरे तर पूर्वी पंजाबमध्ये हिंदूचे बहूमत होते. तरी पंजाबीला प्रथम भाषा बनवून हिंदीला द्वितीय भाषेचे स्थान दिले होते. हिंदी माध्यमाच्या शाळा व महाविद्यालयांना पंजाबी माध्यमात रूपांतरित करण्यास भाग पाडण्यात येत होते. तेव्हा

हिंदी व हिंदूच्या अधिकारांचे योग्य रक्षण करण्यासाठी श्री घनश्यामसिंहजी गुप्त यांच्या नेतृत्वाखाली आर्यसमाजाला १९५७ मध्ये 'हिंदी आंदोलन' सुरू करावे लागले. या आंदोलनाचे संचालन सार्वदशिक आर्य प्रतिनिधी सभा दिल्ली ने केले होते. संपूर्ण भारतातून तेवीस हजार सत्याग्रहींनी स्वत:ला अटक करवून घेतली होती. प्रतापसिंह कैरोच्या अत्याचारी भ्रष्ट सरकारने जे जुलूम केले, त्या आठवणींनी काळजाचा थरकाप होतो, डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. श्री सुमेरसिंह यांना फिरोजपूरच्या जेल मध्ये शहीद ठरविण्यात आले. सत्याग्रहींवर अत्याचारांचे डोंगर कोसळत होते. प्रथम सत्याग्रहाचे डिक्टेटर पूज्य स्वामी आत्मानंदजी महाराजांनी मला 'दिल्लीला जाऊन सत्याग्रहाच्या कामाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारावा, अशी आज्ञा दिली. स्वामीजींच्या आज्ञेचे मी पालन केले. मी दिल्लीला जाऊन आदरणीय घनश्यामसिंहजी गुप्तच्या आदेशाप्रमाणे पाच महिन्यांपर्यंत सत्याग्रहाचे संचालन करीत राहिलो.

हैद्राबादच्या आर्यांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात भाग घेतला होता. यात सर्व श्री मुन्नालालजी मिश्र, स्व. श्री. दत्तात्रेयप्रसादजी एडवोकेट (गुलबर्गा) श्री. शेषरावजी वाघमारे एडव्होकेट (निलंगा), श्री नरदेंवजी स्नेही (परळी), श्री. ज्ञानेंद्रजी शर्मा (औरंगाबाद), श्री. हरिश्चंद्र गुरूजी (औराद-गुंजोटी), श्रीमती प्रभावती देवी, श्रीमती कमला देवी आणि श्रीमती मदालसा देवी (कल्याणी) ही नावे उल्लेखनीय आहेत. भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना अबुल कलाम आजाद आणि शिक्षणमंत्री गोविंदवल्लभ पंत यांनी पंडित इंद्र विद्यावाचस्पती व घनश्याम सिंहजी गुप्त यांच्याशी सत्याग्रहासंदर्भात संपर्क साधला होता. या वरून आपण सत्याग्रहाच्या वाढत्या उत्साहाचा व त्याच्या प्रभावाचा निश्चित अंदाज लावू शकतो. या दोन नेत्यांसोबत मी देखील गृहमंत्री श्री. गोविंद वल्लभ पंतांना भेटण्यास त्यांच्या निवासस्थानी गेलो होतो. दोन तास चर्चा झाली. त्यांनी आश्वासन दिले की सार्वदेशिक आर्यप्रतिनिधी सभेच्या सर्व मागण्या पंजाब सरकार कडून मान्य करून घेण्यात येतील. त्यामुळे आंदोलन थांबविले गेले. परंतु दु:खाची गोष्ट ही की प्रतापसिंह

कैरोच्या धमकीला बळी पडून गोविंद वल्लभपंतांसारख्या ज्येष्ठ राजकीय राजनितीनिपुण व्यक्तीनेही दिलेला शब्द फिरविला. सच्चर समितीच्या शिफारसींचा परिणाम असा झाला की, सहा हजार हिंदी शिक्षकांना नौकरीतून काढून टाकले व पंजाबी शिक्षण अनिवार्य केले गेले. हे सत्याग्रह आंदोलन यशस्वी करण्यासाठी रामगोपालजी शालवाले, पं. प्रकाशवीरजी शास्त्री, पं. शिवकुमारजी शास्त्री, पं. रघुवीरसिंहजी शास्त्री, आचार्य भगवानदेव जी (स्वामी ओमानंदजी) आणि श्री ओमप्रकाशजी पुरूषार्थी इत्यादींचे योगदान महत्त्वाचे ठरले.

## हिंदी आंदोलनाचा लाभ

या सत्याग्रहाने अकाली दलाच्या हिंदू विरोधी दृष्टीकोणामुळे घाबरलेल्या हिंदूंच्या मनात नवजीवनाची चेतना उत्पन्न झाली. आर्य समाजाने पुढाकार घेऊन पंजाब मधील हिंदूच्या अधिकाराच्या रक्षणासाठी आपले महान बलिदान दिले नसते, तर पंजाबात अकालींचा हिंदू विरोधी दृष्टीकोण वाढीला लागला असता व व्यवहारिक दृष्टीने व व्यवहारात हिंदूंना दुय्यम दर्जाचे नागरिक बनवून ठेवले असते. आज पंजाबमध्ये हिंदू सन्मानपूर्वक आणि गौरवाने जीवन जगत आहेत. आर्य समाज तेथे एका सक्रीय व जागृत आंदोलनाच्या रूपात त्यांच्या जीवनाचे अभिन्न अंग बनले आहे. अकाली सरकार असो की काँग्रेसी सरकार किंवा कोणीही असो ! आर्य समाजाला डवचणे म्हणजे वाघाच्या जबड्यात हात घातल्यासारखे आहे, असे ते समजतात. या आंदोलनात मी रात्रंदिवस एक करून जे काम केले होते, या गोष्टीला आर्य जगातील लोक चांगले ओळखून आहेत. त्याकाळी मी पंडित विनायकरावजी विद्यालंकार यांना जे पत्र लिहीले होते, त्याचा कांही भाग पुढीलप्रमाणे आहे.

मी आपल्या या विचारांशी सहमत आहे की, लोकशाही राज्यात सत्याग्रहाला कोणताही पर्याय नाही ! परंतु सरकारला समजावणे व योग्य मागण्या मान्य करण्यासाठी सर्व कायदेशीर उपाय बंद झाल्यानंतर दुसरा कोणताही योग्य निर्णय न झाल्यास कोणता उपाय करावा ?

‘‘मी ही गोष्ट केव्हाही मान्य करणार नाही की बहुमत नेहमी सत्याच्याच बाजूनेच टिकून असते. पार्टीच्या धोरणाला कायम ठेवण्यासाठी कधी–कधी बहुमत विरूद्ध दिशेनेही जात असते, जाऊ शकते आणि मी हे देखील मानत नाही की अल्पमताचा एखादा पक्ष नेहमी असत्याच्याच बाजूने असतो. अन् हीच गोष्ट मानली जाऊ लागली आणि त्यांच्या मागण्या मान्य न करता त्यांचा तिरस्कार होऊ लागेल. जो पर्यंत ही पद्धत राहील, तो पर्यंत सत्याग्रह पद्धतीचा अवलंब करावाच लागेल.‘‘

‘‘लोकशाहीत विरोधी पक्ष आवश्यक आहे. जर शासनाचे काम योग्य मार्गाने चालले नाही, तर जनतेने जागरूक राहणे आवश्यक आहे. वेळ पडल्यास अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लोकांनी उभेही राहिले पाहिजे. जो पर्यंत आमच्या निवडणुकांत अशी पद्धत राहील की निवडून आलेला माणूस वर जाऊन पक्ष श्रेष्ठीच्या नियंत्रणाखाली राहील तर तो जनतेशी इमानदार राहणार नाही, तोपर्यंत जनतेला आपल्या प्रतिनिधीकडून विधानसभा अथवा लोकसभेत काम करवून घेता येणार नाही, कारण ते पक्षाशी बांधलेले असतात. तेंव्हा जनतेला स्वत: प्रयत्न करण्याचा लोकशाहीत मौलिक अधिकार मिळालेला आहे.‘‘

## गोरक्षा आंदोलन

सन १९६६ मध्ये पुरीचे जगद्गुरू शंकराचार्य यांच्या नेतृत्वा खाली गोरक्षा आंदोलन चालविले गेले. पाच लाख हिंदूंचा एक ऐतिहासिक मोर्चा लोकसभेवर काढण्यात आला होता. तेथे जाऊन प्रधानमंत्री, गृहमंत्री श्री. गुलजारीलाल नंदा यांना गोरक्षा नियम बनविण्यासाठी त्यांचे ध्यान आकर्षित करण्याच्या उद्देशाने एक निवेदन दिले गेले. भारत सरकारने आपल्या ताकदीने हे आंदोलन संपविण्याचा प्रयत्न सुरू केला. पण हे सत्याग्रह आंदोलन अधिकच तीव्र होत होते. हजारो आर्यसमाजी लोकांनी या सत्याग्रहात भाग घेतला. १९६८ इ. मध्ये हैद्राबादला गोरक्षा–संमेलन भरले. अध्यक्ष पदावरून बोलतांना पुरीचे शंकराचार्य म्हणाले, ‘‘गोरक्षा आंदोलनात आर्य समाजाने जे सहकार्य दिले, त्या बद्दल मी आर्य

समाजाचा जन्मभर आभारी राहीन.'' या आंदोलनात २१ गोभक्त शहीद झाले. कॉंग्रेसी सरकारच्या अत्याचार, अनाचार, मारझोडीला न जुमानता भारताच्या कोनाकोपऱ्यातून लागोपाठ जत्थेच्या जत्थे दिल्लीला येऊन थडवले व स्वत:ला अटक करवून घेऊ लागले. अशा वेळी कांहीही न करता शांत बसणे माझ्या स्वभावाविरूध्द होते. तेव्हा मी ११२ सत्याग्रहींसह दिल्लीला पोहोंचलो व तेथील चांदणी चौकात हजारो हिंदू व आर्यांच्या उपस्थितीत सत्याग्रह केला. आम्हा सर्वांना तिहाड जेल मध्ये पाठविण्यात आले. तेथे न्यायाधीशांनी प्रत्येकी एक महिन्याची सजा ठोठावली. हैद्राबादहून श्री मुन्नालाल मिश्र, श्री. गोपालदेव शास्त्री, श्री. सोहनलाल वानप्रस्थी आणि श्री. बंसीलालजी आले होते. या शिवाय जालना, गुलबर्गा आदी ठिकाणच्या आर्यसमाजी लोकांनी देखील यांत हिरीरीने भाग घेतला होता. श्री करपात्रीजींच्या दोषपूर्ण कमकुवत नेतृत्वामुळे हे आंदोलन यशाच्या शिखरावर पोहोचण्यापूर्वीच सरकारच्या कपट कारस्थानाला बळी पडले.

## संयोजक म्हणून नेमणूक

सन १९६० ला आर्य प्रतिनिधी सभा उत्तर प्रदेशकडून दयानंद दीक्षा शताब्दी मथुरेत साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याच्या संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी 'स्वागताध्यक्षा'च्या रूपाने माझ्यावर सोपविण्यात आली. औरंगाबादचे श्री. ज्ञानेद्र शर्मा यांच्या सोबत मथुरेला जाऊन तीन महिन्यापर्यंत समारंभाची तयारी केली. भारताचे प्रथम राष्ट्रपती अजातशत्रू बाबू राजेंद्र प्रसादजींनी दयानंद-दीक्षाशताब्दीचे उद्‌घाटन केले होते. यावेळी दोन लाख आर्यसमाजी लोकांचा समूह उपस्थित झाला होता. या शताब्दी समारोहाच्या व्यवस्थापनातील माझ्या नियंत्रणाखाली झालेले काम आर्य जगताला आवडले होते. म्हणून तेव्हापासून सार्वदेशिक सभेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या सर्व संमेलनाच्या व्यवस्थापनासाठी मला निवडले जाऊ लागले. उदा. १९७२ चे अलवर महासंमेलन, १९७३ चे मॉरीशस आर्य महासंमेलन आणि १९७५ मध्ये दिल्लीला झालेला आर्य समाज शताब्दी समारंभ या सर्वांचे संयोजक म्हणून मला नियुक्त केले होते.

## एक दुर्घटना

तांडूरहून चिंचोलीला जाणाऱ्या सडकेवर कोतल्लापुर नावाचे एक लहान गाव आहे. तेथे एक देवीचे मंदिर पण आहे. तिची दरवर्षी जत्रा भरते. या उत्सवात हजारो भक्त सहभागी होतात. या मंदिराच्या चारी बाजूला पाण्याची पाच-सहा कुंडे आहेत. एकदा यात्रेकरूंनी या कुंडातील पाण्याचा उपयोग केला. परिणामी एक हजार लोकांचा मृत्यू झाला. तपासांती कळले की त्यां कुंडाचे पाणी विषारी आहे. हे सांगणे कठीण आहे की, विषारी प्रभाव नैसर्गिक कारणामुळे निर्माण झाला की अन्य कोण्या समाजविघातक संघटनेची करामत आहे? तेव्हा हैद्राबाद राज्यात हिंदू मुस्लीम तनाव फारच वाढलेला होता. या दुर्घटनेची माहिती मिळताच मी व स्वामी अभयानंदजी तांडूरला जाऊन पोंहोचलो. आर्य समाज मुंबई व आर्य समाज गुलबर्गा येथील आर्यसमाजी लोक देखील तेथे येऊन पोंहोचले. आम्ही सर्वजण एक महिनाभर सेवा मदत शिबिरात काम करीत होतो. हजारो लोक त्या विषाने प्रभावित झाले होते. त्यांना वाचविण्यासाठी इंजेक्शन दिले जात होते व उपचार केले गेले. प्रेतांवर अग्निसंस्कार केला होता. आर्य समाजातर्फे हे सेवा कार्य केले गेले नसते, तर कदाचित परिस्थिती आणखी जास्त बिघडली असती. ही घटना ३० मे १९४१ ची आहे.

## धर्मांतराला प्रतिबंध

मजलिस-ए-इत्तेहादुल-मुसलमीनचे अध्यक्ष नवाब बहादुरयार जंग याने एक गुप्त पत्र हैद्राबाद संस्थानातील इत्तेहादुल मुसलमीनच्या सर्व शाखांना पाठविले होते. यात आज्ञा होती 'हरिजनांना मुसलमान बनवा आणि प्रचार करू नका'. हे पत्र (गश्ती) स्वर्गीय बी. वेंकटस्वामीजींच्या प्रयत्नांमुळे प्राप्त झाले होते. या गोष्टीची माहिती जेव्हा हैद्राबादचे प्रसिद्ध नेते वामण नायकजींना मिळाली, तेव्हा त्यांनी आर्य समाजाचे सर्वेसर्वो श्री. चंदुलालजीशी संपर्क स्थापन केला आणि मुसलमान बनणाऱ्या हरिजनांचे शुद्धीकार्य चालू ठेवण्याचा निश्चय केला. स्वर्गीय

शंकर रैी, श्री. बलदेव पतंगे आणि माझ्यावर हे कार्य सोपविले. मिरियालगुडा, सूर्यापेठ, देवरकदरा, देवरकोंडा, परकाल, वरंगल आणि बाबा साहेबपेठ या ठिकाणी जाऊन मी मुसलमान बनविल्या गेलेल्या १० हजार हरिजनांना शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात सामील करण्यात आले. हे शुद्धी कार्य करतांना वाटेत कठीण आणि अवघड  अडचणी आल्या. त्यावेळी अशा परिस्थितीतून जावे लागले व सामना करावा लागला होता. आज त्याची कल्पनाही केली,  तर एक चमत्कारच झाल्याचे दिसते. शुद्धीच्या यशाला पाहून दारूल सलामच्या वार्षिक समारंभात नवाब बहादुरयार जंग भाषण करताना म्हणाला होता,  'एका कमी उंचीच्या नरेंद्रने माझ्या सर्व कामांवर पाणी फिरविले आणि आपण सर्व लोक हातावर हात ठेवून पाहात बसलात ! या मजम्यात असा कोणी मनुष्य नाही का जो -------?'' या शब्दांद्वारे त्याच्या  म्हणण्याचा उद्देश काय होता? याचा आपण अंदाज बांधू शकता ! ईश्वर कृपेने मी आजपर्यंत जिवंत आहे.

आर्य समाजाचे अस्तित्व या जगातून मिटवणारे उस्मान अली खाँ आणि त्याचा समर्थक नवाब बहादुरयार जंग या जगातून चालता झाला. त्यांचे नाव व ठिकाणही आज शिल्लक नाही, परंतु आर्य समाजाचा ओम् ध्वज आकाशात आपल्या पूर्ण प्रभावाने फडकत आहे आणि युगानुयुगे तो फडकत राहील. आर्यसमाज फुलाच्या सुगंधा प्रमाणे साऱ्या विश्वात पसरला आहे.

## नजरबंदीत साक्ष

हैद्राबादच्या धूलपेठच्या 'हिंदू-मुस्लीम दंग्या' संबंधात २१ आर्य समाजीं लोकांना पकडून खटला चालविला होता. या आरोपींमध्ये स्वर्गीय ठाकूर उमराव सिंहजी आणि पंडित सोहनलालजी यांचेही नाव होते. मला ठाकूर उमरावसिंहच्या बाजूने बचाव पक्षाकडून साक्षीदार म्हणून हायकोर्टात उपस्थित व्हायचे होते, परंतु साक्ष देण्याच्या चार दिवसापूर्वीच मला मनानूर मध्ये नजरकैदेत ठेवले होते. यावर असा प्रश्न उपस्थित झाला की नरेंद्रजींची साक्ष हायकोर्टात घ्यावी की साऱ्या कोर्टालाच मनानूरला घेऊन जावे. निजाम सरकारने निर्णय घेतला की मला मनानूरहून

हैद्राबादच्या चंचलगुडा जेलमध्ये आणण्यात यावे व एका विशेष कोर्टात साक्ष घेतली जावी. मनानूरच्या नजरकैदेच्या चौथ्या दिवशी मला श्री. अशफाकउल्ला यांनी मनानूरहून सेंट्रल जेलला आणले. तेथे हायकोर्टाचे जज खलील उजलमां सिद्दीकी आणि ज्यूरीच्या समोर माझी साक्ष लेखबद्ध करण्यात आली. जेलच्या चारी बाजूंनी पोलीसांचा जबरदस्त बंदोबस्त ठेवला होता. न जाणो हिंदू जनता जेलवर आक्रमण तर करणार नाही ना ? याची त्यांना भिती होती.

## खादी भक्ती

आज पासून त्रेचाळीस वर्षापूर्वीची गोष्ट आहे. सन १९३३ ला पंडित जवाहरलाल नेंहरू श्रीलंकेतून परतताना हैद्राबादला आले. ते भारतकोकिळा सरोजिनी नायडूच्या ''गोल्डन थ्रेशोल्ड'' या निवासस्थानी थांबले होते.

या वेळी पंडितजीनी आपल्या शुभहस्ते रेजीडेन्सी (ज्याला आता सुलतान बाजार म्हणतात) मध्ये खादी भांडाराचे उद्घाटन केले होते. तेव्हा माननीय भाई रामकृष्णजी धूत समाज जागृतीच्या कार्यक्रमात भाग घेत होते. त्यांच्या प्रयत्नाचे फळ म्हणजे खादी भांडाराची स्थापना होय.

मी त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन त्यांना मदत करण्याचे ठरविले. गांधी जयंतीच्या वेळी ढकल गाड्यावर खादी ठेवून गल्ली बोळातून घरोघरी जाऊन खादी विकत असे. तेंव्हापासून मी गांधीजींच्या राजनैतिक व रचनात्मक कार्यात भाग घेण्यास सुरूवात केली.

## नवजीवनाचे अग्रदूत

हैद्राबाद संस्थानात काँग्रेसची स्थापना करण्यासाच्या कामी सुद्धा अडचणींचे डोंगर उभे करण्यात आले होते. त्यामुळे राजकीय चैतन्य व जाणीव जागृती अजिबात नव्हती. धर्मवीर पंडीत वामन नायकजी आणि न्यायमूर्ती केशवराव (जज हायकोर्ट) हे निरनिराळ्या शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाच्या माध्यमातून हैद्राबादेत राजकीय चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होते, परंतु त्यांच्या या कार्यात सुद्धा सरकारकडून

विघ्ने उत्पन्न केली जात होती.

सन १९३४ ची गोष्ट आहे. महात्मा गांधीजी हरिजन-सुधारच्या कार्यक्रमांतर्गत हैद्राबादला आले होते. त्याच दिवशी विवेकवर्धिनी नाट्य मंचाच्या मैदानावर लाखो लोकांसमोर भाषण देतांना हरिजन-सुधारासंबंधातले त्यांचे विचार त्यांनी प्रगट केले होते. त्याने प्रभावित होऊन आम्ही काचीगुड्यात हरिजन-हॉस्टेलची स्थापना केली. श्रीमान वामन नायकजी अध्यक्ष, रवि रैीजी हे मंत्री, यरम सत्यनारायणजी हे कोषाध्यक्ष आणि मी कार्यकारिणीचा सदस्य होतो, खरे तर असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सामाजिक कार्यात माझी गोडी (अभीरूची) वाढवण्याचे कार्य मी या दोन संस्थात सहभागी झाल्यानंतरच सुरू झाले होते.

बदलत्या परिस्थितीत आणि निजामाच्या दडपशाहीच्या धोरणामुळे हैद्राबादेतील राजकीय नेत्यात जागृतीची भावना निर्माण झाली. सामाजिक आंदोलनाच्या माध्यमातून राजकीय चैतन्य निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रांतीय शिक्षण संमेलने, हैद्राबाद सामाजिक परिषद आणि वाचनालयांची स्थापना करण्यात आली. याच संबंधात श्रीमान राघवेंद्ररावजी शर्मा (एडव्होकेट) यांना राजकीय हालचाली उत्पन्न केल्यांचा आरोप ठेवून शहरबंदी केली गेली. त्यांनी अकोल्यात श्रीमान रामचंद्र नाईक (एम.ए., बार-एट-लॉ) यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय संमेलन आयोजित केले होते. या संमेलनात त्यांनी हैद्राबाद सरकारच्या अत्याचार, अनाचार आणि हिंसात्मक प्रवृत्तीचे वर्णन थोड्या वेगळ्याच पद्धतीने केले होते. त्यामुळे असे वाटत होते की हैद्राबाद राज्यातील जनता जबरदस्त प्रत्युत्तर देण्याची तयारी करीत आहे. पंडित केशवरावजी (जज हायकोर्ट), पंडित वामन नाईक, लक्ष्मणराव गानोजी, पंडित विनायकराव विद्यालंकार, चौधरी दिगंबररावजी (ॲडव्होकेट, औरंगाबाद), गोविंदराव जी नानल, काशीनाथरावजी एडव्होकेट, माडपति हनुमंतरावजी, बी. रामकिशनरावजी, एम. नरसिंहरावजी (संपादक रयत) दिगंबररावजी बिंदू इत्यादी नेत्यांचे हैद्राबादच्या राजकीय इतिहासात महत्त्वपूर्ण व प्रभावशाली स्थान होते. हैद्राबादची जनता विपरीत परिस्थितीतून जीवन कंठीत होती. अशा कठीण प्रसंगी या महात्म्यांनी आपले जीवन पणाला लावून जनतेची

सेवा केली. यामुळे हैद्राबादेत नवजीवनाची लक्षणे दिसून येत होती.

येथे एका महत्त्वपूर्ण ऐतिहासिक व क्रातिकारी घटनेचे वर्णन करणे संयुक्तिक ठरेल ! कुर्तकोटीच्या श्री. शंकराचार्यजी कुर्तकोटीच्या अध्यक्षतेखाली सामाजिक परीषदचा प्रेम थियटर मध्ये एक समारंभ आयोजित केला होता. स्वागत समितीचे अध्यक्ष प्रतापगिरीजी होते. हैद्राबादेतील हरिजनांचे प्रसिद्ध नेते श्री भाग्यरी हे आदि हिंदू सोशल सर्व्हीस लीगचे अध्यक्ष होते. ते सुद्धा या संमेलनात सामील झाले होते. हरिजन–उद्धाराच्या कार्यात बालमुकुंदराय साहेब हे विशेष लक्ष्य देत होते. दुपारी जेव्हा प्रेक्षकांचे जेवण होत होते, तेव्हा पंडित केशवराव कोरटकर आणि विनायकराव विद्यालंकार यांनी श्री भाग्यरींनी सार्वजनिक रूपाने जेवण करणाऱ्यांच्या पंक्तीत आणून बसविले. मग काय? श्री सनातन धर्म सभेंशी संबंधीत नेते रामचंद्ररावजी गौलीगुडा आणि वामन नायक यांच्यात मोठे भांडण सुरू झाले. किती तरी हिंदू ब्राह्मण पंगतीतून उठून निघून गेले, परंतु पं. विनायकरावजी आणि पं. केशवरावजी यांनी या प्रखर विरोधाला न जुमानता श्री. भाग्यरींना सगळ्यांसोबत पंगतीत बसवून जेवण करविले. मी तेंव्हा एका स्वयंसेवकाच्या रूपात श्रीमान कृष्णास्वामी मुदिराज सोबत काम करीत होतो. ते स्वयंसेवक दलाचे प्रमुख होते. आम्ही सर्व कार्यकर्ते या सहभोजनात सामील झालो होतो. या साधारण घटनेने संपूर्ण शहरात सर्व नवयुवकांमध्ये क्रांतीचे पाऊल पडल्याने जागृती व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या नंतर आम्ही तरूणांनी निश्चय केला की गांधी जयंतीच्या वेळी गवळीगुडा राममंदिरात हरिजनांना प्रवेश देण्याचे अभियान सुरू करायचे ! सामाजिक सुधारणेतील हे आमचे पहिले पाऊल होते. या घटनेला जवळपास ४५ वर्षे झाली असावीत.

## राजकीय संघर्ष

हैद्राबाद राज्यातील परीस्थिती वेगाने बदलत होती. राजकीय दडपशाहीत उन्माद व दहशत भरलेली होती. असे असले तरी, आमच्या नेत्यांनी आंध्र महासभेची स्थापना करून, त्या द्वारे तेलंगण्यात काम

सुरू केले. त्यात माडपती हनुमंतरावजी, वेंकटरेडीजी, जमलापुरम केशवरावजी, बुरूगल रामकृष्ण रावजी आणि सुर्रवरम प्रताप रैडीजी हे भाग घेत होते. कर्नाटक व महाराष्ट्रात याच दिशेने परिषदांची स्थापना झाली. कर्नाटक परिषदेत जनार्दनरावजी देसाई, डॉ. जी. एस. मेलकोटे आणि श्रीनिवासरावजी अखेलीकर, तर महाराष्ट्र परिषदेत स्वामी रामानंद तीर्थ, काशीनाथरावजी वैद्य, विनायकराव विद्यालंकार, गोविंदभाईजी श्रॉफ, वैशंपायनजी, बाबासाहेब परांजपे व शेषराव वाघमारे काम करीत होते. या सर्व महापुरूषांनी जनतेत आत्मगौरव आणि स्वातंत्र्याची भावना जागृत केली. निजामाच्या हुकूमशाहीच्या विरूद्ध या मार्गदर्शकांच्या सोबत एका जनसेवकाच्या रूपाने मी स्वत:ला कामाला लावले होते. स्वामी रामानंदतीर्थ आणि दिगंबरराव बिंदूच्या प्रस्तावाने मला आंध्रसभा (बी) चा अध्यक्ष बनविले गेले. हे क्षेत्र हैद्राबाद, सिकंद्राबाद आणि तिरूमलगिरीवर आधारले होते. या क्षेत्रीय संमेलनाची फलश्रुतीतून स्टेट काँग्रेसचा जन्म झाला. याचे सर्वप्रथम अध्यक्ष म्हणून स्वामी रामानंद तीर्थ यांना निवडले गेले. स्वामीजींनी राष्ट्रीय संगठन आणि शैक्षणिक प्रगतीकडे विशेष लक्ष्य दिले. लोकशाही आणि समाजवादी मूल्यांना सुदृढ बनविण्याचा प्रयत्न केला. स्वामीजींचे नि:स्वार्थ व्यक्तिमत्व आणि त्यांच्या कार्यनिष्ठेने मी प्रभावित झालो. हैद्राबाद राज्यातील जनतेसाठी एका जबाबदार सरकार निमित्ताने आंदोलन सुरू करण्यासाठी यावे, या काँग्रेसच्या कार्यक्रमानुसार मी पूर्ण राज्याचा दौरा करून जनतेला राष्ट्रीय आंदोलनाची ओळख करून दिली. सन १९३८ मध्ये स्टेट काँग्रेसने सत्याग्रह सुरू केला त्यात गोविंदराव नानल, रामकृष्ण जी धूत, रविनारायणजी रैडी आणि श्रीनिवास रावजी बोरेकर यांनी भाग घेतला होता.

महात्मा गांधींच्या सूचनेनुसार एक महिन्यानंतर सत्याग्रह थांबविला गेला. कारण की या सोबतच हिंदू महासभा व आर्य समाजाचाही सत्याग्रह सुरू झाला होता. आर्यसमाजाच्या सत्याग्रहाला भारतीय इतिहासात विशेष महत्त्वाचे स्थान आहे. यात काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंतचे हुतात्मे आणि जीवाची बाजी लावणारे नवयुवक झुंडीच्या झुंडींनी हैद्राबाद

राज्यात येऊन मृत्यूचा सामना करण्यास व तुरूंगाची दारे उघडण्यासाठी धावत पळत येत होत्या. या सत्याग्रहाची भारतातील प्रत्येक घरात चर्चा होती. भारतातच नव्हे तर, ब्रिटनच्या पार्लमेंटमध्ये सुद्धा याचा आवाज निनादत होता. हैद्राबादचा कायापालट करण्यात आर्य समाजाची महत्त्वाची भूमिका होती. भारत स्वतंत्र झाल्यावर हैद्राबाद वरील 'पोलिस ॲक्शन' चे वर्णन करतांना लोह पुरूष सरदार वल्लभभाई पटेल म्हणाले होते, ''जर आर्य समाजाने हैद्राबादमध्ये सत्याग्रह केला नसता, तर आम्हाला (भारत सरकारला) तीन दिवसात यश मिळणे शक्य नव्हते.''

डिसेंबर १९३८ मध्ये स्टेट कॉँग्रेसवर निजाम सरकारने बंदी घातली. त्याच्या विरूद्ध स्वामी रामानंद तीर्थांच्या नेतृत्त्वाखाली व्यक्तिगत सत्याग्रह करण्याचा निश्‍चय केला गेला. स्वामीजींनी आपल्या अटकेच्या स्थितीत मला दुसऱ्या क्रमांकावर नियुक्त केले होते. परंतु हा सत्याग्रह गांधीजी आणि पंडित जवाहरलाल नेहरूजींच्या सांगण्यावरून स्थगित केला गेला. हैद्राबाद सरकार आणि कॉँग्रेसमध्ये राजकीय संघर्ष चालू होता.

## स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्यच !

१५ आगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. सोबतच पाकिस्तान पण अस्तित्वात आला. तर निजामाने दोघांपासून वेगळे राहण्याची घोषणा केली. या वेगळ्या राज्याच्या घोषणेमुळे संपूर्ण भारतात विशेष करून हैद्राबाद राज्यात प्रचंड खळबळ निर्माण झाली.

निजामाच्या या घोषणेच्या विरोधात, मी राज्याच्या कोनाकोपऱ्यात फिरून त्यांच्या हिटलरी मनोवृत्तीचे रहस्य लोकांना सांगितले. तसेच स्वातंत्र्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्त्वाखाली दीर्घ काळापर्यंत लढा देण्यास तत्पर राहण्याचे आवाहन जनतेला केले. मी कोणत्याही परिस्थितीत निजामाची खानदानी गद्दारी सहन करू शकत नव्हतो. स्वतंत्र हैद्राबाद राज्याची कल्पना खरे तर आणखी एक पाकिस्तान बनविण्याची योजना होती. मी हशमतगंज (आजचे रामकृष्ण धूत गंज)

सुलतान बाजारात 'अय्यंगार कमीशन' च्या विरूध्द भाषण करून आर्य समाज मंदिराकडे परत येत होतो. तेवढ्यात सुलतान बाजारच्या पोलीस इन्स्पेक्टरनी मला एका रात्रीत अटक करून माझी चंचलगुड्याच्या सेंट्रल जेल मध्ये रवाणगी केली. माझ्या अटकेच्या काही दिससा नंतर स्वामी रामानंद तीर्थ, डॉक्टर मेलकोटे आणि कृष्णाचारीजी जोशी एडव्होकेट यांनी सुलतान बाजारात राष्ट्रध्वज फडकवून स्वत:ला अटक करवून घेतली. या तिन्ही नेत्यांना अटक करून माझ्या जवळच आणून ठेवले. पाहता-पाहता सेंट्रल जेल ने एका छोट्याशा वस्तीचे स्वरूप धारण केले. सत्याग्रह संपेपर्यंत बी. रामकृष्णरावजी, काशीनाथरावजी वैद्य, विनायकरावजी विद्यालंकार, हरिश्चंद्र हेडा, वेंकट रंगारीजी, रामकृष्णजी धूत, चन्नारीजी, दत्तात्रेय प्रसादजी, महादेवसिंहजी, एस. वेंकटस्वामीजी, बी. वेंकटस्वामीजी, कालीचरणजी 'प्रकाश', विरधीचंदजी चौधरी, गंगारामजी, गणपतरावजी वैद्य इत्यादी सेंट्रल जेलमध्ये येऊन पोंहोचले होते. जेलमधील ते जीवन फारच रोमांचकारी होते. कांही महिने या सर्व सोबत्यांच्या सदाचारांचा व उच्च विचाराचा लाभ घेण्याची सुवर्ण संधी मला मिळाली.

पोलीस ॲक्शन नंतर आम्हां तिघांना-स्वामी रामानंद तीर्थ, पंडित विनायकराव विद्यालंकार व मला सेंट्रल जेल हैद्राबाद मधून सोडण्यात आले. त्याचे कारण असे होते की, कासिम रजवी आणि त्यांच्या रजाकारांनी सत्तेच्या हव्यासा पोटी जातीय दंगलींची आग संपूर्ण राज्यात पसरवून ठेवली होती. परिस्थिती येथपर्यंत येऊन पोंहोचली होती की, स्वत: निजाम, जो की मुसलमानांच्या सत्तेचा प्रतीक समजला जात होता, तो नावापुरताच स्वतंत्रेच्या जाळ्यात फसून असाह्य झाला होता. शहरातील बिघडलेली परिस्थिती पाहून ती नियंत्रणात आणण्यासाठी व राज्यात शांतता स्थापन करण्याच्या निमित्ताने आम्हाला सोडण्यात आले होते. मी एक वर्ष चार महिन्या नंतर सुटलो होतो. तसे तर माझ्या जीवनाची पाच-सहा वर्षे लागोपाठ तुरूंगयात्रेतच गेली. स्वतंत्र भारताच्या हैद्राबादेत पाय ठेवताच माझी जबाबदारी वाढली. राज्यात शांतता स्थापण करणे हे आमचे प्रथम कर्तव्य होते. स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष,

श्री स्वामी रामानंद तीर्थ यांनी शांतता समिती स्थापन केली. तिचे अध्यक्ष डॉ. मेलकोटे हे होते. मला सचिव करण्यात आले होते. श्री. बाकर अली मिर्जा देखील माझ्या सोबत सचिव म्हणून काम करीत होते.

हैद्राबाद शहरात पूर्ण शांतता टिकवून ठेवणे म्हणजेच प्रतिक्रिया म्हणून कोणत्याही प्रकारचे दंगे न होऊ देण्याची मोठी जबाबदारी होती. शांततेसाठी मी रात्रंदिवस प्रयत्न करीत होतो. मुसलमानांच्या मनात निराशा व शिथिलपणा येणे स्वाभाविकच होते. ती दूर करण्यासाठी सरकारनेही शांतता समितीला सहकार्य केले. मुसलमानाच्या नेत्यांना व्यक्तिश: भेटून परिस्थिती सुधारण्यासाठी विचार विनिमय करण्यात आला. शांतता समितीला या कामी यश मिळाले. स्टेट क्राँग्रसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांनी आपल्या पत्रात या कामाची प्रशंसा करीत लिहिले होते, तुम्ही व डॉक्टर मेलकोटे यांनी हैद्राबादेत कोणत्याही अप्रिय घटनांना रोखण्यासाठी भरपूर प्रयत्न केले आहेत. त्यामुळे मुसलमानांच्या मनात एक प्रकारचे समाधान निर्माण झाले आहे. या यशाबद्दल तुम्हां दोघांना काँग्रेसकडून हार्दिक धन्यवाद देतो.

## राजकारण आणि कुचंबना.

हैद्राबाद स्टेट काँग्रेसचा मी तिच्या स्थापनेपासून सदस्य होतो. कार्यकारिणी समितीचा सदस्य म्हणून पाच वर्षांपर्यंत निवडून येत राहिलो. तसेच हैद्राबाद शहर काँग्रेसचा मी चार वर्षे सदस्य होतो. इ.स.१९५१ मध्ये माझ्या अध्यक्षतेच्या कार्यकाळात महानगर पालिकेच्या निवडणुका झाल्या आणि काँग्रेसचे साठ सदस्य हैद्राबाद महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच बिनविरोध निवडून आले. १९५२ मध्ये राज्य विधानसभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत हैद्राबाद शहरात काँग्रेसने नेत्रदीपक यश प्राप्त केले. या आमदारात मी देखिल एक होतो.

इ.स. १९५३ मध्ये पं.जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन नानलनगर हैद्राबाद येथे संपन्न झाले, त्यावेळी मला त्याचे स्वागताध्यक्ष पद देण्यात आले होते. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा मी दोन वर्ष सदस्य होतो आणि पाच वर्षांपर्यंत आमदार (एम. एल.

ए.) होतो. हा माझ्या सक्रीय राजकीय जीवनाचा शेवटचा प्रवास होता.

काँग्रेसच्या राष्ट्रीय संघटनेस सुदृढ बनविण्याचा आणि निष्ठेने, प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावण्याचा भरपूर प्रयत्न केला, पण राजकारणाच्या प्रवासात पुढे असे दिसून आले की कर्तव्य, त्याग आणि बलिदानाची भावना नाहीशी होऊन स्वार्थ आणि सत्तेच्या हावरटपणाची प्रवृत्ती तीव्र गतीने वाढत असल्याची जाणीव झाली आणि हेही पाहीले की –

चिरागों पर ही कुछ नही मौकूफ
आदमी आदमी से जलते है !

जळणे हा दिव्याचाच गुणधर्म नाही, तर या जगात माणसे माणसांवर जळतात.

अशा या वातावरणात माझा जीव गुदमरायला लागला. कारण माझ्यासारख्या स्वभावाच्या माणसासाठी येथे कोणतीही जागा नव्हती. मी शांतपणे काँग्रेसपासून वेगळे होऊन दूर जाणेच योग्य असल्याचे समजलो. चक्रवर्ती राजगोपालचारीं जे म्हणाले ते योग्यच होते. ''काँग्रेस हे एकेकाळी स्वातंत्र्य सैनिकांचे प्रवित्र संगठन होते आणि आता मात्र स्वार्थी व संधीसाधू लोकांची टोळी बनली आहे.''

## राजकारणातून परतलो.

आर्यसमाजाच्या पवित्र आदर्शांचा प्रचार करण्यासाठी मी माझे जीवन समर्पित केले आहे आणि त्याच्या प्रचार कार्यात मी निरंतर संलग्न आहे. आर्य समाजाने माणसाच्या निर्माणकार्यात आणि माणुसकीला सांभाळण्याच्या कार्यात फार मोठे योगदान दिले आहे. माझ्या जीवनाचा उद्देश सुरूवातीपासूनच 'जनतेची सेवा करणे हा आहे'. मी मोठ्या प्रमाणात सेवेची कामे करीत आलो आहे. जनताच देशासाठी आपला जीव धोक्यात टाकते, बलिदान देते आणि इतिहास घडविते. मला नेहमी जनतेसोबत चालतांना आनंदानुभूती होते.

## राष्ट्रीय दृष्टीकोणातून राष्ट्रभाषेची सेवा

हिंदी माझी मातृभाषा आहे. तिच्यावर माझे प्रेम व लगाव हा स्वाभाविक

आहे. हिंदीला राष्ट्रभाषा बनविण्याचा जो भारत सरकारने निर्णय घेतला तो निश्चितच वस्तुस्थिती डोळ्यासमोर ठेऊन घेतला होता. कारण सामान्यपणेही संपूर्ण देशात हिंदी बोलली व समजली जाते. वैदिक भाषा संस्कृतशी तिचा संबंध जोडलेला आहे, तिने भारतीय सभ्यता व संस्कृतीला आपल्या साहित्याने समृद्ध केले आहे. देशातील सर्व भाषांवर संस्कृतचा मूलभूत प्रभाव आहे. देवनागरी लिपी ही स्वयंपूर्ण आणि वैज्ञानिक आहे. हा राष्ट्रीय दृष्टीकोण समोर ठेवून राष्ट्रभाषा हिंदीच्या प्रचार व प्रसाराच्या कामासाठी मी माझ्या सर्वशक्तीनिशी प्रयत्न करीत आहे.

हैद्राबादेत हिंदी प्रचार सभेच्या स्थापनेपासून मला तिचा सदस्य झाल्याचा आनंद वाटतो. सन १९४९ सभेच्या आमंत्रणानुसार अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाचे अधिवेशन हैद्राबादेत पार पडले. लोकप्रिय हिंदी साहित्यिक श्री. चंद्रबली पांडेय यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन संपन्न झाले, तेव्हा मला राष्ट्रभाषा परिषदेच्या स्वागत समितीचा अध्यक्ष बनविण्यात आले होते. मी चार वर्षे हिंदी प्रचार सभा हैद्राबादचा अध्यक्ष होतो. सन १९६३ मध्ये हैद्राबादच्या हिंदी प्रचार सभेचा हैद्राबादचा अध्यक्ष निवडला गेलो आणि १९६६ ला सभे चा रौप्य महोत्सवी समारंभ सुध्दा माझ्याच अध्यक्षीय कार्यकाळातच संपन्न झाला.

इ.स. १९६८ ला आंध्रप्रदेश हिंदी संमेलनाच्या स्वागत मंत्र्यांची जबाबदारी माझ्यावर सोपविली गेली होती. हिंदी जगातील वरिष्ठ व लोकप्रिय नेते सेठ गोविंद दासजीनीं या संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते. मद्रास सरकारच्या हिंदी व्यवहाराच्या विरूद्ध हैद्राबाद शहरात जबरदस्त आभियान सुरु केले आणि जनतेला आपले कामकाज हिंदीत करण्याची विनंती या संमेलनाच्या माध्यमातून केली गेली.

## जगदीश सभेकडून संन्यास आश्रमाकडे.

जनसेवा व समाजसेवेच्या कामाची माझी सुरूवात जगदीश सेनेने झाली. मी जेथे राहतो, त्या शाह अली बंडात वाचनालय स्थापन केले होते. या सोबतच ग्रंथालय व वाचनालयही होते. आंध्र महासभेच्या माध्यमातून माडपती हनुमंतरावजीचे 'ग्रंथालय अभियान' चालू झाले

होते तेंव्हाचा हा काळ होता. ‘नवयुवक संघा‘ची स्थापना करून मला देशातील तरूणांची सेवा करण्याचा गौरव प्राप्त झाला होता.

माझ्या जीवनात असेही काही प्रसंग आले की, माझी काम करण्याची पद्धत, स्वभाव व वृत्ती यामुळे कांही प्रसिद्ध व्यक्तींशी संघर्ष करणे मला भाग पडले. कदाचित माझे ते निर्णय माझ्या गैरसमजूतीमुळे आणि तारूण्याच्या वेडेपणामुळे किंवा त्या काम करण्याच्या पद्धतीला इतरांनी पसंद अथवा स्वीकार न केल्यामुळे झाले असतील. अशा प्रकारची परिस्थिती स्वत: होऊन उत्पन्न झाली असावी ! समाजसेवकाला कर्मक्षेत्री काम करतांना उंच पहाड आणि खोल दऱ्या ओलांडून जावेच लागते.

मी ही गोष्ट मान्य करतो की, जेंव्हा एखादी व्यक्ती एखाद्या कामाची जबाबदारी सांभाळते, तेंव्हा ती व्यक्ती आपल्या पूर्णत: विचार व चिंतनाच्या आधारावर त्याला अग्रभागी ठेवते व कठीण परिश्रम करून त्याला यशस्वी करण्याचा प्रयत्न करते. ही कार्य पद्धती एखादेवेळी सर्वांना मान्य नसते किंवा दोषपूर्णही असू शकते, पण जेंव्हा त्यांचे सोबती त्याच्या वाटेत अडचणी निर्माण करतात व त्या कार्याला मध्येच थांबवतात तेंव्हा त्यांचा मूळ उद्देशच संपून जातो, तर अशा अवस्थेत मनावर नियंत्रण ठेवणे हे असामान्य व्यक्तीचेच काम असते. माझ्या सारख्या एका साधारण, अल्पबुद्धी आणि पदवी–रहित व्यक्तीसाठी भावनेवर नियंत्रण ठेवणे अशक्य होते. याच भावनेच्या प्रबळामुळेच कदाचित आर्य समाजाचे अनेक श्रेष्ठ, आदरणीय व बलिदानी व्यक्तींचा माझ्याकडून विरोध केला गेला असेल, पण याचा अर्थ असा नाही की, त्यांच्या विषयी माझ्या मनात कोणत्याही प्रकारचे वाईट भाव किंवा अनादर होता ! या विपरीत मी नेहमी त्यांच्या कार्यक्षमता व योग्यतेपुढे माझी मान झुकवतो. आज ही ते या जगात नाहीत अथवा त्यापैकी कांहीजण आहेत. माझ्या दृष्टीने त्यांनी केलेली नि:स्वार्थ सेवा आणि अपूर्व त्याग हे माझ्या जीवनाचे आदर्श बनलेले आहेत.

आता मी माझ्या जीवन यात्रेच्या नविन वळणावर पोंहोचत आहे त्या मार्गाने जाऊन मला विविध विकारापासून पूर्णपणे मुक्त आणि निवृत्त होऊन हृदयाला पवित्र करायाचे आहे. ती उच्च स्थिती व योग्यतेला प्राप्त

होऊन पुन्हा मी कधीही त्या वृत्तींना वर येऊ देणार नाही. मी माझे कर्तव्य पूर्ण करीत असतांना माझ्यामुळे कुणाला राग आला असेल किंवा कुणाचे नुकसान झाले असेल तर त्याबद्दल मी मोकळ्या मनाने क्षमा मागतो.

पन्नास वर्षे झाली. नेहमी कामात मग्न असल्याने मला दैनंदिन घटना रोजच्या रोज वहीमध्ये लिहिण्यास वेळ मिळाला नाही. म्हणून जेवढी आठवण येत होती, तितकी पुन्हा-पुन्हा आठवून मी माझ्या जीवनाच्या ऊन-सावल्यांच्या कांही दृश्य व कांही घटना येथे सादर केल्या आहेत.

अगलों को जमाना क्या देगा ?
अपनी तो कहानी खत्म हुई.

आगामी पिढ्यांना हे युग काय देऊ शकेल, आमची तर कथा आता संपली.

## मी संन्यास का घेत आहे ?

संन्यास घेण्याची ही पवित्र संधी मला प्राप्त होत आहे. त्या संदर्भात येथे 'हैद्राबाद समाचार' च्या आग्रहावरून कांही लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे. हे माझ्या हृदयाचे स्वरोद्‌गार आहेत. यात कांही कृत्रिमता किंवा कोणताही बडेजावपणा नाही. ही आठवणींची ऊन सावली नसून हे विचार तथ्य व सत्यावर आधारलेले आहेत.

आर्य प्रतिनिधी आदरणीय पंडित बुद्‌धदेवजी विद्‌यालंकार (स्वामी समर्पणानंदजी सरस्वती) सभेकडून किशन बागेत आयोजित वैदिक वर्णाश्रम, राजनिती व साधना शिबिरात' आले होते. या शिबिराचे संयोजन श्री गंगारामजींच्या प्रेरणेने आणि सल्ल्याने केले होते. या शिबिरात पं. ईश्वरचंद्रजी दर्शनाचार्य, पं. प्रियव्रतजी विद्या वाचस्पती आणि श्री राममनोहर लोहिया हे देखील आले होते. त्यावेळच्या चर्चेतील विषय पुढीलप्रमाणे होता. ''वैदिक समाजव्यवस्थेचे धोरण किती उज्वल आहे? राष्ट्रनिर्माण आणि उत्कर्षास किती पोषक आहे? जर याला आर्यसमाजीं लोकांनी आपल्या जीवनात क्रियात्मक रूप देऊन समाज-रचनेचे वास्तविक तत्वज्ञान जगापुढे मांडले तर, सादर केले तर ते समाजहिताला उपयोगी सिद्‌ध होईल''.

या चर्चेच्या प्रकाशझोतात देखील निर्णयात्मक रेषेपर्यंत येऊन पोंहोचली की आम्हा आर्यसमाजी लोकांना ही जीवन प्रणाली प्रचलित करावी लागेल. तेव्हा कांही मित्रांनी पंडित बुद्धदेवजी विद्यालंकार यांच्या सल्यास सैध्दांतिक रूप देण्याचा अंगीकारून निश्चय केला होता. त्या निश्चयकर्त्यात मी ही एक होतो. आर्य मर्यादांना प्रतिष्ठापित करण्याच्या उद्देशाने मी माझ्या मनातील संकल्प पंडितजींच्या समोर मांडण्यासाठी वचनबद्ध झालो.

त्या वेळी माझ्या वयास अठ्ठेचाळीस वर्ष पूर्ण झाले होते. पन्नासीचा उंबरठा ओलांडताना राजकीय समस्या आणि समाजाच्या संगठनेशी संबंधीत संघर्ष हा माझ्या जीवनातील दु:खपूर्ण ठेवा बनला होता. आश्रम धर्मांच्या मर्यादेचे पालन न केल्यामुळे जे मानसिक दु:ख मला नेहमी होत होते, त्याला शब्दात व्यक्त करणे माझ्यासाठी खूपच कठीण आहे. संकल्पाची पूर्तता न झाल्याने पश्चातापाच्या आसवांचे घोट पीत-पीत प्रायश्चित करीत होतो आणि नेहमीच वेदनेची प्रतिमा बनून राहिलो होतो. अशा परिस्थितीत सात्विक आनंद रसाची प्राप्ती कशी ? व मनाला शांतता कशी मिळणार ? या दु:खाने भरलेल्या दिवसात माझ्या आनंदी जीवनाचा वसंत हा तर द्विधावस्थेच्या पानझडीतच व्यतीत झाला. संकल्पाची आठवण येताच मनावर धोंडा ठेवून बसत होतो. कोणीही पुन्हा-पुन्हा ही गोष्ट विचारत असे. तेंव्हा मी दु:खाने न बोलता शांत राहत असे. अखेर दु:ख आणि वेदनांनी भरलेले चक्र तुटले.

मी पासष्ट वर्षाचा होत असतांना हा दिलेला संकल्प पूर्ण करण्याच्या विचारात होतो. याच वेळेस 'आर्यसमाज स्थापना शताब्दी कार्य' ची जबाबदारीचे मोठे ओझे माझ्यावर सोपविण्यात आली. आर्यांच्या कठोर परिश्रमावरच या शताब्दी समारोहाची सफलता आधारलेली होती. आता परिस्थितीनेच मला अधिक वेळ न घेता, वर्णाश्रम धर्मावर नितांतश्रद्धा, निष्ठा आणि विश्वासाला क्रियात्मक रूप देण्याची वेळ येऊन ठेपली. आता पुरे झाले ! लोकेषणा मनातून दूर गेली आहे. मनाचे स्वर आता संन्यास आश्रमात प्रवेश करण्याचे संकेत करीत आहेत. याच आधारावर जीवनातील चतुर्थ आश्रमाच्या मार्गाचा अनुगामी बनण्याचा म्हणजेच

संन्यास स्वीकारण्याचा मी निश्चय केला.

या संदर्भात मी कांही लोकांच्या शंकांचे समाधान करून देणे योग्य समजतो. संन्यास घेण्याचा उद्देश हातावर हात ठेवून बसणे किवा संसाराचा त्याग करून पर्वताच्या अंधाऱ्या गुहेत जाऊन बसणे, असा नव्हे ! धर्म, देश आणि समाजाची सेवा, दु:खी लोकांच्या अग्नीमध्ये जळणे आणि त्यांच्या जखमांवर पट्टी बांधण्याचे करणे हाच संन्यासाचा धर्म आहे. थोडक्यात राष्ट्र आणि धर्म यज्ञात आपल्या जीवन समिधेला ''सर्वं वै पूर्णं स्वाहा'' च्या रूपाने आहूती देणे, हे संन्यास धर्मांचे एकमेव लक्षण आहे. संन्यास म्हणजेच तिन्ही एषणांची निवृत्ती आणि आत्मिक चैतन्य निर्माण करण्याच्या प्रवृत्तीचे नाव आहे.

प्रभू देवा ! तू मला शक्ती दे. जेणे करून मी निर्वैर, निष्काम भावनेने मानव मात्राच्या कल्याणाच्या कार्यात आणि सेवा सेवेच्या उद्देशात काम करीत राहीन. मी कुणाचा द्वेष करू नये आणि कोणीही माझा द्वेष करू नये जर कोणीही कोणाशी द्वेष करीत असेल तर त्याचा निर्णय ''स्वर्यस्य च केवलं तस्मै'' त्या सुख स्वरूप केवळ मात्र त्या परमात्म्यावर सोडत आहे. प्रभो ! तुमच्या न्यायापासून कोणी वाचू शकत नाही, म्हणून मी स्वत: सर्वस्वाने तुला समर्पित करीत आहे. केवळ तुझा न्यायच सर्वोपरी आहे. शेवटी मी एक सामान्य माणूस तुझ्याकडे प्रार्थना करतो.

'यो३स्मान् द्वेष्टि यं वयं दिव्ष्मस्तं वो जम्भे दध्म : !

हे करूणामय प्रभु परमेश्वरा ! मला संकल्पाचे पालन करण्यासाठी आणि व्रतांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करण्याकरिता शक्ती आणि सामर्थ्य दे ! अपराधाने भरलेल्या जीवनाचे ताट रिकामे करून तुझ्या कृपा-निधीचे असीम वरदान देऊन माझ्यासारख्या साधारण पामराला आधार प्रदान कर आणि आपल्या कृपावर्षावाने आर्द्र बनव !